पुणे, मंगळवार, १ ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 292 • वर्ष ३ रे, अंक २९२ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com
BEYOND THE NEWS



'महाराष्ट्राची उद्योग भरारी' ला उद्योजकांचा प्रतिसाद
P3




कोहलीने मोडला सचिन तेंडुलकरचा **'महाविक्रम'!**
P12

## At a Glance

### हिटलरनंतर नेतान्याहू हे सर्वात मोठे दहशतवादी

**श्रीनगर :** ज्यू नेत्याने पॅलेस्टाईन आणि लेबनॉनला गॅस चेंबरमध्ये रूपांतरित केल्यामुळे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू हे ॲडॉल्फ हिटलरनंतरचे सर्वात मोठे दहशतवादी असल्याचे पीडीपीच्या अध्यक्षा मेहबूबा मुफ्ती यांनी सांगितले. मेहबूबा म्हणाल्या- आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने नेतान्याहू यांच्याविरोधात निकाल दिला आहे. » पान ७ वर

### राजकारणापासून देवाला तरी दूर ठेवा

**तिरुपती :** न्यायमूर्ती बीआर गवई आणि केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर तिरुपती मंदिरातील लाडूंमध्ये प्राण्यांची चरबी मिसळल्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात ४ याचिकांवर सुनावणी सुरू आहे. लाडूंची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी याचिकांमध्ये करण्यात आली आहे. » पान ७ वर

### १६ ऑक्टोबरला होणार सुनावणी

**प्रयागराज :** मथुरेच्या श्रीकृष्ण जन्मभूमी-शाही इदगाह मशीद वादावर सोमवारी अलाहाबाद उच्च न्यायालयात सुनावणी झाली. मुस्लीम पक्षाच्या री कॉल अर्जावर वकिलांनी न्यायालयात बाजू मांडली. हिंदू बाजूकडून उत्तर दाखल करण्यात आले. न्यायालयाने आता या प्रकरणाच्या पुढील सुनावणीसाठी १६ ऑक्टोबरची तारीख निश्चित केली आहे. » पान ७ वर

### प्रचार संपला, आज मतदान

**जम्मू :** जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीचा प्रचार संपला आहे. तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात १ ऑक्टोबरला ४० जागांसाठी मतदान होणार आहे. ८ ऑक्टोबरला निकाल लागणार आहे. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी राज्यात » पान ७ वर

## देशी गाईला राज्य मातेचा दर्जा



# दोन तास अडतीस निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. एकीकडे विरोधक राज्यातील विविध विषयांवरून सरकारवर टीकेची झोड उठवत आहेत, तर दुसरीकडे महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर निर्णयाचा धडाका लावला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही मंत्रिमंडळाची बैठक महत्त्वपूर्ण मानली जात होती. या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य सरकार कोणते निर्णय घेणार? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या.

आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील विविध विषयांसंदर्भात चर्चा करण्यात आली. यानंतर तब्बल ३८ महत्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये राज्यातील होमगार्ड यांच्या भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याचा लाभ सुमारे ४० हजार होमगार्ड यांना होणार आहे, तसेच कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ, तसेच अनुकंपा धोरणाही लागू करण्यात येणार, ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे. तसेच माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा आणि तिसरा अहवाल राज्य सरकारने स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.

**» धडाका**

महाराष्ट्र सरकारने देशी गायींना 'राज्यमाता-गोमाता' म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्य सरकारनं अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये महाराष्ट्रातील देशी गायींना 'राज्यमाता-गोमाता' घोषित करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली.

चर्चेअंती हा प्रस्ताव मान्य करून यासंदर्भातला शासन आदेश अर्थात जीआर जारी करण्यात » पान ७ वर


### मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय

- कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ. अनुकंपा धोरणाही लागू (महसूल विभाग)
- ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान (नियोजन विभाग)
- ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गाच्या कामाला गती देणार. 'एमएमआरडीए' ला बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास मान्यता. (नगर विकास विभाग)
- ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास गती देणार. १२ हजार २०० कोटींच्या सुधारित आराखड्यास मान्यता. (नगर विकास विभाग)
- ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गासाठी १५ हजार कोटी कर्जरूपाने उभारणार. (नगर विकास विभाग)
- देशी गाईंच्या पालन पोषणासाठी अनुदान योजना. (पशुसंवर्धन विभाग)
- भारतीय खेळ प्राधिकरणाला आकुर्डी, मालाड व वाढवण येथील जागा. नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणार. (क्रीडा विभाग)
- रसायन तंत्रज्ञान संस्थेस ठाणे येथील मौजे खिडकाळीची जागा. (महसूल विभाग)
- राज्य जलसंपत्ती माहिती केंद्र स्थापणार. जलस्त्रोतांचे उत्तम नियोजन करणार. (जलसंपदा विभाग)
- जळगाव जिल्ह्यातल्या भागपुर उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता. 30 हजार हेक्टर जमीन सिंचित होणार (जलसंपदा विभाग)
- लातूर जिल्ह्यातील हासाळा, उंबडगा, पेठ, कव्हा कोल्हापूर बंधाऱ्याच्या कामास मान्यता. (जलसंपदा विभाग)
- धुळ्याच्या बीएपीएस स्वामीनारायण संस्थेस ग्रामस्थांच्या विकासासाठी जमीन. (महसूल विभाग)
- रमाबाई आंबेडकर नगर, कामराजनगरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती देणार. 'एमएमआरडीए'ला जमीन अधिमूल्य भरण्यास सवलत. (नगर विकास विभाग)
- केंद्राच्या मिठागराच्या जमिनी राज्य शासनाकडे हस्तांतरित करणार. दुर्बलांसाठी घरांच्या योजनांना वेग येणार. (गृहनिर्माण)

» पान ७ वर

## मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. हा पुरस्कार ८ ऑक्टोंबर २०२४ रोजी ७० व्या नॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये देण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची घोषणा केली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ट्विट करत लिहिले आहे की, 'मला हे जाहीर करताना अभिमान वाटतो की, दादासाहेब फाळके पुरस्कार निवड समितीने भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या विशेष योगदानाबद्दल अभिनेते मिथुन चक्रवर्तीजी यांना पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. हा पुरस्कार ८ ऑक्टोबर २०२४ रोजी ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात प्रदान केला जाईल.'

# अंतर्गत मतदानातून आज ठरणार भाजपचा उमेदवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारचंद्र पक्षाकडून इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले होते. भाजप मात्र अशाप्रकारे इच्छुकांची अर्ज मागवत नाहीत, भाजपमध्ये उमेदवार निवडण्याची वेगळी प्रक्रिया असून ही प्रक्रिया राबवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. सर्व विधानसभा मतदारसंघांचा ते आढावा घेण्यात येत आहे. त्यानुसार पक्षाकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्यांची मतदारसंघ निहाय चाचपणी करण्यात येत आहे.

काही दिवसांपूर्वी काँग्रेसकडून महाराष्ट्रातील २८८ जागांवर इच्छुकांचे अर्ज मागविण्यात आले होते. त्यानंतर काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने देखील महाराष्ट्रभरातून इच्छुकांचे अर्ज मागवले. त्यानुसार पक्षाकडे तब्बल १३५० अर्ज आल्याचे समोर आले आहे. निवडणुकीच्या तोंडावरती ऐनवेळेस इनकमिंग न झाल्यास याच इच्छुकांच्या अर्ज मधून एक उमेदवार विधानसभा निवडणुकीची तिकिटासाठी निवडला जातो.

याचा उलट भाजपमध्ये वेगळी प्रक्रिया असून सध्या ही प्रक्रिया राबवण्यास सुरुवात झाली आहे. या प्रक्रियानुसार आज पुणे शहरातील उमेदवारांसाठी मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यासाठी भाजपचे केंद्रीय निरीक्षक पुण्यामध्ये दाखल झाले असून त्यांच्याकडून पक्षातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा सुरू आहे.

या चर्चातून पदाधिकाऱ्या व कार्यकर्त्यांचे आगामी विधानसभा निवडणुकी साठीच्या उमेदवारांनी बाबत मत जाणून घेण्यात येत आहेत. त्यानुसार आता एक ऑक्टोबरला मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या प्रक्रियेमध्ये केंद्र, प्रदेश, शहर आणि विधानसभा स्तरावरील पदाधिकारी असे मिळून प्रत्येक » पान ७ वर

## सतरा वर्षीय युवकाचा खून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या दारात किरकोळ कारणावरुन एका युवकाच्या पोटात चाकूने भोसकून खून केल्याचा धक्कादायक समोर आला आहे. यामुळे बारामतीमध्ये एकच खळबळ उडाली आहे. ओंकार संतोष पोळ (वय १७) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. ओंकार पोळ हा बारावीत शिकत होता. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टी सी कॉलेजच्या बाहेर काल सकाळी सर्व विद्यार्थी जमले होते. त्यावेळी ओंकार पोळ व त्याच्याच वर्गात शिकणाऱ्या आरोपीमध्ये वाद झाला. एक महिन्यांपूर्वी दुचाकीला कट मारण्यावरुन त्यांच्यात वाद झाला. त्यात एकमेकांना पाहून घेण्याची भाषा झाली. » पान ७ वर

# तरुणीला गुंगीचे औषध देऊन बलात्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** पुण्यात महिलांवरील अत्याचार वाढत आहेत. एका तरुणीला नोकरी देण्याच्या आमिषाने तिला पुण्यात बोलावून तिच्या नाश्त्यात गुंगीचे औषध मिसळून बलात्कार करण्यात आला. यातून तरुणी गर्भवती राहिल्याने तिचा गर्भपात करून तिला मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार या प्रकरणी लोणीकंद पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. त्यानुसार इब्राहिम शेख, रोशनबी, परवीन शेख, मंगला आणि मंगलाची मुलगी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित तरुणी ही श्रीरामपूर येथील असून हा प्रकार श्रीरामपूर येथील रमानगर शुभम मंगल कार्यालयाच्या पाठीमागे खांदेवनगर कल्पना हॉस्पिटल येथे ३ सप्टेबर रोजी घडला. या घटनेची माहिती अशी की पीडित तरुणीला काम हवे होते. या साठी ती आरोपींकडे गेली. आरोपींनी पीडित मुलीला पुण्यात बोलवले. या ठिकाणी तिच्या असाह्यतेचा फायदा घेत त्यांनी तिच्या नाश्त्यात गुंगीचे औषध मिसळले.

**» अत्याचार**

या ठिकाणी ती बेशुद्ध झाली असता आरोपींनी तिच्यावर बलात्कार केला. यानंतर देखील पीडितेला वारंवार धमकी देऊन तिच्यावर विविध ठिकाणी बलात्कार करण्यात आला. » पान ७ वर

## यंदा नवरात्र उत्सव दहा दिवसांचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** आश्विन शु. प्रतिपदेच्या दिवशी म्हणजे ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी गुरुवारी, नवरात्रारंभ / घटस्थापना होणार असून या दिवशी ब्राह्म मुहूर्तापासून म्हणजे सुमारे पहाटे ५ पासून दुपारी १.४५ पर्यंत कोणत्याही वेळी घटस्थापना करून नवरात्रातील पूजन करता येईल. यावर्षी आश्विन शुक्ल तृतीया तिथीची वृद्धी झाल्याने नवरात्र दहा दिवसांचे आहे. दिनांक ७ ऑक्टोबर रोजी ललिता पंचमी असून दिनांक १० ऑक्टोबर रोजी महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे) आहे. दिनांक ११ रोजी महाष्टमीचा व नवमी उपवास एकाच दिवशी असून दिनांक १२ ऑक्टोबर रोजी शनिवारी नवरात्रोत्थापन (नवरात्र समाप्ति) » पान ७ वर

# आंबेगावातून ५६ लाख ९० हजारांचे अफिम जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगांव :** शहरातील अंमली पदार्थाचे समुळ उच्चाटन करण्याच्या मोहिमेत अंमली पदार्थ विरोधी पथकाने आंबेगावातून ५६ लाख ९० हजार रुपयांचे अफिम हा अंमली पदार्थ जप्त केला आहे. देविलाल शंकरलाल आहिर (वय ४२, रा. कात्रज) असे अटक केलेल्याचे नाव आहे. अंमली पदार्थ विरोधी पथक भारती विद्यापीठ परिसरात पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी पोलीस अंमलदार योगेश मांढरे यांना आंबेगावात अफिम बाळगणारा एक तरुण थांबला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने आंबेगावातील सार्वजनिक रोडवरुन देविलाल आहीर याला ताब्यात घेतले.

त्याच्याजवळ असलेल्या ॲक्टीव्हा गाडीत ५६ लाख ९० हजार रुपयांचे २ किलो ८४५ ग्रॅम अफिम हा अंमली पदार्थ आढळून आला. पोलिसांनी मोबाईल, दुचाकीसह अफिम जप्त केला आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, पोलीस उपायुक्त निखील पिंगळे, सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहायक पोलीस निरीक्षक नितीनकुमार नाईक, पोलीस उपनिरीक्षक दिगंबर चव्हाण, पोलीस अंमलदार योगेश मांढरे, चेतन गायकवाड, प्रशांत बोमादंडी, संदिप जाधव, उदय राक्षे, दिशा खेवलकर, संदिप शेळके, नितीन जगदाळे, युवराज कांबळे, दिनेश बास्टेवाड यांनी केली आहे. » पान ७ वर

## पासवानांचा पक्ष विधानसभा लढणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** झारखंड विधानसभा निवडणुकीबाबत केंद्रीयमंत्री आणि लोक जनशक्ती पार्टी(रामविलास) अध्यक्ष चिराग पासवान यांनी रविवारी मोठी घोषणा केली. त्यांनी धनबाद येथील एका सभेला संबोधित करताना म्हटले की, त्यांचा पक्ष झारखंड विधानसभा निवडणूक लढवणार आहे. मात्र चिराग पासवान यांनी हे स्पष्ट केले नाही की, त्यांचा पक्ष स्वबळावर निवडणूक लढवणार की आघाडी करणार आहे. त्यांनी सांगितले की, याबाबत अद्याप सर्व पर्यायांचा विचार केला जात आहे. लोक जनशक्ती पार्टी झारखंडमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आपली महत्त्वपूर्ण भूमिका बघत आहे.

# भरधाव कारची दुचाकीला धडक, ३ जण जागीच ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** नागपूर येथील केळवद पोलीस ठाण्याच्या हद्दीत भरधाव कारने दुचाकीला धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील तिघांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. याप्रकरणी स्थानिक पोलिसांनी अज्ञात कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपासाला सुरुवात केली. मात्र, या घटनेने परिसरात शोककळा पसरली.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर छिंदवाडा महामार्गावर काल दुपारी १२ वाजताच्या सुमारास भरधाव कारने दुचाकीला धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीवरील तिघांचा जागीच मृत्यू झाला. दुचाकीला धडक दिल्यानंतर कारचालकांनी जखमींना रुग्णालयात दाखल करण्याऐवजी घटनास्थळावरून पळ काढला.




या अपघाताची माहिती मिळताच केळवद पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. याप्रकरणी अज्ञात कार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## अजित पवार गटाच्या चिन्हावर १ ऑक्टो. सुनावणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** अजित पवारांच्या राष्ट्रवादीला नवं चिन्ह द्या. याचिकेचा निकाल लागत नाही तोपर्यंत घड्याळ चिन्ह वापरण्यास बंदी घाला. तसेच अजित पवारांना नव्या चिन्हाची मागणी करण्यास सांगा, अशी मागणी शरद पवारांच्या पक्षाकडून सुप्रीम कोर्टात करण्यात आली आहे. आगामी विधानसभा निवडणुका तोंडावर आहेत. दरम्यान अजित पवारांच्या राष्ट्रवादीला घड्याळ ऐवजी दुसरं चिन्ह देण्यात यावे, अशी मागणी करणारी याचिका राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने सुप्रीम कोर्टात केली होती.याबाबत आता १ ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे. त्यामुळे आता » पान ७ वर

## निवडणुका एक की दोन टप्प्यात याबाबत लवकरच निर्णय

# निवडणूक आयोगाची तयारी झाली पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात शुक्रवारी आढावा घेतला. तसेच नुकतीच पत्रकार परिषद घेतली. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी निवडणूक तारखा गुलदस्त्यात ठेवल्या. तसेच निवडणुका एक की दोन टप्प्यात होणार याची लवकरच माहिती देवू, असे सांगितले आहे.

यावेळी निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंह संधू यांच्यासह राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम उपस्थित होते. यावेळी राजीव कुमार यांनी, मतदानाचा दिवशी सर्व आस्थापनांनी पगारी सुट्टी देण्याची सुचना केल्याचे सांगितले आहे. तर जे अधिकारी तीन वर्षांपासून निवडणुक प्रक्रित आहेत त्यांच्या बदल्या केल्या जातील असेही राजीव कुमार यांनी सांगितले आहे.



तर यावेळी निवडणुकांच्या तारखा आणि निवडणुका एक की दोन टप्प्यात होणार माहिती त्यांनी स्पष्ट केलेली नाही. त्या लवकरच तारखा जाहीर केल्या जातील असे म्हटले आहे.

त्यामुळे राज्यातील निवडणुकीच्या तारखांवरून असणारी उत्सुकता आणखी ताणली गेली आहे. राज्यातील जनता 'माझा हक्क माझे मत' याप्रमाणे मतदान करतील. २६ नोव्हेंबर रोजी कार्यकाळ संपणार आहे. यामुळे याआधी विधानसभा निवडणूक घ्यावी लागणार आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून तयारी झाली असून विधानसभेचे एकूण २८८ मतदारसंघ आहेत. » पान ७ वर



## वार्षिक २ कोटी ३३ लाख ८७ हजार ७६० रुपयांचा फायदा

# 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी ग्राहकांना लाभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेनुसार छापील वीजबिलाच्या कागदाऐवजी फक्त 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिल व प्रतिमहिना 10 रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे योजनेत सहभागी ग्राहकांची वीजबिलांमध्ये वार्षिक 120 रुपयांची बचत होत आहे. त्यानुसार वीजबिलांसाठी छापील कागदाचा पूर्णपणे वापर बंद करीत पश्चिम महाराष्ट्रातील तब्बल 1 लाख 94 हजार 898 पर्यावरणस्नेही वीजग्राहकांनी केवळ 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडला आहे. या योजनेत आतापर्यंत राज्यातील 4 लाख 87 हजार 113 वीजग्राहकांनी सहभाग घेतला आहे. त्यामध्ये सर्वाधिक 40 टक्के ग्राहक पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. तर पुणे परिमंडलातील 1 लाख 30 हजार 761 ग्राहक राज्यात सर्वाधिक संख्येने या योजनेत सहभागी झाले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील पर्यावरणस्नेही 1 लाख 94 हजार 898 वीजग्राहकांनी छापील कागदाचा पूर्णपणे वापर बंद करीत पेपरलेस वीजबिलास राज्यात सर्वाधिक पसंती दिली आहे. यासाठी महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी झाल्याने या ग्राहकांना वार्षिक 2 कोटी 33 लाख 87 हजार 760 रुपयांचा फायदा होत आहे.

आधुनिक जीवनशैलीशी सुसंगत 'गो-ग्रीन' योजना पर्यावरण रक्षणासाठी देखील महत्वाची आहे. कागदी वीजबिलांचा वापर बंद केला तरी महावितरण मोबाईल ॲप व वेबसाईटवर ग्राहकांसाठी चालू व मागील वीजबिल तसेच वीजबिल भरण्याच्या पावत्या आदींची माहिती उपलब्ध आहे. वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संगणकीय प्रणालीद्वारे ते 'गो-ग्रीन'मधील ग्राहकांना 'ई-मेल'द्वारे पाठविण्यात येत आहे. सोबतच 'एसएमएस'द्वारे देखील वीजबिलाची माहिती देण्यात येत आहे. त्यामुळे प्रॉम्प्ट पेमेंटसह ऑनलाइनद्वारे लगेचच बिल भरणा करणे आणखी सोपे झाले आहे. सर्व लघुदाब ग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी व्हावे असे आवाहन पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांनी केले आहे.

पुणे प्रादेशिक विभाग अंतर्गत 'गो-ग्रीन' योजनेमध्ये पुणे जिल्ह्यातील 1 लाख 39 हजार 822 ग्राहक सहभागी झाले आहेत. त्यांची 1 कोटी 67 लाख 78 हजार 640 रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. तर, या योजनेतून सातारा जिल्ह्यातील 12 हजार 796 ग्राहकांचे 15 लाख 35 हजार 520 रुपये, सोलापूर जिल्ह्यातील 13 हजार 819 ग्राहकांचे 16 लाख 58 हजार 280 रुपये, कोल्हापूर जिल्ह्यातील 17 हजार 515 ग्राहकांचे 21 लाख 1 हजार 800 रुपये आणि सांगली जिल्ह्यातील 10 हजार 946 ग्राहकांच्या 13 लाख 13 हजार 520 रुपयांचा वीजबिलामध्ये वार्षिक फायदा होत आहे.

'गो-ग्रीन' योजनेत सहभागी झालेल्या वीजग्राहकांना छापील (Pune) वीजबिलांची गरज भासल्यास त्यांना ईमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येईल. सोबतच संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील 11 महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेचा पर्याय निवडण्यासाठी महावितरणचे मोबाईल ॲप किंवा www.mahadiscom.in संकेतस्थळ येथे सुविधा उपलब्ध आहे.

## लोककलावंतांसाठी महापालिकेने हक्काची जागा द्यावी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शाहिरीसह अनेक लोककला या महाराष्ट्राच्या संस्कृतीच नव्हे तर देश विदेशामध्ये महाराष्ट्राची ओळख आहे. ही ओळख टिकवण्यासाठी अनेक लोककलावंत जिवाचे रान करून कष्ट करत आहे. परंतू या लोककलावंतांना सराव करण्यासाठी तसेच कार्यक्रम सादर करण्यासाठी हक्काची जागा मिळत नाही. अशा लोककलावंतांच्या सोयीसाठी महापालिकेने हक्काची जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी शाहीर हेमंतराजे मावळे यांनी केली. शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी तर्फे देण्यात येणारा शाहीर हिंगे युवा कलागौरव पुरस्कार युवा संगीतकार हर्ष विजय यांना शाहीर हेमंतराजे मावळे यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. पुणे महापालिकेचे उपायुक्त माधवराव जगताप, संस्कार भारतीचे पश्चिम प्रांत प्रतिनिधी दिलीप क्षीरसागर यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. युवा संगीतकार हर्ष विजय यांची पुरस्कार वितरण समारंभानंतर होनराज मावळे यांनी मुलाखत घेतली.

**Selected**

## महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत कापडी आकाशकंदील प्रशिक्षण



**पुणे :** वसुंधरा परिवार सोशल फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा योगिताताई गोसावी यांनी बचत गटातील महिलांना इकोफ्रेंडली कापडी आकाशकंदील बनवण्याचे प्रशिक्षण दिले. हिंदू सणांचा राजा म्हणजेच दीपावली. अंधार दूर करून प्रकाश निर्माण करणारा सण. हा प्रकाश भगिनींच्या प्रत्येक घरात व्हावा व महिला आर्थिकदृष्ट्या सबल व्हावी म्हणून योगिताताई गोसावी नेहमीच विविध प्रशिक्षण मोफत आयोजित करत असतात. मागच्या आठवड्यात महिलांना मेणपणत्या प्रशिक्षण दिले होते. महिलांनी हे प्रशिक्षण घेऊन त्यातून व्यवसाय करून चांगले उत्पन्न मिळवून आनंदाची दिवाळी साजरी करावी म्हणून पूर्णपणे मोफत हे प्रशिक्षण देण्यात आले. दिपावली म्हणजे दीपोत्सव. सर्वत्र दिवे, मेणपणत्या व आकाशकंदील लावून परिसर प्रकाशमय केला जातो. बाजारात आकाशकंदीलचे नवनवीन डिझाइन्स आपल्याला पहायला मिळतात. मी इकोफ्रेंडली आकाशकंदील बनवण्याचे ठरवले आणि आधी स्वतः साडीच्या ब्लाऊज पीस पासून एक कापडी आकाशकंदील बनवला व राहिलेल्या कापडामधून 2 छोटे आकाशकंदील बनवले. आकाशकंदील वर फॅब्रिक कलरने शुभ चिन्हे काढली. सर्व आकाशकंदील अतिशय सुंदर आणि तेही पारंपरिक व इकोफ्रेंडली आणि ते सुध्दा अतिशय कमी खर्चात. याच आकाशकंदीलची बाजारात किंमत 400 ते 500 रु आहे. म्हणून लगेच माझ्या बचत गटातील महिलांना हे प्रशिक्षण दिले तसेच विक्रीसाठी स्टॉल पण उपलब्ध करून दिले. महिलांना हे प्रशिक्षण खूप आवडले त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून खूप समाधान लाभले.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## सौर कृषी पंप योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

**पुणे :** सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने एकदा संच बसविला, की शेतकऱ्याला २५ वर्षे हक्काचे व स्वतंत्र सिंचनाचे साधन मिळते. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत शेतकऱ्यांनी अर्ज करण्यासाठी महावितरणच्या संकेतस्थळाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. केवळ १४ दिवसांत १ लाख २२ हजार शेतकऱ्यांनी त्यावर नोंदणी केली आहे.राज्य सरकारने मागेल त्याला सौर कृषी पंप ही योजना शेतकऱ्यांसाठी सुरू केली आहे. त्यासाठीची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज करता यावा,यासाठी महावितरणने संकेतस्थळ तयार केले असून, त्याचे उद्घाटन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दि. १३ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. त्यानंतर केवळ १४ दिवसांत म्हणजेच दि. २७ सप्टेंबरपर्यंत राज्यातील १,२२,४२१ शेतकऱ्यांनी संकेतस्थळावर अर्ज दाखल केले होते. या योजनेत शेतकऱ्यांना जमिनीच्या क्षेत्रफळानुसार तीन ते साडेसात एचपीपर्यंतचे पंप मंजूर होतात. शेतकऱ्यांना सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स व कृषी पंप असा सर्व संच केवळ दहा टक्के रक्कम भरून मिळतो.अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी लाभार्थी हिस्सा केवळ पाच टक्के आहे. शेतकऱ्यांना उर्वरित रक्कम केंद्र व राज्य सरकारकडून सबसिडीच्या स्वरूपात मिळते.शेतकरी पारंपरिक ग्रीडमधून मिळणाऱ्या वीज पुरवठ्यावर अवलंबून राहात नाही, तसेच त्याला बिलही येत नाही.सिंचनासाठी केवळ दिवसा वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांच्या सोयीचे होते. राज्य सरकारने ही योजना जाहीर केल्यानंतर शेतकऱ्यांकडून तिला खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे.* खालील वेबसाइटवर नोंदणी करामागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी https://www.mahadiscom.in/solar_MTSKPY/index_mr.php या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज दाखल करावा. संकेतस्थळावर योजनेविषयी संपूर्ण माहिती देण्यात आली आहे, तसेच शेतकरी वीज ग्राहकांचे शंका समाधान करण्यासाठी सविस्तर प्रश्नोत्तरेही आहेत. अर्ज दाखल केल्यानंतर पुढील प्रगतीची माहितीही संकेतस्थळावर तपासता येते.



## मानवी साखळी

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



### उद्धवराव तुळशीराम जाधवर फाउंडेशनच्या इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थीनींचा पुढाकार

# जाधवर इन्स्टिट्यूटमध्ये मानवी साखळीतून हृदयाचे महत्व

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जागतिक हृदय दिनाच्या निमित्ताने मानवी शरीरातील हृदयाचे महत्व विद्यार्थीनींना समजावे, या उद्देशाने न-हे येथील उद्धवराव तुळशीराम जाधवर फाउंडेशनच्या इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग च्या विद्यार्थीनींनी मानवी साखळीतून हृदय साकारले. हृदयाचे कार्य कशा प्रकारे होते, त्याची काळजी कशा प्रकारे घ्यायला हवी, याविषयी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देखील करण्यात आले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्य शितल निकम व सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होते. ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, जागतिक आकडेवारीनुसार हृदयविकार हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे. अधिकतर व्यक्ती हृद् रोहिणी विकार किंवा हृदयविकाराचा झटका आल्याने मरण पावतात. असंतुलित आहार, व्यायामाची कमतरता, धूम्रपान, मधुमेह, उच्च रक्तदाब, स्थूलता, हवाप्रदूषण ही हृदयविकाराची महत्त्वाची कारणे आहेत. हृदयविकारासंबंधित माहिती तसेच प्रतिबंधात्मक उपाय यांबद्दल चर्चा, फलक किंवा माहिती पत्रिका यांद्वारे यानिमित्ताने जनजागृती केली जाते. संतुलित आहार, व्यायाम यांद्वारे हृदयविकाराला प्रतिबंध होऊ शकतो, याबाबत माहिती दिली जाते. ती माहिती मानवी साखळीतून संस्थेत देण्यात आली.

## जीवराज चोले यांचा अभिनेते माधव अभ्यंकर यांच्या हस्ते विशेष सन्मान




**पुणे :** जागतिक पर्यटन दिनानिमित्त पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि परभन्ना फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवात उचित मीडिया सर्व्हिसेसचे प्रमुख व महोत्सवाच्या सल्लागार समितीचे सदस्य जीवराज चोले यांचा ज्येष्ठ अभिनेते माधव अभ्यंकर यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, संयोजक गणेश चप्पलवार, पर्यटन संचालनालयाचे आनंद जोगदंड आदी उपस्थित होते.

## बालकांच्या शिक्षणासंदर्भात राज्य शासनाचे धोरण तयार

**पुणे :** राज्यात पूर्वप्राथमिक शाळांवर शिक्षण तसेच महिला व बालकल्याण या दोन्ही विभागांचे नियंत्रण नाही. त्यामुळे नर्सरी शाळांचे पेव फुटले आहे. या शाळांमध्ये मनमानी शुल्क आकारले जाते; सोयी-सुविधा दिल्या जात नाहीत. त्या पार्श्वभूमीवर शाळांवर नियमन करण्यासाठी धोरण तयार केले आहे.



राज्यातील पूर्वप्राथमिक वर्गातील वय ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या शिक्षणासंदर्भात राज्य शासनाने धोरण तयार केले आहे. पूर्वप्राथमिक वर्गासाठीचा अभ्यासक्रम तयार झाला असून, पुस्तकांची छपाई पूर्ण केली आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.पूर्वप्राथमिक वर्गांसाठी किती शैक्षणिक शुल्क आकारावे; तसेच या शाळांमध्ये काय सोयी-सुविधा असाव्यात, याबाबत समिती स्थापन केली असून, अहवाल प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.तिसरी ते बारावी अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी मसुदा प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यावर सुमारे चार हजार तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याचे तज्ज्ञ समितीकडून खंडन करण्यात आले. राज्य अभ्यासक्रम आराखडा अंतिम केला आहे. पुस्तके तयार करण्यात येतील आणि पुढील शैक्षणिक वर्षांपासून त्याची राज्यात अंमलबजावणी केली जाणार आहे.

## शहर आनंदी व हसरे होण्यासाठी 'नवचैतन्य'ने पुढाकार घ्यावा- ना. पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



> मानवसेवा हीच ईश्वरसेवा आहे, अशी भावना समाजात रुजावी, सकारात्मकता वाढावी, तसेच हास्ययोग लोकप्रिय व्हावा, यासाठी लिम्का बुक किंवा गिनीज बुक यांसारख्या विश्वविक्रमात त्याची नोंद व्हावी. या विश्वविक्रमी कार्यक्रमाच्या संयोजनात माझा पुढाकार राहील व त्यासाठी लागणारी सर्वतोपरी मदत मी करेल. एकाच वेळी २५ हजार लोक हास्ययोग करत आहेत, असा विक्रमी उपक्रम येत्या काही महिन्यात घेतला जावा." — चंद्रकांत पाटील

**पुणे :** "हास्यक्लब ही आता चळवळ झाली असून, यांसारख्या चांगल्या उपक्रमाची संख्या वाढली पाहिजे. लोकांना आनंद वाटून समाजात नवचैतन्य पेरण्याचे काम करणाऱ्या अनेक अराजकीय संस्था पुण्यात काम करत आहेत. अशा सर्व संस्थांना एकत्रित आणून समन्वयाने काम केले, तर पुणे शहर आनंदी व हसरे होईल. त्यासाठी नवचैतन्य हास्ययोग परिवाराने पुढाकार घ्यावा," असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

नवचैतन्य हास्ययोग परिवाराच्या वर्धापन दिनानिमित्त गणेश कला क्रीडामंच येथे आयोजित मेळाव्याचे उद्घाटन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. प्रसंगी केंद्रीय हवाई वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, पीतांबरीचे मुख्य विक्री अधिकारी मंदार फडके,रॉयल पुरंदर चे राजेश कोठारी उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते प्रकाश धोका, 'नवचैतन्य'चे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल काटे, सुमन काटे, मुख्य समन्वयक मकरंद टिल्लू, उपाध्यक्ष विजय भोसले, सचिव पोपटलाल शिंगवी, खजिनदार ॲड. रामचंद्र राऊत, जयंत दशपुत्रे आदी उपस्थित होते. कॉर्पोरेट कीर्तनकार समीर लिमये यांचे प्रबोधनात्मक व्याख्यान झाले. 'जगणे सुदृढ होण्यासाठी हास्ययोग हे टॉनिक आहे. नवचैतन्य हास्ययोग परिवाराने ज्येष्ठांच्या आयुष्यात परिवर्तन घडवले आहे. यातूनच सुदृढ समाज निश्चित तयार होईल,' असा विश्वास मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला. 'नवचैतन्य' समाजाला सकारात्मक ऊर्जा देण्याचे काम करत असून, महाराष्ट्रात सुरू असलेले हे कार्य दिल्लीपर्यंत नेण्यासाठी सहकार्य करेन, असे प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी सांगितले.

विठ्ठल काटे यांनी हास्ययोग चळवळीचा होत असलेला विस्तार, त्यातून लोकांना होणारा लाभ आणि हास्ययोगाचे महत्व विशद केले. दुसऱ्याला आनंदी करण्याचे काम आम्ही करत आहोत, असेही ते म्हणाले. तसेच मकरंद टिल्लू व सुमन काटे यांच्यासोबत विविध हास्यप्रकार घेत सभागृहात नवचैतन्य फुलवले.

हास्ययोग परिवारात २३० शाखा, २५ हजार सदस्य आहेत. येत्या काळात एक लाख सदस्य करण्याचे आमचे ध्येय असून, सोसायट्यांमधून हास्यक्लब सुरु करण्याचा प्रयत्न असे मकरंद टिल्लू यांनी नमूद केले.

## बाजार समिती राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात कृषी मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करुन त्यांचेमार्फत निर्यातवृध्दी करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. तर कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणाबरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे. मागील ४० वर्षांपासून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उपबाजार यांच्या माध्यमातून राज्यात उत्पादित शेतमालाची सुरळीत विक्री व्यवस्था विकसीत करण्याचे कामकाज सुरु आहे. पण बदलत्या काळानुरूप बाजार समित्यांच्या कामकाजामध्ये करावयाचे बदल, सोयी-सुविधा, अडचणी आणि उपायांवर चर्चा करण्यासाठी राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

कृषि पणन मंडळाकडून कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत.

### पदोन्नती प्रक्रिया गेल्या दोन वर्षांपासून रखडली

# आचारसंहितेपूर्वी आमची पदोन्नती करा !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महापालिकेच्या वरिष्ठ लिपिक, लिपिक टंकलेखक पदावरील कर्मचाऱ्यांची पदोन्नती प्रक्रिया गेल्या दोन वर्षांपासून रखडली आहे. प्रशासनाकडून याबाबत वेळखाऊ धोरण अवलंबले जात आहे. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या आधी प्रक्रिया पूर्ण करून पदोन्नती द्यावी, अशी मागणी पुणे महापालिका मागासवर्गीय कर्मचारी संघटनेकडून महापालिका आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे.

महापालिकेच्या वरिष्ठ लिपिक, लिपिक टंकलेखक पदावरील कर्मचाऱ्यांची पदोन्नती प्रक्रिया गेल्या दोन वर्षांपासून रखडली आहे. प्रशासनाकडून याबाबत वेळखाऊ धोरण अवलंबले जात आहे. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या आधी प्रक्रिया पूर्ण करून पदोन्नती द्यावी, अशी मागणी पुणे महापालिका मागासवर्गीय कर्मचारी संघटनेकडून महापालिका आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे.

संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पदोन्नतीचे प्रस्ताव जलद गतीने निकाली काढणेच्या अनुषंगाने विभागीय पदोन्नती समितीची बैठक प्रतिवर्षी सप्टेंबरमध्ये घ्यावी. त्यात पदोन्नतीची प्रक्रिया विनाविलंब पूर्ण करावी, असे आदेश सरकारने याआधीच दिले आहेत. पदोन्नतीचे प्रस्ताव जलद गतीने निकाली काढणेसाठी विहित वेळापत्रकाचे पालन करावे ज्यामुळे पात्र अधिकारी-कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तपूर्वी पदोन्नतीपासून वंचित राहावे लागणार नाही. असे परिपत्रक असतानाही गेल्या वर्षी वरिष्ठ लिपिक ते उपअधीक्षक पदासाठी पदोन्नती समितीची बैठक आयोजित करणेत आलेली नव्हती. त्यामुळे उपअधीक्षकपदाच्या अनेक जागा रिक्त असून अनेक कार्यालयात उपअधीक्षक नसल्याने कार्यालयीन कामाची गैरसोय होत आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुका या केव्हाही घोषित होऊन आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. #रा

# सुनील टिंगरे यांनी उडवली सुरेंद्र पठारे यांची खिल्ली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात शरद पवारांच्या उपस्थितीत पठारे पिता-पुत्र आणि दहा माजी नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातील तीन माजी नगरसेवक, सुरेंद्र पठारे यांच्यासह बापूसाहेब पठारेंनी शरद पवारांच्या तुतारी चिन्हावर निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे. सुरेंद्र पठारे यांनी आज पुण्यात मोदी बागेत शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सुनील टिंगरे यांची खिल्ली उठवली.

शरद पवार यांनी खराडी येथील सभेत आमदार सुनील टिंगरे यांच्यावर जोरदार टीका केली. त्यावर सुनील टिंगरे यांनी 'साहेब आमचे दैवत आहे. त्यांना आमचा कान पकडण्याचा अधिकार आहे, मी त्यांच्या टीकेला उत्तर देणे मला शोभत नाही," अशी प्रतिक्रिया दिली होती. त्याला सुरेंद्र पठारे यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. "साहेब दैवत आहेत, असे ते म्हणतात, मग साहेबांना ते का सोडून गेले," असा टोला सुरेंद्र पठारे यांचा सुनील टिंगरे यांना टोला लगावला.

सुरेंद्र पठारे म्हणाले, "भावनिकतेच्या दृष्टीने या सगळ्या गोष्टी बोलण्यासारख्या असतात. खरंच जर साहेबांना दैवत मानलं असतं तर साहेबांना कधीही सोडून गेले नसते. साहेबांना सोडून गेलेले लोकांना न पटलेलं असून दोन दिवसांपूर्वी झालेल्या सभेत लोकांनी ते दाखवून दिले.

"विधानसभा निवडणुका जवळ येत असल्याने अनेक पदाधिकारी शरद पवारांची भेट घेत आहे.वडगाव शेरी मतदारसंघात दोन दिवसापूर्वी महान निर्धार मेळावा सुरेंद्र पठारे यांनी आयोजित केला होता.

## परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर-उद्योगमंत्री सामंत

# 'महाराष्ट्राची उद्योग भरारी'ला उद्योजकांचा प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य सरकारने उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी घेतेलेले निर्णय, राबविण्यात आलेल्या योजना, उद्योजकांना उपलब्ध करुन दिलेल्या उच्च दर्जाच्या सुविधा, औद्योगिक वसाहतीत केलेली पायाभूत सुविधांची कामे यामुळे उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक आली असून उद्योगस्नेही धोरणामुळे महाराष्ट्र राज्य परकीय गुंतवणूकीत प्रथम क्रमांकावर आहे असे प्रतिपादन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले.




» औद्योगिक

'महाराष्ट्राची उद्योग भरारी' या उद्योग विभागाच्यावतीने गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. खासदार श्रीरंग बारणे, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.शिवाजी पाटील, उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, मुख्य अभियंता नितीन वानखेडे यावेळी उपस्थित होते.

मी स्वत: उद्योजक असून उद्योजकांच्या अडचणींची आणि त्यांच्या समस्येची मला चांगली जाणीव आहे असे सांगून उद्योगमंत्री श्री.सामंत म्हणाले, महाराष्ट्राची उद्योग भरारी हा कार्यक्रम उद्योग विभागातर्फे राबविण्यात आलेल्या योजनांची पारदर्शकता दाखविणारा आहे. उद्योगांसाठी शासन सकारात्मक आहे. महाराष्ट्रात सात ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. आतापर्यंत नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. लहान आणि मोठया उद्योजकांचे महाराष्ट्रात स्वागतच आहे. उद्योग क्षेत्रात पुरुषांसोबतच महिलाही पुढाकार घेत आहे. राज्याच्या उद्योगस्नेही धोरणामुळे एकही उद्योग राज्याबाहेर गेला नाही. उद्योग विभागावर केलेल्या टीकेमुळे महाराष्ट्राचे नुकसान होते हे टीका करणाऱ्यांनी लक्षात ठेवावे असे त्यांनी सांगितले केले.

औद्योगिक क्षेत्रात जवळपास पंच्याहत्तर हजार कोटी रुपयांची गुतवणूक आली असून परकीय गुंतवणूकीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. सुमारे अडीच हजार कोटी रुपये खर्चून राज्यातील २८९ औद्योगिक वसाहतींमध्ये पायाभूत सोईसुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. बीडकीन औद्योगिक क्षेत्रात ५२ हजार कोटी रुपयांची, एक लाख कोटी रुपयांची विदर्भात तसेच कोकण औद्योगिक क्षेत्रात १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या महत्वाकांक्षी योजनेद्वारे महिलांना शासनातर्फे आर्थिक मदत करण्यात येते. ही रक्कम बाजारात येण्यामुळे त्याचा उद्योग क्षेत्राला फायदा होणार असल्याचे श्री.सामंत यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेंतर्गत १० नवीन उद्योजकांना उद्योगमंत्र्यांच्याहस्ते पाच कोटी रुपयांच्या अनुदानाचे वितरण करण्यात आले. खासदार श्री. बारणे म्हणाले, उद्योजकांचा उद्योग विभागातर्फे सत्कार करणे चांगली संकल्पना आहे. पुणे व परिसरातील उद्योजक व कामगारांच्या समस्या सोडविण्याला शासनाने प्राधान्य दिले असून, रिंग रोड व मेट्रोच्या जाळयामुळे वाहतूक समस्या सुटण्यास मदत झाली आहे. विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार म्हणाले, महाराष्ट्र हे प्रगत राज्य असून त्यामध्ये औद्योगिक क्षेत्राचा मोठा वाटा आहे. उद्योगस्नेही धोरणामुळे उद्योगांची भरभराट झाली आहे. विभागीय आयुक्त या नात्याने विभागातील उद्योजकांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य देण्यात येईल व प्रशासनाकडून उद्योजकांना सर्व प्रकारचे सहकार्य देण्यात येईल असे सांगितले.

## अवतीभवती
CITY UPDATE



### संत निरंकारी मिशन आयोजित रक्तदान शिबीर संपन्न

**पुणे :** सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पवित्र आशीर्वादाने रविवार, २९ सप्टेंबर २०२४ रोजी संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनद्वारा विशाल रक्तदान शिबिरांचे आयोजन शाखा धायरी व शाखा हडपसर, झोन पुणे येथे करण्यात आले होते.यामध्ये शाखा धायरी येथे २५१ आणि शाखा हडपसर येथे १७० संत निरंकारी मिशनच्या अनुयायांनी निस्वार्थीपणे रक्तदान केले. रक्त संकलनासाठी संत निरंकारी रक्तपेढी मुंबई, वाय. सी.एम. हॉस्पिटल रक्तपेढी, औंध रुग्णालय रक्तपेढी आणि ससून हॉस्पिटल रक्तपेढी यांनी आपले योगदान दिले. या शिबिराचे उद्घाटन आदरणीय ताराचंद करमचंदानी जी (झोनल इन्चार्ज-पूना झोन) यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. उद्घाटन प्रसंगी ते म्हणाले की, रक्ताला पर्याय नाही, रक्तदान हीच सर्वात मोठी मानव सेवा आहे आणि ती पूर्ण करण्यासाठी पुणे झोन मध्ये मिशनद्वारा दर महिन्याला तीन ते चार रक्तदान शिबिरे आयोजित केली जातात, ज्यामध्ये अनेक रक्तदाते सहभागी होत असतात.

### जागतिक हृदय दिनानिमित्त 'वॉकोहोलिक' चॅलेंजचा केला समारोप

**पुणे :** वर्ल्ड हार्ट डे निमित्त मॅग्मा एचडीआयने आपल्या 'वॉकहोलिक' चॅलेंजच्या यशस्वी समारोपाची घोषणा केली आहे, ज्यामध्ये कर्मचाऱ्यांची तंदुरुस्तीची वचनबद्धता आणि हृदयाच्या आरोग्यासाठी शारीरिक क्रियाकलापांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. सुमारे 300 कर्मचाऱ्यांनी या महिनाभर चाललेल्या चॅलेंजमध्ये स्वेच्छेने भाग घेतला, ज्यामध्ये दररोज चालण्याचे ध्येय ठेवून त्यांच्या तंदुरुस्तीला प्राधान्य दिले. सहभागी कर्मचाऱ्यांना 12 टीम्समध्ये विभागले गेले होते आणि त्यांनी एकत्रितपणे 28,980 किलोमीटर चालण्याचे ध्येय गाठले, जे साधारणपणे काश्मीर ते कन्याकुमारीच्या 7.8 प्रवासांच्या बरोबरीचे आहे. या उपक्रमाला तंत्रज्ञान भागीदार स्टेप सेट गो यांचा पाठिंबा होता, ज्यामुळे गेमिफिकेशन आणि मैत्रीपूर्ण स्पर्धेचा वापर करून संस्थेच्या आत एक डायनॅमिक वेलनेस कम्युनिटी तयार करण्यात आली. कर्मचारी आपली प्रगती ट्रॅक करू शकत होते, बक्षिसे जिंकू शकत होते आणि एक मजेदार, आकर्षक पद्धतीने स्पर्धा करू शकत होते, ज्यामुळे संघभावना आणि सहकार्याची भावना वाढली. मॅग्मा एचडीआयचे मुख्य मानव संसाधन अधिकारी, अनिलकुमार सत्यवर्पू म्हणाले, "मॅग्मा एचडीआयमध्ये आम्हाला विश्वास आहे की कर्मचारी तंदुरुस्ती ही संस्थेच्या यशाचा मुख्य आधार आहे. वॉकहोलिक चॅलेंज हे एक निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्याचा आमचा मार्ग होता, तसेच संघभावना आणि सहकार्य वाढवण्याचा उद्देश होता. वर्ल्ड हार्ट डेच्या निमित्ताने वॉकहोलिक चॅलेंजचा समारोप हा हृदयाच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी योग्य संधी होती, तसेच आमच्या कर्मचाऱ्यांच्या समर्पणाचा उत्सव साजरा करण्यासाठी देखिल विजेत्यांना सन्मानित करून आम्ही कार्यक्षेत्रापलीकडे जाऊन वेलनेसची संस्कृती वाढवण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकटी देत आहोत.

### मनमानी करणाऱ्या व्हॅनचालकांवर कारवाईची मागणी

**सिंहगड रस्ता :** सिंहगड रस्ता, धायरी, वडगांव परिसरात खाजगी शाळेतील व्हॅनचालकांच्या मनमानीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या मनमानी विरोधात शिक्षण विभाग , वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागाने गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी अशी मागणी आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बनकर यांनी केली आहे. अनेक वेळा व्हॅनचालक विद्यार्थ्यांना शाळेत नेण्यासाठी वेळेत येत नाहीत. पूर्वकल्पना न देता सुट्टी घेतात. फोन केल्यानंतर आज व्हॅन बंद पडली आहे. बाहेरगावी गेलो आहे यासारखी विविध कारणे सांगतात. त्यामुळे पालकांना मनस्ताप होतो. शैक्षणिक नुकसान होते. अचानकपणे रात्री मोबाईलवर मेसेज करून उद्या व्हॅन येणार नाही असे मेसेज करतात. शैक्षणिक वर्ष दहा महिन्याचे असले तरी बारा महिन्याचे शुल्क घेतात. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया विविध पालकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर दिल्या.

# तर महाविकास आघाडी जबाबदार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपाच्या प्रक्रियेत महाराष्ट्रातील सर्व डावे व लोकशाहीवादी पक्ष व पुरोगामी संघटनांच्या मागण्यांचा महाविकास आघाडीने तातडीने विचार करावा. महाविकास आघाडीने सर्वसमावेशक भूमिका घ्यावी. जागा वाटपाच्या चर्चेत आम्हाला सहभागी करून न घेतल्यास होणाऱ्या नुकसानीस आघाडी जबाबदार असेल, अशा इशारा माकपचे राज्य सचिव डॉ. उदय नारकर यांनी दिला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने १२ जागांची मागणी महाविकास आघाडीकडे केली आहे. पण, आमच्या मागणीकडे लक्ष न देताच महाविकास आघाडीतील घटक पक्षांची जागा वाटपाची चर्चा सुरू आहे. हा प्रकार महाविकास आघाडीच्या एकजुटीसाठी घातक आहे, असा इशारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने (माकप) दिला आहे.

पक्षाची भूमिका मांडताना डॉ. अजित नवले म्हणाले, माकप व जनसंघटनांचे चांगले काम असलेल्या, प्रदीर्घ आणि यशस्वी लढे दिलेल्या ठिकाणच्या जागांची मागणी केली आहे. आमची मागणी मर्यादित जागांची असून, आम्ही आमच्या मागणीवर ठाम आहोत. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते शरद पवार, जयंत पाटील, उद्धव ठाकरे, नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांची भेट घेऊन या बाबत आपली भूमिका दोन महिन्यांपूर्वीच स्पष्ट केली होती. पक्षाच्या वतीने लढणार असणाऱ्या १२ जागांची यादी या सर्व नेत्यांना त्यावेळीच लिखित स्वरुपात सादर केली होती. महाविकास आघाडीने या १२ जागा माकपला सोडाव्यात व त्यानंतरच उर्वरित जागांच्या बाबत आपसात वाटाघाटी कराव्यात, अशी मागणी केली होती. पण, महाविकास आघाडीतील प्रमुख तीन पक्ष माकप व डाव्या पुरोगामी शक्तींना गृहीत धरून जागा वाटपाबाबत आपसात चर्चा करत आहेत. इतर डावे पक्ष व पुरोगामी शक्तींना अद्याप या प्रक्रियेत सामावून घेण्यात आल्याचे दिसत नाही. महाविकास आघाडीच्या अंतर्गत एकजुटीसाठी हे घातक आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये सुद्धा महाविकास आघाडीने लोकसभेच्या महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व ४८ जागा तीन मुख्य पक्षांमध्ये वाटून घेतल्या व त्यानंतर इतर पक्षांच्या बरोबर त्यांचा केवळ पाठिंबा मिळवण्यासाठी चर्चा केली.

## एपीआय आणि ग्लेनमार्क तर्फे

# प्रत्येक महिन्याची १८ तारीख राष्ट्रीय बीपी स्क्रीनिंग दिवस म्हणून जाहीर

**पुणे :** हृदयविकार व्यवस्थापनातील कौशल्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेडने (ग्लेनमार्क) आज गेटवे ऑफ इंडिया येथे टेक चार्ज एट १८ ही हायपरटेन्शन जागरूकता मोहीम सुरू केली. लवकर म्हणजे वयाच्या १८ व्या वर्षांपासूनच रक्तदाबाचे निरीक्षण करण्याचे महत्त्व पटवून देणे यावर या उपक्रमाचा भर आहे.

असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडियातर्फे (एपीआय) प्रत्येक महिन्याची १८ तारीख टेक चार्ज एट १८ - बीपी स्क्रीनिंग दिवस म्हणून जाहीर करण्यात आली आहे. त्यायोगे हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी सर्व प्रौढांनी नियमित रक्तदाब तपासणी करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. ग्लेनमार्क आणि एपीआय यांच्या या सहयोगातून हायपरटेन्शन जनजागृती आणि निदान वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे.

गेटवे ऑफ इंडियावर या मोहिमेचे उद्घाटन दोन तासांच्या लक्षणीय ३डी व्हिडीओ प्रक्षेपणाने झाले. त्यामध्ये प्रारंभिक रक्तदाब निरीक्षणाचे महत्त्व प्रभावीपणे दर्शविले गेले. हायपरटेन्शनसंदर्भात जनजागृती आणि जनप्रबोधन करण्याची या मोहिमेची बांधिलकी जपत हे नाविन्यपूर्ण सादरीकरण लोकांना कृती करायला प्रवृत्त करणारे शक्तिशाली साधन बनले. विविध प्लॅटफॉर्मवरुन एक लाखांहून अधिक वैद्यकीय व्यवसायिकांपर्यंत पोहोचत या प्रभावी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. ग्लेनमार्कने या उपक्रमाच्या माध्यमातून १० कोटी भारतीयांना हायपरटेन्शनबद्दल जागरूक करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ही मोहिम रक्तदाब निरीक्षणाला कोणत्या वयात सुरुवात करावी, योग्य वय कोणते असावे याबद्दलच्या जागरूकतेविषयी असलेली महत्त्वाची दूरी भरून काढते. सध्या अनेक तरुण प्रौढ हायपरटेन्शन आणि हृदयविकाराचा झटका यांसारख्या त्याच्या जीवघेण्या गुंतागुंतीच्या धोक्यांना सामोरे जात आहेत.

# सरकारकडून लाडक्या बहिणींचा छळ - संभाजी ब्रिगेडचा आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सरकारने काढली. प्रत्येक महिलेला 1500 रुपये देण्याचे आश्वासन दिले. त्यातील काही महिलांना पैसे आले, मात्र अजून बऱ्याच महिलांना त्यांच्या खात्यामध्ये सगळी कागदपत्राची पूर्तता करून सुद्धा 1500 रुपये आलेले नाहीत. बऱ्याच महिलांची या योजनेसाठी नाव नोंदणी राहिलेले आहे. परंतु सरकारने मोबाईल वरील नारीशक्ती ऐप व वेबसाईट ही दोन्ही बंद केलेलं आहे. हे अत्यंत चुकीचे आहे. तात्काळ वेबसाईटवर मोबाईल ॲप सुरू करावे अशी संभाजी ब्रिगेडची मागणी आहे.

बऱ्याच महिलांचे बँकेला आधार कार्ड लिंक नाही, आधार कार्ड अपडेट नव्हते किंवा बँक खाते नव्हते. अशा महिलांना पैसे मिळालेले नाहीत. त्यांच्यामध्ये प्रचंड अस्वस्थपणा, अपराधाची भावना निर्माण झालेली आहे. जाणीवपूर्वक तमाम महिलांचा मानसिक छळ सुद्धा सरकारच्या या ढिसाळ कारभारामुळे होत आहे.

# नगर महामार्गावर क्षमतेपेक्षा जास्त जड वाहनांना बंदी आणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मागील काही महिन्यांत अवजड वाहनांच्या धडकेत नगर महामार्गावर वाघोली येथे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. नगर महामार्गावर क्षमतेपेक्षा जास्त दगड, खडी, मुरूम भरून अवजड वाहने वाहतूक नियमांचे उल्लंघन करून सुसाट धावत आहेत. या वाहनांवर वाहतूक पोलिस, प्रादेशिक परिवहन आणि महसूल विभागाने संयुक्त कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

परिवहन विभागासह वाहतूक व महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे परिसरात क्षमतेपेक्षा जास्त माल घेऊन जाणाऱ्या अवजड वाहनांची संख्या वाढली आहे. वाहतूक शाखेकडून अवजड वाहनांसाठी पुणे-नगर रोडसह इतर रस्त्यांवर सकाळी 7 ते 10 आणि सायंकाळी 5 ते रात्री 9 वाजेपर्यंत अवजड वाहतूक करण्यास मनाई असतानासुद्धा अवजड वाहने नियमांचे उल्लंघन करत धावताना दिसून येत आहेत. गेल्या काही दिवसांपासून परिसरात अवजड वाहनांची जीवघेणी स्पर्धा वाढली असल्याचे चित्र दिसून येत आहे. बहुतांश वाहने राजकीय नेते, कार्यकर्त्यांची असल्याने परिवहन, महसूल व वाहतूक विभागांकडून कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात आहे. क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, कर्कश हॉर्न वाजवणे, भरधाव वेगाने धोकादायकरीत्या वाहने चालवण्याच्या स्पर्धेमुळे परिसरातील अनेक निष्पाप लोकांना गेल्या काळात जीव गमवावा लागला आहे.

# विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वामी विवेकानंद जीवनज्योत संस्था संस्थापक गोवा पद्मश्री मोहन रानडे या संस्थेचा विद्यार्थी मेळावा अंबर सभागृह,कर्वे रोड कोथरूड पुणे येथे उत्साहात संपन्न झाला . या स्नेह मेळाव्याला पयोद इंडस्ट्रीज, सांगली चे स्नेहल लोंढे व देवानंद लोंढे हे प्रमुख पाहुणे ,संस्थेचे अध्यक्ष एम डी देशपांडे, उपाध्यक्ष गणेश कुलकर्णी, श्रीकांत कुलकर्णी, खजिनदार श्री.सतीश टंकसाळे आदी उपस्थित होते.

## RS NEWS DIGEST


### फेडरल बँकेने एनपीएस वात्सल्य केले लाँच

**पुणे :** फेडरल बँकेने 'एनपीएस वात्सल्य' या राष्ट्रीय पेन्शन प्रणाली अंतर्गत अल्पवयीनांसाठी खास उपक्रमाची घोषणा केली आहे. भारत सरकारने १८ सप्टेंबर २०२४ रोजी सुरू केलेल्या या उपक्रमाचा उद्देश मुलांसाठी सुरक्षित आणि लवचिक निवृत्ती योजना उपलब्ध करून देणे आहे, ज्यामुळे कंपाऊंडिंगच्या शक्तीद्वारे दीर्घकालीन संपत्ती निर्माण करता येईल. फक्त रु. १,000 वार्षिक योगदानाने, ही योजना सर्व आर्थिक स्तरांतील कुटुंबांना उपलब्ध आहे, ज्यामुळे आर्थिक समावेशनाला चालना मिळते आणि लहान वयात आर्थिक नियोजनाचे महत्त्व समजावले जाते. "एनपीएस वात्सल्य हा आपल्या मुलांचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. लहान वयातच सुरुवात करून, आपण त्यांना मजबूत आर्थिक आधार देऊ शकतो," असे फेडरल बँकेचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि कंट्री हेड – डिपॉझिट्स, वेल्थ आणि बँकविमा, पी. व्ही. जॉय यांनी सांगितले. "देशातील नागरिकांसाठी ही योजना आणताना आम्हाला आनंद होत आहे, कारण सरकारने दीर्घकालीन आर्थिक नियोजन आणि सुरक्षा वाढवण्यासाठी हा उपक्रम सुरू केला आहे.

## धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमांनी साजरा होणार 'सार्वजनिक नवरात्रोत्सव'

# श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे नारीशक्तीचा होणार सन्मान

**पुणे :** श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट च्यावतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवाचा प्रारंभ गुरुवार, दिनांक ३ ऑक्टोबर पासून होणार आहे. दिनांक ३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान धार्मिक कार्यक्रमांसोबतच सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम देखील आयोजित करण्यात आले आहेत. संपूर्ण उत्सवात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांच्या हस्ते आरती व त्यांचा सन्मान सोहळा देखील आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती ट्रस्टच्या विश्वस्त व उत्सवप्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.



पत्रकार परिषदेला ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, अमिता अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, भरत अग्रवाल, तृप्ती अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर आदी उपस्थित होते.

गुरुवारी (दि.३) सकाळी ८ वाजता पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते घटस्थापना होणार आहे. तसेच, सायंकाळी ६ वाजता मंदिरावरील विद्युतरोषणाईचे उद्घाटन सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या हस्ते होईल. याशिवाय दहा दिवसात श्री सुक्त अभिषेक, श्री विष्णु सहस्त्रनाम पाठ, महालक्ष्मी महायाग, महाआरती असे धार्मिक कार्यक्रम देखील मंदिरामध्ये होणार आहेत. सर्व धार्मिक कार्यक्रमांचे पौरोहित्य मिलिंद राहुरकर यांच्या मार्गदर्शना खाली होतील.

याशिवाय ढोल-ताशा वादनसेवा, पुणे मनपा महिला कर्मचारी सन्मान, नामांकित कंपन्यांमधील महिला एचआर यांचा सन्मान, महिला न्यायाधिशांचा सत्कार, लेखिका-कवयित्री सन्मान, पुणे मनपा स्वच्छता कर्मचारी सत्कार, कन्यापूजन, विविध शाळांतील शिक्षकांद्वारे भोंडला, वीरमाता-वीरपत्नी सन्मान, नारी तू नारायणी सन्मान सोहळा असे विविध कार्यक्रम होणार आहेत. तसेच सांस्कृतिक उपक्रमांमध्ये शिव-पार्वती विवाह सोहळा, कथकली नृत्य, छत्रपती शिवाजी महाराजांवरील नाटय व पोवाडा सादरीकरण, सामुहिक गरबा आणि प्रतिकात्मक रावण दहन कार्यक्रम हे यंदाचे वैशिष्टय असणार आहे. धार्मिकतेला सामाजिकतेची जोड देणारा समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारा 'सार्वजनिक नवरात्र उत्सव' महालक्ष्मी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही साजरा होणार आहे.

शुक्रवारी (दि.४) पहाटे ५ वाजता महिलांचे सामुहिक श्रीसूक्त पठण होणार आहे. यावेळी पारंपरिक वेशात ५ ते ७ हजार महिला सहभागी होणार आहेत. तर, सायंकाळी ५ वाजता पुणे महानगरपालिकेतील महिला कर्मचा-यांचा सन्मान सोहळा कार्यक्रम मंदिरात होईल. रात्री ८.३० वाजता शिव-पार्वती विवाह सोहळा नाटयरुपात सादर होणार आहे. शनिवारी (दि.५) सायंकाळी ५ वाजता विविध नामांकित कंपन्यांमधील महिला एचआर यांच्या हस्ते आरती व त्यांचा सन्मान सोहळा होईल. रविवारी (दि.६) सायंकाळी ५ वाजता महिला न्यायाधिशांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून रात्री ८.३० वाजता देवी आणि श्रीकृष्णावर आधारित कथकली नृत्य सादरीकरण होणार आहे. सोमवारी (दि.७) ललिता पंचमीच्या दिवशी दुपारी ४ वाजता पुणे महानगरपालिकेतील महिला स्वच्छता कर्मचा-यांच्या हस्ते आरती होईल.

### स्काऊटिंगमध्ये संघपद्धतीच्या माध्यमातून एकत्रीत कामाची भावना रुजवावी - कर्नल पत्की



**पुणे :** स्काऊटिंगच्या माध्यमातून प्रथमोपचारासारखी जीवनोपयोगी कौशल्ये श्री शिवाजी कुल संस्थेत प्रत्यक्ष मैदानावर शिकविली जातात. तसेच संघपद्धतीच्या माध्यमातून एकत्रीत काम करण्याची संघभावना देखील आजच्या पिढीमध्ये रुजविण्याचे काम सुरु आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वच वयोगटातील कुलवीर संस्थेत एकत्रितपणे काम करतात, ही बाब कौतुकास्पद आहे, असे मत कर्नल विक्रम पत्की (निवृत्त) यांनी व्यक्त केले. सदाशिव पेठेतील श्री शिवाजी कुल, पुणे या स्काऊट गाईड खुल्या पथकाचे १०७ वे वर्ष आहे. त्यानिमित्ताने श्री शिवाजी कुल व माजी कुलवीर संघातर्फे गंज पेठेतील टिंबर मार्केटजवळील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन येथे कुलरंग महोत्सव व बालकार्य सन्मान प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, ज्येष्ठ कुलवीर माधव धायगुडे, वाडकर आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्रवाऱ्यांचा अन्वयार्थ

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांचे वारे जोरात वाहू लागले आहेत. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्रावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. केंद्रीय गृहमंत्री अलीकडेच भाजपच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी नागपूरमध्ये आले होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून बैठकीला सुरुवात करण्यात आली. विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने शहा यांनी कार्यकर्त्यांना रणनीतीबाबत मार्गदर्शन करताना सज्जड दम दिला. राज्य विधानसभा निवडणुकांची घोषणा पुढील आठवड्यात होण्याची शक्यता असल्याने सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले असून, राष्ट्रीय पक्षांचे नेते राज्यातील नेत्यांसमवेत बैठका घेऊन रणनीती ठरवत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शहा यांनी पक्षाच्या पदाधिका–यांशी संवाद साधला. राज्यातील सत्तारूढ महायुती आणि भाजपने उमेदवारी जाहीर केल्यानंतर पक्षातील नेत्यांनी बंडखोरी केल्यास ते कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही असा सज्जड दम अमित शहा यांनी पदाधिका–यांना दिला. भाजपला विदर्भच ही निवडणूक जिंकून देणार आहे. मतदारसंघात गटबाजी सहन केली जाणार नाही, उमेदवारी मिळाली नाही म्हणून नाराजी हे प्रकार सहन केले जाणार नाहीत. आता सणासुदीचे दिवस येत आहेत. त्यामुळे विजयादशमीपासून धनत्रयोदशीपर्यंत प्रत्येक बूथवर तरुण कार्यकर्त्यांनी फिरले पाहिजे, असे ते म्हणाले. निवडणुकांच्या निमित्ताने अमित शहा इंजेक्शन देत असले तरी आयाराम–गयारामांवर त्याचा काही परिणाम होईल असे वाटत नाही. महाराष्ट्रातील निवडणुकांच्या निकालाचा परिणाम देशात होतो. पश्चिम बंगाल, केरळ आणि तामिळनाडू या राज्यांत आपली सत्ता आणायची असेल तर महाराष्ट्रात विजय महत्त्वाचा आहे. त्यासाठी महाविकास आघाडीच्या बूथवरील कार्यकर्ते, स्थानिक पदाधिकारी आपल्यासोबत जोडा असे आवाहन केंद्रीय गृहमंत्र्यांनी केले. येणारी विधानसभा निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातील निकालाचे पडसाद इतर राज्यांमध्ये उमटणार आहेत. येणारी विधानसभा काबीज केल्यास पुढील लोकसभा निवडणुकीत आपले तीनशे पार खासदार असतील. म्हणून प्रत्येकाने मनापासून कामाला लागा अशा सूचनाही शहा यांनी केल्या. म्हणजेच भाजपच्या डोक्यातून तीनशे पार–चारशे पारचे फॅड अजूनही जात नाही! मित्रपक्षांच्या उमेदवारांचे कामही भाजपचा उमेदवार म्हणूनच करा असे सांगण्यासही शहा विसरले नाहीत. महाराष्ट्रातील २०२४ ची निवडणूक ही वैचारिक लढाई आहे. एक कार्यकर्ता म्हणून संकल्प घेऊन पक्षाचे काम करा. लोकसभा निवडणुकीत कमी जागा मिळाल्याचा ठपका पुसून टाका. धैर्याने निवडणुकीला सामोरे जा, असे आवाहनही शहा यांनी कार्यकर्त्यांना केले. विधानसभा निवडणुकीत अंतर्गत हेव्यादाव्यापासून दूर राहा. पाडापाडीचे राजकारण करू नका असा संदेशही अमित शहा यांनी दिला. लोकसभा निवडणुकीत उत्तर महाराष्ट्रात महायुतीला ४७ टक्के मते मिळाली. विधानसभा निवडणुकीत हे प्रमाण ५१ टक्क्यांवर जाणे आवश्यक आहे. लाडकी बहीण योजनेचा सुमारे अडीच कोटी महिलांना लाभ होणार आहे. त्यामुळे साधारणत: ७० लाख मतांचा फरक भरून काढण्यासाठी प्रयत्न करावे लागतील असेही शहा म्हणाले. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीमध्ये भाजपला विजयासाठी दहा टक्के मते अधिक हवी आहेत. ती मिळवण्याचा प्रयत्न कार्यकर्त्यांनी करावा असा संदेश अमित शहा यांनी दिला आहे. त्यांनी फक्त ‘दहा टक्के मते’ असे म्हटले असले तरी लोकशाही राजकारणातील निवडणुकीचा विचार करता हे प्रमाण खूपच अधिक आहे. हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी भाजप आणि त्याच्या मित्र पक्षांना खूपच परिश्रम घ्यावे लागणार आहेत. कारण आतापर्यंतच्या निवडणुकांचा विचार करता दोन ते तीन टक्के मतांचा जरी बदल झाला तरी सत्तांतर होऊ शकते. राज्यात पुन्हा सत्तेवर येण्यासाठी जर १० टक्के अधिक मते मिळवायची असतील तर त्यासाठी भाजप, अजित पवार गट आणि एकनाथ शिंदे गट या सर्वांच्या एकत्रित मतांचीच बेरीज होण्याची गरज आहे. कारण भाजपच्या पारंपरिक मतदारांच्या संख्येवर मर्यादा आहेत. जे पारंपरिक मतदार आहेत आणि मतदानासाठी बाहेर पडत नाहीत त्यांनाच बाहेर काढण्याचे काम करावे लागणार आहे. अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे आपल्या मूळ पक्षातून फुटून बाहेर असल्यामुळे आपोआप त्यांच्या मतदारांमध्ये विभाजन झाले आहे. या दोन नेत्यांनासुद्धा आपल्याला मानणा–या आणि मत देणा–या मतदारांची संख्या वाढवावी लागणार आहे. मतदार कोणत्या गटाची बाजू घेतील हे त्या त्या परिस्थितीवर अवलंबून असते. त्यामुळे हे काम वाटते तितके सोपे नाही. सध्या सत्ता हातात असल्यामुळे मतदारांना आकर्षित करणारे विविध प्रकारचे निर्णय सरकार घेत आहे. ‘लाडकी बहीण’ योजनेच्या माध्यमातून महिलांच्या मतांचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न दिसतोच आहे. काँग्रेसला पराभूत करणे हेच लक्ष्य ठेवताना दुसरीकडे शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना रोखणे आवश्यक असल्याचा संदेश अमित शहा यांनी दिला आहे. भाजपचा बालेकिल्ला असलेल्या विदर्भाला खिंडार पडल्याची खंत शहा यांना वाटत असावी. अर्थात विदर्भ राखण्याचे काम भाजपलाच करावे लागणार आहे. विदर्भ आणि मराठवाड्यावर अमित शहा यांनी लक्ष केंद्रित केलेले दिसते. कारण लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात भाजपला एकही जागा जिंकता आली नाही. विदर्भात केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले. महायुतीला राज्यात पुन्हा सत्तेवर यायचे असेल तर विदर्भातील किमान ४५ आणि मराठवाड्यातील ३० जागा जिंकणे आवश्यक आहे. म्हणूनच शहांनी ‘मिशन ४५’चा नारा दिला असावा. लोकसभेला काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्या असल्या तरी या विजयात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचा मोठा वाटा होता हे शहा जाणून आहेत म्हणूनच महाराष्ट्राची निवडणूक देशाच्या राजकारणावर परिणाम करणारी ठरते असे विधान अमित शहा यांनी केले आहे. महायुतीसाठी जागा वाटप ही डोकेदुखी ठरणार आहे. कारण एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे समाधान करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही. या नेत्यांसोबत शहा यांनी खलबते केली. तिस–यांदा सत्तेत आल्याचे मोदी सरकारचे शंभर दिवस पूर्ण झाले आहेत. या शंभर दिवसांत मोदींनी देशासाठी कोणत्या महत्त्वाच्या भूमिका घेतल्या ,कोणते महत्त्वाचे धोरण आखले? तर महाराष्ट्रात तीन वाऱ्या केल्या, आता चौथी वारीही पूर्ण होईल, तसेच काही परदेश दौरेही केले. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने हिसका दाखवल्याने आता पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांनी महाराष्ट्रावर लक्ष केंद्रित केले आहे. ऊठसूठ त्यांच्या महाराष्ट्र वा–या सुरू आहेत.

# शिरूर-हवेलीतील जनसामान्यांचे आधुनिक श्रावणबाळ; विकासाचे शिल्पकार; पै. ज्ञानेश्वर(माऊली-आबा) कटके



वाघोली येथील वाघेश्वर महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पवित्र प्रसिद्ध अशा एका शेतकरी, वारकरी कुटुंबात पुणे जिल्हा परिषद सदस्य तथा शिवसेनेचे पुणे जिल्ह्याचे नेते पै. ज्ञानेश्वर उर्फ माऊली पंढरीनाथ कटके यांचा जन्म झाला. लहान पाणापासून माऊली आबांना कुस्ती या मैदानी खेळाची अतोनात आवड होती. त्यांनी लहानपणीच पुणे येथील शिवरामदादा तालीम येथे रीतसर प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण घेऊन एक राष्ट्रीय कुस्ती मल्ल म्हणून तयार होऊन काही दिवसातच पुढे माऊली आबांनी कुस्तीतील नॅशनल चॅम्पियन होण्याचे स्वप्नही पूर्ण केले.



तसे माऊलींचे वडील पंढरीनाथ कटके हे वाघोली गावचे सरपंच होऊन गेले. त्यांनी सरपंच कालावधीत गावचा मोठा विकास केला. त्यामुळे तर माऊली आबांचे कटके घराणे राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणारे असल्याने आबांनी आपल्या घराण्याचा आदर्श घेऊन समाजकारणात प्रवेश करून यश मिळवत मिळवत राजकारणातही प्रवेश केला. १५ वर्ष त्यांनी प्रथम वाघोली परिसरामध्ये धार्मिक व सामाजिक कार्यात आपल्याला झोकून देत आदर्श समाज कार्याचा ठसा समाजासमोर उमटविला.समाजासाठी व गोरगरिबांसाठी व्यापक स्वरूपात आदर्श कार्य करण्याच्या हेतूने ज्ञानेश्वर (माऊली-आबा) कटके यांनी शिवसेनेत शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांच्या हस्ते व त्यावेळी शिरूर लोकसभेचे खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.त्यानंतर कटके यांची राजकीय यशाची, विकासाची, प्रगतीची दारे खुली होऊन त्यांना पुढे यश प्राप्ती होऊ लागली. हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या प्रेरणेचा आदर्श घेऊन माऊली आबांनी त्यावेळी काम सुरू केले. ज्ञानेश्वर कटके यांनी आजवर मोठ्या प्रमाणात नागरिकांची वैयक्तिक कामे, विकासकामे, धार्मिक कामे, शैक्षणिक कामे, सार्वजनिक कामे अशी अनेक मोठ्या प्रमाणात मोजता येणार नाहीत तेवढी सामाजिक कामे करून आपला समाज व जनसेवेचे आदर्श दाखवून दिला आहे.

या लोक उपयोगी कामांमध्ये शिरूर-हवेली तालुका परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन, विविध सामाजिक उपक्रमासाठी अन्नदान, मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी मराठा क्रांती मोर्चात सहभाग, वृक्षारोपण केले, शिवराय राज्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले, वाघोलीत बीआरटी विरोधात रास्ता रोको केला.यामध्ये एकूण (१२,०००) बारा हजार नागरिकांनी सहभाग घेतला तर वाघोली परिसरात स्ट्रीट लाईट बसविण्याचे स्वखर्चातून मोठे विकासकाम करून दाखवले तर भाऊबीज निमित्त (२५००) पंचविशे गरीब महिलांना मोफत साडी वाटप, विद्यार्थ्यांना शालेय प्रवेश मिळवून देण्याचे व

## जनसामान्यांचे आधुनिक श्रावणबाळ:

● आजवर (१०,०००) दहा हजार पाचशे भाविकांना मोफत काशी यात्रा घडवली, भाविकांना बालाजी यात्रा, भाविकांना अजमेर यात्रा, अष्टविनायक यात्रा, मोहटा देवी यात्रा, माहुरगड यात्रा,तर सद्य स्थितीत मोफत ज्योतिर्लिंग महाकालेश्वर उज्जैन देवदर्शन यात्रा शिरूर हवेलीतील जनतेला घडवीत आहे. यांसारख्या "अनेक मोफत धार्मिक यात्रांच्या माध्यमातून भाविकांना देवदर्शन घडविणारे 'आधुनिक श्रावणबाळ' म्हणून ज्ञानेश्वर(माऊली-आबा) कटके यांच्याकडे जनता पाहत आहे" तर आजवर मोठ्या प्रमाणात विकासाचे कामे केल्याने कटकेंची ओळख आता विकासाचे शिल्पकार म्हणूनही समाजात होत आहे.

विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचे आजवर वाघोली परिसरात मोलाचे सहाय्य केले आहे, त्याचबरोबर १०० महिलांना पीठगिरणी वाटप, शिलाई मशीनचे वाटप, आधारकार्ड, रेशनिंग कार्डसाठी काढून देऊन सहाय्य केले, मागासवर्गीय वस्तींमध्ये शौचालय बांधकाम यांसारखे उपयुक्त कार्यक्रम माऊली अंबानी आजवर राबविले आहेत. सामान्य नागरिक सांस्कृतिक दृष्ट्याही संपन्न व्हावा म्हणून गेली अनेक वर्षे वाघोली परिसरामध्ये "दिवाळी पाडवा पहाट" "नवरात्र उत्सवात माऊली रास दांडिया उपक्रम" तसेच रन फॉर पुणे, अशा अनेक कार्यक्रमाचे आयोजन कटके करीत आहेत. ज्ञानेश्वर (माऊली-आबा) कटके यांच्या मोठ्या प्रमाणात केलेल्या समाजकार्याची दखल घेऊन पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत वाघोली-आव्हाळवाडी जि.प.गटातील मायबाप जनतेने मतदारांनी माऊली आबांना साथ देऊन पुणे जिल्ह्यात १ नंबर मताने निवडून आणून पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य बनविले. त्यानंतर जिल्हा परिषदेत उत्तम कामांच्या जोरावर बांधकाम समितीचे सदस्य पद बहाल केले.

तर शिवसेनेत काम करताना कटके यांची शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्वतः दखल घेत शिवसेनेचे पुणे जिल्हा-प्रमुख हे पद सुपूर्त केले. सद्य स्थितीत ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांनी शिरूर-हवेलीतील जनतेसाठी मोफत ज्योतिर्लिंग महाकालेश्वर उज्जैन देवदर्शन घडवीत असून यापूर्वी शिरूर-हवेलीत केलेल्या विविध सामाजिक,विकास कामांच्या जोरावर महाकालेश्वराच्या आशीर्वादाने शिरूर-हवेली विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी जोरदार तयारीत सज्ज आहेत.

**शब्दांकन:**
**रमेश (भाऊ) मदने, मा. उपसरपंच-ग्रामपंचायत, कोलवडी-साष्टे, विजयराव लोखंडे (वाघोली)**

# ज्येष्ठांच्या सुखकर आयुष्यासाठी कायद्याचा आधार

दिवसेंदिवस वृद्धांची संख्या वाढत चालली आहे. वाढत्या लोकसंख्ये बरोबर वृद्धांच्या छळवाद होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे."हम दो हमारे दो" या घोष वाक्यामुळे एकत्र कुटुंब पद्धती संपुष्टात आली आहे. एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये कुटुंब प्रमुखांचा धाक व कडक शिस्त यामुळे वृद्धांचा चांगला सांभाळ व्हायचा. आता कुटुंब लहान झाली तांच्या गरजा वाढल्या, त्यात भरीत भर आता मोबाइल, टीव्ही, इंटरनेट, फेसबुक व व्हाटसप या



सोशल मीडियामुळे तरुण पिढी बिघडत चालली आहे.

वृद्धांकडे दुर्लक्ष झाल्याने त्यांच्या मानसिक, शारीरिक, भावनिक, निराधार करणे अश्या घटना वाढत गेल्या त्यामुळे वृद्धांचे जगणे सुखकर राहिलेले नाही. मुलगा सून यांच्याकडून छळवाद सुरु झाल्याने वृद्धांना मंदिर वा रस्त्यावर भिक मागणे या शिवाय पर्यायच राहिला नाही. सुशिक्षित व धनिक कुटुंबांकडून वृद्धांना वृधाश्रमांची वाट धरावी लागते. यासाठी शासनाने वृद्धांचे जीवन सुखकर व्हावे व त्यांना मानाने जगता यावे म्हणून काही कायदे केले आहेत. त्याचाच परमार्थ थोडक्यात १ ऑक्टोबर जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन युनायटेड नेशन ऑर्गनायझेशन ( UNO) यांनी जागतिक पातळीवर ज्येष्ठांच्या प्रश्नावर गांभीर्याने विचार सुरु केला. जगातील एकुण त्यांची वाढती लोकसंख्या त्यामध्ये वाढती टक्केवारी लक्षात घेता त्यांच्या प्रश्नांवर अधिक भर दिला व त्याप्रमाणे युनो ने अनेक कार्यक्रम हाती घेतले. त्यानंतर वेळोवेळी अनेक देशांनी संघटना तयार केल्या सर्व देशांमिळून १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक जेष्ठ नागरिक दिन पाळावा व ज्या ज्या देशांनी आपल्या देशातील सरकारांनी जेष्ठांचे प्रश्न समजावून घेऊन धोरण ठरवावे अथवा हितांचे कायदे करावे असे ठरले. त्यातूनच पुढे केंद्र सरकारने जेष्ठांसाठी निर्वाह व कल्याण कायदा सन २००७ केला. ज्येष्ठांचे आयुष्य सुखकर आरोग्यदायक व तणावमुक्त करण्यासाठी जेष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ हा कायदा केला आणि त्याची अंमलबजावणी सन २०१० पासून सर्व देशात सुरु झाली. जेष्ठांची आयुष्यमान मर्यादा पूर्वी वैद्यकीय सुविधा नसल्याने ६०/६५ वर्षांची होती, ती आता ९०/९५ पर्यंत गेली आहे. आता एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होत चालला आहे व ‘हम दो, हमारे दो’ हा नारा दिल्याने जेष्ठ नागरिकांचे हाल सुरु झाले. त्यात ते एकाकी पडत चालले आहेत, त्यातून वृद्धाश्रमांची कल्पना पुढे आली. जुनी पिढी व नवी पिढी यामध्ये दुरावा पडल्याने जेष्ठ नागरिक अडगळीत पडले. त्यांना छळ अपमान यांना सामोरे जावे लागत आहे, हे शासनाच्या निदर्शनास आले. १५ जून हा दिवस दरवर्षी “जेष्ठांपुर्ती दुरव्यवहार नियंत्रण छळवाद दिन” म्हणून साजरा करावा असे ठरले जेष्ठांचे अनेक प्रकारचे छळ सुरु झाले.

१) शारीरिक छळ :- प्रत्यक्ष मारहाण करणे, ढकलून देणे, लाथा मारणे, चिमटे काढणे, फरपटत नेणे हा प्रकार मुलांकडून किंवा सुनेकडून होतो.

२) भावनात्मक छळ:- मानसिक यातना होतील अशी स्थिती निर्माण करणे अगर बोलणे.

३) लैंगिक छळ:- अनैतिक संबंध ठेवणे किंवा भाग पाडणे- अंगाला नको त्या ठिकाणी स्पर्श करणे. अशा घटना क्वचित घडतात

४) शोषणात्मक:- स्वभावाचा गैर फायदा घेणे, पैसा व संपत्ती यावर डल्ला मारणे, पैसे चोरणे व संपत्तीची परस्पर विल्हेवाट लावणे.

५) निराधार करणे:- ज्येष्ठांना रस्त्यावर आणणे, वृद्धाश्रमामध्ये दाखल करणे, कोणाशीही संपर्क न ठेवण्यास भाग पाडणे. त्यांना भीती वाटेल अशी स्थिती निर्माण करणे.

६) आरोग्य छळ:- औषधोपचारकडे दुर्लक्ष करणे, नैसर्गिक विधीस विरोध करणे, आजारंकडे दुर्लक्ष करणे.

७) जननिंदा:- शेजाऱ्यांना विरोधात भडकविणे, नातेवाईकांमध्ये गैरसमज पसरवणे, पती अथवा पत्नीकडून छळ करणे.

वरील सर्व बाबी व इतर काही प्रश्नांवर सन २००७ चे कायद्यात तरदूत केल्या आहेत. पूर्वी याकामी फौजदारी दंड संहिता १८७६ चे कलम १९५ प्रमाणे फौजदारी कोर्टात दाद मागता येते असे. त्यामध्ये वकिलाची फी कालावधी पैसे व श्रम यांच्या अपव्यय होत असल्याने त्यामुळे झटपट कार्यवाही करणे कामी सन २००७ चे कायदयात तरतुदी केल्या आहेत. यासाठी सदर कायदयातील कलम ७ (२) अन्वये जिल्हाधिकारी यांनी लेखी अधिसूचना काढून उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकाऱ्यांची नेमणूक न्यायाधिकरण म्हणून करणेची आहे. महाराष्ट्र फेस्कामने याबाबत माहिती सर्व ग्रामपातळीवर पोहचवून त्याचा लाभ जास्तीत जास्त



जेष्ठांना होईल, यासाठी प्रयत्न होत आहेत. राज्यात औरंगाबाद विभागामध्ये महसूल आयुक्त यांनी ही मोहीम त्यांच्या विभागात सर्व जिल्हाधिकारी यांचे मार्फत राबवली आहे. कलम ५ अन्वये मुलांकडून निर्वाहभत्ता मिळवणे कामी न्यायाधीकरणाकडे अर्ज करता येईल. उपजिल्हाधिकारी यांचे नेमलेल्या न्यायाधीकरणाला मासिक दरमहा १००००/- रुपये पर्यंत भत्ता देण्याचा अधिकार आहे. याबाबत या निर्वाह भत्ता मिळणे कामी केलेल्या अर्जावर तीन महिन्याचे आत निर्णय देणे बंधनकारक आहे. न्यायाधिकार्याकचे कोणतेही निर्णयाविरुद्ध कलम १५ अन्वये जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील करता येईल. जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील. या कामी वकील देता येणार नाही . जिल्हाधिकारी लेखी दिलेल्या जबाब व सादर केलेले पुरावे यांची शहानिशा करून निर्णय देईल. हा निर्णय अंतिम असेल त्यावर अपील नाही.

सदर कायद्याचे कलम २३ अन्वये ज्येष्ठांची स्थावर मालमत्ता गैरप्रकार आणि कोणी हस्तगत केली असेल तर न्यायाधीकरणाकडे दाद मागून मालमत्ता परत ज्येष्ठाला देता येते. ज्येष्ठास निर्वाह भत्ता, मालमत्ता परत देण्यास टाळाटाळ करतील तर अशा व्यक्तीस जिल्हाधिकारी कलम २४ अन्वये तीन महिन्यांची शिक्षा अथवा रक्कम रुपये ५०००/- पाच हजार रुपये दंड देण्याचा जिल्हाधिकारी यांना अधिकार आहे. ज्यांनी जन्म दिला त्यांना वृद्धाश्रमामध्ये अथवा घरात अडगळीची वस्तू समजून वर्तणूक देत असतील अशी प्रकरणे शोधून त्याला त्यांनी तहसीलदार यांच्यामार्फत अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवणे बाबत संभाजीनगर महसूल विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या सूचना विभागातील जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. या कामी आपल्या पुणे विभागांमध्ये ही योजना राबविणे कामे महाराष्ट्र राज्य फेस्काम वतीने लेखी व समक्ष भेटून माहिती दिली आहे. अनेक याकामी भेट देणार आहेत.

आज जागतिक जेष्ठ नागरिक दिना निमित्त ग्राम पातळीवर विरंगुळा केंद्र स्थापन करुन खालील उपक्रम राबविणे तर ज्येष्ठांचा थोडाफार छळ कमी होण्यास मदत होईल.

१) सामाजिक कार्यात व संघामध्ये जेष्ठांना सहभाग देणे कामी प्रवृत्त करावे.

२) समुपदेशन कार्यामध्ये नेऊन कौटुंबिक जनजागृती करणे, कीर्तन घेणे व वक्त्यांची भाषणे ठेवणे करमणुकीचे कार्यक्रम घेणे .

३) विरंगुळा केंद्रामध्ये एकत्र येणे, कॅरम, पत्ते, खेळणे, टीव्ही पाहणे, गप्पागोष्टी करणे, वाचनालय चालवून उत्तम पुस्तके वाचणे

४) स्थानिक लोकांमधून वर्गणी गोळा करून कोणास आर्थिक मदत करणे.

५) कोणाकडे कला कौशल्य, वक्तृत्व, गायन कला, विकास करणे कामी उत्तेजन देणे संगणक मोबाईल चालवण्याचे शिक्षण देणे.

६) ज्येष्ठांसाठी लागणारे कायद्याची माहिती देणे, त्यांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे कामी मोफत हेल्पलाइन क्रमांक १४५६७ ची माहिती देऊन अडचणीचे निराकरण करणे.



अश्या आणि अनेक समस्या घेवून आज जेष्ठ नागरिक जगत आहेत. त्यांच्या समस्या जाणून घेणे ही काळाची गरज आहे. म्हातारपण हे सर्वांना येणार आहे. आजच्या जागतिक जेष्ठ नागरिक दिनानिमित्त सर्व जेष्ठ नागरिकांना हार्दिक शुभेच्छा !



**- श्री. सूर्यकांत थोरात (मंचर, पुणे )**
लेखक हे निवृत्त तहसीलदार व आंबेगाव ता. ज्येष्ठ ना. संघ, मंचर सल्लागार, आहेत.

‘राष्ट्र संचार’ हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# उलगडले रहस्यमय सिग्नल्सचे गूढ



गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये जगभरातील वैज्ञानिकांनी भूकंपीय हालचालींवर नजर ठेवणाऱ्या उपकरणांवर आश्चर्यकारक सिग्नल्स पाहिले होते. हे असे सिग्नल्स होते, ज्यांना यापूर्वी कधीही पाहण्यात आले नव्हते. आर्क्टिकपासून अंटार्क्टिकापर्यंत अशा सिग्नल्सची प्रत्येक ठिकाणी नोंद करण्यात आली. भूकंपाच्या गडगडाटाशिवाय हे सिग्नल्स केवळ एक व्हायब्रेशन फ्रीक्वेन्सीसह सातत्याने येत होते. हा प्रकार तब्बल नऊ दिवस सुरू राहिला होता. आता त्याचे रहस्य उलगडण्यात संशोधकांना यश आले आहे.

जर्मनीच्या ब्लॅक फॉरेस्ट वेधशाळेत त्यावेळी हजर असलेले डॉ. रुडॉल्फ विडमर यांनी सांगितले की गेल्या २२ वर्षांपासून वेधशाळेत काम करीत असताना मी जे पाहिले होते, त्यापेक्षा हे सिग्नल्स वेगळे होते. विशेष म्हणजे हे सिग्नल्स नऊ दिवस प्रत्येक काही तासांनंतर रिपीट होत होते. संशोधकांनी या घटनेला एक अज्ञात भूकंपीय वस्तू (यूएसओ) म्हणून वर्गीकृत केले.

या सिग्नल्सनी वैज्ञानिकांना चकीत तर केलेच, पण चिंतेतही टाकले. अशा स्तराचे सिग्नल काही मोठ्या गोष्टींमुळे होऊ शकतात, पण अशा काही कमीच गोष्टी आहेत ज्या असे सिग्नल्स उत्पन्न करू शकतात. ज्वालामुखी किंवा टेक्टॉनिक अस्थिरता किंवा एखाद्या अज्ञात शस्त्र परीक्षणाचाही हा संकेत असू शकतो. दुसरी एक शक्यता म्हणजे ही एक दुर्लभ भूवैज्ञानिक प्रक्रिया असू शकते, ज्याबाबत विज्ञानाला अद्याप माहिती नाही. या घटनेनंतर अद्यापही भूकंप वैज्ञानिक त्याबाबतचा तपास करीत होते. आता एक वर्षाने वैज्ञानिकांनी याबाबतचे रहस्य उलगडण्यात यश मिळवले आहे. त्याबाबतची माहिती 'सायन्स' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. पंधरा देश आणि ४० संस्थांच्या वैज्ञानिकांनी या रहस्यमय सिग्नल्सचे कारण शोधण्यासाठी आपली संसाधने आणि डेटा गोळा केला.

युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनचे भूकंप वैज्ञानिक आणि या संशोधनाचे प्रमुख संशोधक स्टीफन हिक्स यांनी सांगितले की सुरुवातीला याबाबतची अतिशय कमी माहिती उपलब्ध असल्याने त्यावेळी या घटनेचे वर्गीकरण 'यूएसओ' च्या रुपात करण्यात आली होती. प्रारंभिक परिणामांनी सांगितले की हे सिग्नल्स पूर्व ग्रीनलँडमधून येत होते. ज्यावेळी भूकंप वैज्ञानिकांना सिग्नल्सबाबत समजले, त्यावेळी डेन्मार्कच्या सैन्याला डिक्सन फ्योर्डमध्ये सुनामीची माहिती मिळाली होती.

सैन्याने त्यानंतर तिकडे एक जहाज पाठवले. तिथे एका ग्लेशियरचे नुकसान झाल्याचे आढळले जे केवळ २०० मीटर उंचीच्या मेगा-सुनामीमुळे होऊ शकत होते. वैज्ञानिकांना आढळले की एक मोठे भूस्खलन झाले होते, ज्यामध्ये एक डोंगर खचून तो ग्लेशियरमध्ये गेला होता. मात्र सुनामी आल्यावर सलग नऊ दिवस सिग्नल्स का येत होते, याचेही कोडे होतेच. सॅटेलाईट व ड्रोनच्या प्रतिमा तसेच पूर्वीच्या व नंतरच्या छायाचित्रांना, डेटा आणि सुनामीच्या सिमुलेशनला जोडून टीमने शोधले की हे सिग्नल एका घटनेमुळे आले होते, जिला 'सीशे' असे म्हटले जाते. ही घटना अशा वेळी होते ज्यावेळी पाण्याला सरोवरासारख्या जलाशयात एका बाजूने दुसरीकडे ढकलले जाते. डॉ. हिक्स यांनी सांगितले हवामान बदलामुळे हे भूस्खलन झाले.

गेल्या काही दशकांमध्ये ग्लेशियर तीस मीटरपर्यंत आकसले होते. त्यामुळे डोंगराचा आधार कमजोर झाला आणि तो कोसळला. त्यामुळे पृथ्वीमध्ये कंपन निर्माण झाले आणि भूकंपीय लहरी निर्माण होऊन त्या जगभर जाणवल्या. पृथ्वीचे तापमान जसे वाढत जाईल, तसे अशा स्वरूपाच्या घटनाही वाढत जातील, असा इशाराही वैज्ञानिकांनी दिला आहे. ◆◆◆

# ब्रोकोली की फ्लॉवर, काय अधिक गुणकारी ?



आपल्याकडे आता अनेक नव्या वाटणाऱ्या भाज्याही रूळू लागल्या आहेत. कोथिंबिरीसारखी दिसणारी पार्ली असो किंवा फ्लॉवरसारखी दिसणारी ब्रोकोली, यूट्यूब – टीव्हीवरच्या रेसिपी शोमुळे त्यांची ओळख सर्वांनाच झाली. ब्रोकोली आणि फ्लॉवर या दोन भाज्या एक सारख्याच दिसत असल्याने खरेदी करताना कोणती भाजी जास्त आरोग्यदायी आहे हे कळत नाही. आता याबाबत आहारतज्ज्ञांनी काही माहिती शेअर केली आहे.

**ब्रोकोली आणि फ्लॉवरमध्ये काय फरक आहे?** : या भाज्यांमधील सर्वात उल्लेखनीय फरक म्हणजे त्यांचा रंग आणि आकार, ब्रोकोलीचा रंग गडद हिरवा असतो आणि त्याची फुलं पसरलेली असतात, जवळजवळ लहान झाडासारखी असतात. दुसरीकडे, फ्लॉवर पांढरा असतो. फ्लॉवरच्या चव आणि पौष्टिक मूल्यांमध्ये थोडा फरक आहे. ब्रोकोली एक पौष्टिक भाजी असून भाजीचे अनेक आरोग्यदायी फायदे देते. पोषणतज्ज्ञांच्या मते, ब्रोकोली फायबर आणि प्रथिनांचा एक उत्तम स्रोत आहे. १०० ग्रॅम ब्रोकोलीच्या सेवनाने सुमारे ३ ग्रॅम फायबर आणि २ ग्रॅम प्रोटीन असते. याव्यतिरिक्त, ब्रोकोलीमध्ये औटऑक्सिडंट्स आणि सूक्ष्म पोषक घटक जसे की जीवनसत्त्वे ए आणि सी आणि लोह भरपूर असतात. एकूणच, ब्रोकोली तुमच्या दैनंदिन आहारात एक अप्रतिम भर घालते.

फ्लॉवर एकंदर आरोग्यासाठी उत्तम आहे. पोषणतज्ञ स्पष्ट करतात की, या भाजीमध्ये कॅलरीज्? कमी आहेत, १०० ग्रॅम सेवनात फक्त २७ कॅलरीज् आहेत. शिवाय, त्यात फक्त ४ ग्रॅम कार्बोहायड्रेट असते. शिवाय फ्लॉवरमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते आणि ब्रोकोली प्रमाणेच, फ्लॉवरदेखील फायबर व प्रथिनांचा एक चांगला स्रोत आहे.

**ब्रोकोली आणि फ्लॉवर यांच्यातील आरोग्य गुणानुसार कोणते निवडायचे?** : वर नमूद केलेल्या माहितीवरून, हे गोंधळात टाकणारे असू शकते, कारण दोन्ही अनेक आरोग्य फायदे देतात. आहारतज्ज्ञाच्या म्हणण्यानुसार, फायबर आणि प्रोटीनच्या बाबतीत ब्रोकोली सरस आहे. फ्लॉवरमध्ये १०० ग्रॅम सर्व्हिंगमध्ये २.३ ग्रॅम फायबर आणि १.८ ग्रॅम प्रोटीन असते, जे ब्रोकोलीपेक्षा थोडे कमी असते. दुसरीकडे, ब्रोकोलीमध्ये ३५ कॅलरीज् आणि ४ ग्रॅम कर्बोदकांसह कॅलरी आणि कर्बोदकांमधे जास्त असते. एकूणच, दोन्ही भाज्या चांगल्याच आहेत. त्यांच्या पौष्टिक मूल्यांमध्ये मात्र थोडासा फरक आहे. ◆◆◆

# चर्चा अंबानींच्या जेटची

मुकेश अंबानी व त्यांच्या कुटुंबीयांच्या श्रीमंतीची चर्चा देश-विदेशात होत असते. अलीकडेच त्यांचा धाकटा मुलगा अनंत व राधिका मर्चंट यांचा शाही विवाहसोहळा आणि लालबागच्या राजाला अर्पण केलेला वीस कोटींचा मुकूटही चर्चेत होता. भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी अंबानी कुटुंब केवळ त्यांच्या आलिशान कार कलेक्शनसाठी नाही, तर अनेक खासगी जेटही आहेत. मुकेश अंबानींनी अलीकडेच भारतातील पहिले बोईंग बीबीजे ७३७ मॅक्स ९ खासगी जेट खरेदी केले, जे कधीही न पाहिलेले आहे. अल्ट्रा लाँग रेंज बिझनेस जेट बोइंग ७३७ मॅक्स ९ ची किंमत सुमारे एक हजार कोटी रुपये असून कोणत्याही भारतीय व्यावसायिकाने खरेदी केलेले आतापर्यंतचे हे सर्वात महागडे खासगी विमान आहे. मुकेश अंबानींनी या खासगी जेटमध्ये मोठे फेरबदल केले आणि नुकतेच आपल्या कलेक्शनमध्ये जोडले. १३ एप्रिल २०२३ पासून या जेटमध्येसुधारणा आणि चाचणी उड्डाणांची प्रक्रिया सुरू झाली होती ज्यामध्ये सहा चाचणी उड्डाणे करण्यात आली. या जेटमध्ये दोन शक्तिशाली इंजिन बसवण्यात असून ते बोईंगच्या रेंटन उत्पादन प्रकल्पात तयार केले जाते. या प्रायव्हेट जेटच्या केबिनवर अंबानी कुटुंबाने शेकडो कोटी रुपये खर्च केले असून गरजेनुसार जेट तयार करण्यात आले आहे आणि दिसायला अतिशय सुंदर आहे. बोईंग बीबीजे ७३७ मॅक्स ९ ची केबिन आधीच अतिशय सुंदर आणि एखाद्या राजवाड्यासारखी आहे. बोईंग बीबीजे ७३७ ८ च्या तुलनेत नवीन मॅक्स ९ मध्ये एक मोठी आणि प्रशस्त केबिन असून या विमानाचा चडछ क्रमांक ८४०१ आहे जो खासगी जेट एकावेळी सुमारे ११,७७० किमी अंतरापर्यंत उड्डाण करू शकते. तसेच या जेटच्या केबिनमध्ये अशी सर्व आरामदायी वैशिष्ट्ये आहेत ज्यांची अपेक्षाही केली जाऊ शकत नाही. ◆◆◆



# डोळ्यांचे मेगापिक्सेल



बाजारात दर महिन्याला नवीन स्मार्टफोन लाँच होत असतात. या स्मार्टफोनच्या कॅमेराचा दर्जा चांगला असतो. नवीन मोबाईल खरेदी करताना आपण कॅमेराचे मेगापिक्सेल प्रथम विचारात घेतो. कारण जास्त मेगापिक्सेलचा कॅमेरा चांगली फोटो क्वालिटी देतो. आपल्या डोळ्यांची क्षमता हे अशा कॅमेराच्या मेगापिक्सेलपेक्षा जास्त प्रभावी असते.

आपल्या डोळ्यात नैसर्गिक लेन्स असते. ही लेन्स कॅमेऱ्याप्रमाणे काम करते. ही लेन्स काचेची नाही तर नैसर्गिक असते. आपले डोळे म्हणजे डिजिटल कॅमेरा आहे असं मानलं, तर ते ५७६ मेगापिक्सेलपर्यंतचे दृश्य अगदी सहजपणे पाहू शकतात. याचा अर्थ आपल्या डोळ्यांच्या लेन्स ५७६ मेगापिक्सेल क्षमतेच्या असतात. वाढत्या वयानुसार डोळ्यांच्या क्षमतेवर परिणाम होतो का, असा प्रश्न तुमच्या मनात येईल. यावर हो असे उत्तर आहे. जसे वय वाढते तसे शरीराच्या इतर अवयवांप्रमाणे डोळ्यांचा रेटिना कमकुवत होऊ लागतो. याचा थेट परिणाम दिसण्याच्या क्षमतेवर होतो. तसेच यामुळे डोळ्यांच्या मेगापिक्सेल क्षमतेतदेखील बदल होतात.


**कॅमेऱ्याप्रमाणे माणसाचे डोळे काम करतात**

माणसाचे डोळे कॅमेऱ्याप्रमाणे काम करतात. यात प्रमुख तीन भाग असतात. लेन्स हा त्यापैकी पहिला भाग होय. लेन्स प्रकाश एकत्र करून फोटो तयार करतो. सेन्सर हा दुसरा भाग फोटोच्या प्रकाशाचे रूपांतर इलेक्ट्रिक सिग्नलमध्ये करतो. प्रोसेसर हा तिसरा महत्त्वाचा भाग असतो. यात इलेक्ट्रिक सिग्नलचे रूपांतर फोटोत करून पडद्यावर दाखवले जाते. डोळे एका वेळी ५७६ मेगापिक्सेलपर्यंत दृश्य पाहू शकतात. आपला मेंदू सर्व माहितीवर एका वेळी प्रक्रिया करू शकत नाही. तो केवळ काही भागांवर हाय डेफिनेशनमध्ये प्रक्रिया करतो. त्यामुळे कोणतेही दृश्य योग्य पद्धतीने पाहण्यासाठी आपल्याला डोळे त्या दिशेकडे फिरवावे लागतात किंवा त्यांची हालचाल दृश्यानुसार करावी लागते. ◆◆◆



# हत्तींचे माहेरघर

हत्तीसारख्या बुद्धिमान आणि विशालकाय प्राण्याचे आकर्षण मानवाला आदिम काळापासूनच वाटत आलेले आहे. एकेकाळी पृथ्वीवर मॅमथ या नावाचे केसाळ हत्तीही वावरत होते. सध्या आफ्रिकन आणि आशियाई हत्ती जगात प्रसिद्ध आहेत. आफ्रिकन हत्ती हा जमिनीवरील सर्वात मोठ्या आकाराचा प्राणी आहे.



आफ्रिका आणि आशिया हे दोन खंड हत्तींचा नैसर्गिक अधिवास बनलेले आहेत. आफ्रिकेत हत्ती सर्वाधिक संख्येने आढळतात. याठिकाणी हत्तींच्या विशेषतः दोन प्रजाती आढळतात. त्यामध्ये आफ्रिकन सवाना हत्ती आणि आफ्रिकन वर्षावन हत्ती यांचा समावेश होतो. आफ्रिकन सवाना हत्ती सवानातील गवताच्या मैदानात आढळतात. त्यांचे विशाल कान आणि उंच पाठ ही ठळक वैशिष्ट्ये आहेत. आफ्रिकन वन हत्ती हे आफ्रिकेच्या वर्षावनांमध्ये राहतात. ते सवाना हत्तींच्या तुलनेत आकाराने लहान असतात आणि त्यांचे कान गोल असतात. हत्तींच्या संख्येबाबत आफ्रिकन देशांमध्ये बोत्सवानाचा क्रमांक अव्वल आहे. याठिकाणी लाखोंच्या संख्येत हत्ती आहेत. बोत्सवानाच्या सरकारने हत्तींच्या संरक्षणासाठी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली असल्याने त्यांची संख्या वाढली आहे. आफ्रिकेशिवाय आशिया हे हत्तींचे घर आहे. आशियाई हत्ती आकाराने आफ्रिकन हत्तींपेक्षा लहान असतात. त्यांचे कान छोटे आणि गोल असतात. आशियाई हत्तींची सर्वाधिक संख्या भारतात आढळते.



सध्या संपूर्ण जग अक्षय ऊर्जेच्या (रिन्यूएबल एनर्जी) वापरासाठी आग्रह धरत आहे. जास्तीत जास्त प्रमाणात अक्षय ऊर्जेचा वापर व्हावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. भारतदेखील यासाठी प्रयत्न करत आहे. ग्रीन एनर्जी आणि इलेक्ट्रिक बॅटरी हे दोन घटक या बदलाच्या केंद्रस्थानी आहेत. अक्षय ऊर्जेच्या वापरामुळे एका विशिष्ट धातूची मागणी वाढण्याची शक्यता आहे. जस्त (झिंक) असे या धातूचे नाव आहे. इंटरनॅशनल झिंक असोसिएशनने याबाबत सविस्तर माहिती दिली. यानुसार, धातूसारखा दिसणारा हा दगड अगदी सोन्यासारखाच मौल्यवान आहे. ग्रीन एनर्जी आणि बॅटरी टेक्नॉलॉजीसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमुळे २०३०पर्यंत भारतातील झिंकच्या मागणीत लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे, असेही यात नमूद केले गेले आहे.

# झिंकला सुवर्णझळाळी

## झिंकच्या वापरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ

झिंक असोसिएशनच्या म्हणण्यानुसार, पुढच्या पाच वर्षांत एनर्जी स्टोरेज सोल्युशन्समध्ये सातपट वाढ होण्याची शक्यता आहे. जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारत या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये प्रगती करण्याचा प्रयत्न करत आहे. परिणामी झिंकच्या वापरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. भारतातल्या विक्रमी पोलाद उत्पादनासाठी आणि पायाभूत सुविधांच्या जलद गतीने होणाऱ्या विकासासाठी झिंक महत्त्वाचे आहे. त्यामुळे झिंकच्या किमतीत वाढ होण्याची संधी निर्माण झाली आहे. आयझेडएने सांगितलं, की इन्फ्रा प्रकल्पांमध्ये झिंकचा समावेश केल्यास ॲन्युअल कोरोजन कॉस्ट लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते. हा खर्च सध्या भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) सुमारे पाच टक्के आहे. एखादा उद्योग किंवा व्यक्ती त्याच्या उत्पादनांचे गंजापासून संरक्षण करण्यासाठी किंवा गंज कमी करण्यासाठी खर्च केलेल्या रकमेला करोजन कॉस्ट म्हणतात. धातूला गंज चढण्यापासून वाचवण्यासाठी केलेल्या उपायांकरिता आलेला खर्च आणि गंजाची किंमत यांचा त्यात समावेश होतो.



### झिंक फोटोव्होल्टाइक पेशींची कार्यक्षमता वाढवण्यास मदत

झिंक फोटोव्होल्टाइक पेशींची कार्यक्षमता वाढवण्यास मदत करते. सौर ऊर्जा प्रक्रियेतदेखील याचा उपयोग होतो. सोलर पॅनेलमध्ये वापरल्या जाणाऱ्या स्टीलवर झिंक कोटिंग केले जाते. यामुळे कोणत्याही नैसर्गिक परिस्थितीत उभ्या असलेल्या पॅनेलचे आयुष्य वाढते. झिंक वापरून बनवलेल्या बॅटरीची एनर्जी डेन्सिटी खूप जास्त असते. त्या मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाऊ शकतात. शिवाय अशा बॅटरीज स्वस्तदेखील आहेत. या बॅटरीमध्ये पवन आणि सौर ऊर्जा साठवता येते.

# देशातील पहिली इलेक्ट्रिक सुपरबाईक

सध्या जगभरात इलेक्ट्रिक वाहनांचा बोलबाला आहे. 'क्लिन एनर्जी'वर चालणाऱ्या या वाहनांमुळे प्रदूषण होत नाही. तसेच जीवाश्म इंधनदरवाढीच्या काळात ही वाहने लोकांना किफायतशीरही वाटतात. चारचाकी, दुचाकी वाहनांपासून चक्क विमानांपर्यंतही अशी वाहने बनवली जात आहेत. आता आपल्या देशात पहिली इलेक्ट्रिक सुपरबाईकही समोर आली आहे. देशातील पहिल्या सुपरबाईकचा मान 'अल्ट्राव्हायोलेट एफ' ला मिळाला आहे.

या बाईकचा कमाल वेग ताशी २६५ कि.मी. असा आहे. केवळ ३ सेकंदांत ही बाईक ताशी शून्य ते १०० किलोमीटरची गती गाठते. ही बाईक १२० बीएचपीची पॉवर जनरेट करेल. या बाईकचे वजन १७८ किलो आहे. 'अल्ट्राव्हायोलेट एफ' चे व्हीलबेस १४०० एमएमचे आहे. या कारची उंची १०५० एमएम इतकी आहे. बाईकला समोरुन आणि मागील बाजूस १७ इंचाचे टायर देण्यात आले आहे. बॉडी कार्बन फायबरची आहे. ही बाईक भारतीय २ डब्ल्यू इंडस्ट्रीमध्ये अत्याधिक वेगाने धावणारी असल्याचा कंपनीचा दावा आहे. सध्या ही बाईक बाजारात दाखल झाली नाही. ती प्रोटोटाईपमध्ये समोर आली आहे. लवकरच ही बाईक बाजारात येईल. ती टॉप स्पीड देणारी एकमेव इलेक्ट्रिक बाईक ठरणार आहे. वेगाने क्वार्टर माईल पूर्ण करणारी ही भारतातील पहिली बाईक असेल. ही सुपरबाईक 'अल्ट्राव्हायोलेट एफ' च्या प्लॅटफॉर्मसाठी तयार करण्यात येणार आहे. 'अल्ट्राव्हायोलेट एफ' आधीच भारतीय बाजारात आलेली असून निवडक पाच शहरांमध्ये तिची विक्री होते.



## ग्रीन बिल्डींगनुसार इमारतीचे बांधकाम

# महापालिकेच्या नवीन इमारतीचे काम प्रगतीपथावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे काम २० टक्के झाले आहे. सदरील इमारत ३६ महिन्यांत पूर्ण होणार आहे. ही इमारत पर्यावरणपूरक असून त्यात सौर उर्जेचा वापर, पाण्याचा पुर्नवापर करण्यात आला आहे. इमारत पूर्ण झाल्यानंतर नागरीकांना महापालिकेची सर्व विभागाची कार्यालये एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असून पालिकेच्या कामाकाजात सुसूत्रता येणार आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी नवीन इमारत बांधण्यात येत आहे. चिंचवड, ऑटो क्लस्टरसमोरील आरक्षण क्रमांक १८१ या ८.६५ एकराच्या भूखंडावर १३ मजली प्रशासकीय इमारत उभारण्यात येत आहे. त्यासाठी केएमव्ही प्रोजेक्ट, हैदराबाद हे ठेकेदार काम करत असून त्यांना कामाचा आदेश जानेवारी २०२३ मध्ये देण्यात आला. इमारत कामाची मुदत ३६ महिने आहे. तर इमारत बांधकामासाठी स्वीकृत निविदा रू.२८६.६३ कोटी इतकी आहे. तर कामाचे सल्लागार म्हणून सुनिल पाटील असोसिएट प्रा.ली. हे आहेत. केएमव्ही प्रोजेक्ट लिमिटेड हैद्राबाद या ठेकेदाराने रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून ८.१९ टक्के कमी म्हणजे २८६ कोटी रुपयांची निविदा सादर केली होती. संबंधित ठेकेदार मुदतीमध्ये काम करण्यास सक्षम असून केएमव्ही प्रोजेक्ट लिमिटेड या ठेकेदाराकडून रॉयल्टी, मटेरियल टेस्टींग चार्जेसह दोनशे कोटी ६३ लाख रुपयांत काम करुन घेण्यात येणार आहे.

तसेच सदर इमारतीमध्ये महापालिका सर्वसाधारण सभागृह, सुसज्ज असे ग्रंथालय, प्रदर्शन दालन, बहु उद्देशीय सभागृह,नागरिक व कर्मचारी यांचे आरोग्य तपासणीसाठी क्लिनिक, एटीएम सेंटर, ई-गव्हर्नन्स, नागरी सुविधा केंद्र, सुरक्षा कक्ष, कोर्टयार्ड, स्वच्छतागृह, स्वागत आणि माहिती कक्ष, कॅन्टीन व पत्रकार कक्ष इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर इमारतीची रचना पर्यावरणपूरक, असून त्यामध्ये जलपुनर्भरण, सौर उर्जेचा वापर, पाण्याचा पुर्नवापर, स्कायलाइट, दोन व चार चाकी मिळून सुमारे ५ हजार वाहने पार्किंग आदी समावेश केलेला आहे. प्रशासकीय इमारतीची उंची ८३ मी. एवढी आहे. इमारत पुर्ण झाल्यानंतर नागरीकांना महानगरपालिकेची सर्व विभागाची कार्यालये एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, सध्याची महापालिकेची इमारत अपुरी पडत आहे. अनेक विभागांची कार्यालये इतर इमारतींमध्ये स्थलांतरित केली आहेत.

महापालिका सभागृहात ३०० नगरसेवकांना बसण्यासाठी आसन व्यवस्था असणार आहे. इमारतीच्या गच्चीवर हेलिपॅड असणार आहे.

### नवीन इमारतीत असणार चार विंग

● चिंचवड येथील महानगरपालिकेच्या आरक्षण क्र.१८१ ड या जागेवर नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याचे काम करण्यात येत आहे. या इमारतीच्या भूखंडाचे क्षेत्र ८.६५ एकर (३७२३२.२५ चौ.मी.) एकूण बांधकाम क्षेत्र – ९१४५९ चौ.मी. (सुमारे १० लाख चौ. फूट) असणार आहे. तर नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये पुढील प्रमाणे ४ विंग बांधण्यात येणार आहेत.

सद्यस्थितीत २० टक्के काम पूर्ण झाले असून इमारतीचे संपूर्ण खोदकाम व फाऊंडेशनचे काम पूर्ण झालेले असून आता सर्वात खालील तळघराच्या स्लॅबचे काम प्रगतीपथावर आहे. स्लॅबवरील कॉलमचे काम पावसाळ्यात करणे शक्य होणार आहे. मुदतीमध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**- प्रमोद ओंभासे,** सह-शहर अभियंता, स्थापत्य प्रकल्प विभाग, महापालिका

---

Selected



## चिंचवडच्या तरुणाने पटकावला आयर्नमॅन किताब

**चिंचवड :** इटली येथे झालेल्या आर्यनमॅन स्पर्धेत स्वप्नील चिंचवडे यांनी पिंपरी चिंचवड शहराचा झेंडा पुन्हा अटकेपार फडकावला. त्यांनी ही स्पर्धा १३ तास २८ मिनिटे व दोन सेकंदात पूर्ण केली.

मागील वर्षी स्पेन (बार्सिलोना) मध्ये झालेल्या स्पर्धेतही त्यांनी यश मिळवले होते. आज पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी चिंचवड गावातून त्यांची भव्य मिरवणूक काढून त्यांचा भव्य सत्कार केला. इटली येथे २१ सप्टेंबर रोजी झालेल्या या स्पर्धेत जगभरातून २३०० स्पर्धक सहभागी झाले होते, त्यामध्ये भारतातील २० तर महाराष्ट्रातील पाच जण होते. या स्पर्धेत ४२ किलोमीटर धावणे, ३.८ किलोमीटर पोहणे आणि १८० किलोमीटर सायकलिंग असे तीनही प्रकार करावे लागतात. या तीनही प्रकारात ४२ वर्षीय स्वप्निल चिंचवडे यांनी बाजी मारली.

## वडगावमध्ये गुरुवारपासून सरस्वती व्याख्यानमालेचे आयोजन



**वडगाव मावळ :** मावळ विचार मंचाच्या वतीने नवरात्रीनिमित्त गुरुवार (ता. ३) पासून सरस्वती व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. मावळ विचार मंचाच्या व्याख्यानमालेचे हे २४ वे वर्ष आहे. मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत यंदाच्या व्याख्यानमालेची रूपरेषा विशद केली. मंचाचे संस्थापक अध्यक्ष भास्करराव म्हाळसकर, कार्याध्यक्ष डॉ. रवींद्र आचार्य, यंदाचे अध्यक्ष गुलाबराव म्हाळसकर आदी उपस्थित होते.

श्री पोटोबा देवस्थान संस्थानच्या सहकार्याने ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज मंदिराच्या प्रांगणात ३ ते ११ ऑक्टोबर दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता व्याख्याने होतील.

---

राष्ट्रसंचार नवरात्रोत्सव.. रा

## नवरात्रोत्सवासाठी सजू लागली मंदिरे

**पिंपरी :** नवरात्रोत्सवासाठी शहरातील अनेक मंदिरांमधील कार्यक्रमांच्या तयारीने आता वेग घेतला आहे. रंगरंगोटी, आकर्षक विद्युत रोषणाई, मंडप उभारणी आणि सजावटीच्या कामांचा त्यात समावेश आहे. येत्या गुरुवारी (दि. ३ ऑक्टोबर) घटस्थापनेचा मुहूर्त असून त्यानंतर लगेचच सुरु होणाऱ्या नवरात्रोत्सवाच्या गरबा, पूजा आदी कार्यक्रमांसाठी महिलावर्गही तयारीत आघाडीवर आहे.

नवरात्रोत्सव तीन दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यादृष्टीने सध्या शहरातील देवींच्या मंदिरांमध्ये उत्साहाने तयारी सुरु आहे. शहरामध्ये दुर्गादेवी (दुर्गादेवी टेकडी), वैष्णोदेवी (पिंपरी), तुळजाभवानी (आकुर्डी), खराळ आई (खराळवाडी), फिरंगाई (दापोडी), मोहटा देवी (थेरगाव), आई माता मंदिर (कासारवाडी) आदी ठिकाणी देवीची मंदिरे आहेत.

त्याशिवाय, पिंपरी गावात महालक्ष्मी तर, पिंपळे गुरव येथे तुळजाभवानी माता मंदिर आहे. या मंदिरांमध्ये सध्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक पूर्वतयारी करण्यात संयोजकांची लगबग आहे. काही मंदिरांमध्ये रंगरंगोटी करण्यात येत आहे.तर, काही ठिकाणी आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई केली जात आहे. काही मंदिरांच्या परिसरात नवरात्रोत्सवात विविध कार्यक्रम घेण्यासाठी मंडपही टाकण्यात आले आहेत.

**दसरा सण मोठा**

नवरात्र सणाचे हिंदू धर्मातील सर्वच घटकांमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. घराघरांतून रंगकाम आणि स्वच्छतेची कामे सुरू झाल्याने रंग खरेदीसाठी दुकानांमध्ये गर्दी होत आहे. सिमेंट पेंट, चुना, डिस्टेंपर, ऑइल बाँड आदींची खरेदी करण्याकडे लोकांचा कल आहे



## चर्चासत्र...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**चिंचवड :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुनरुत्थान समरसता गुरुकुलम् यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

## विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

# "हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व!" - पद्मश्री रमेश पतंगे


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** "हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व, अशी ठाम भूमिका घेऊन पद्मश्री डॉ. प्रभाकर मांडे यांनी सांस्कृतिक कार्य केल्याने त्यांच्या सांस्कृतिक योगदानाचा गौरव करणे हे आपले परम कर्तव्य आहे!" असे प्रतिपादन पद्मश्री रमेश पतंगे यांनी शाहीर योगेश रंगमंच, पुनरुत्थान समरसता गुरुकुलम्, चिंचवडगाव येथे रविवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (भारतीय लोककला अभ्यास संशोधन व कल्याण केंद्र आणि भाषा व साहित्य प्रशाला) आणि क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती संचलित पुनरुत्थान समरसता गुरुकुलम् यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप सत्रात भूमिका व्यक्त करताना पद्मश्री रमेश पतंगे बोलत होते. याप्रसंगी क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, कार्यवाह अ‍ॅड. सतिश गोरडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अविनाश कुंभार, अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई, प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांची व्यासपीठावर तसेच मांडे कुटुंबीयांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची सभागृहात उपस्थिती होती.

रमेश पतंगे पुढे म्हणाले की, "डॉ. प्रभाकर मांडे यांचे ग्रंथ विचारांना अन् जीवनाला दिशा देणारे होते, अशी अनुभूती मी स्वतः घेतली आहे. सकल हिंदू समाज हा सर्व गुणदोषांसकट आपला आहे, अशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका आहे. डॉ. मांडे यांच्या साहित्यातून गावकुसाबाहेरील समाजाचे दर्शन घडते. त्यांच्या सांस्कृतिक योगदानाचा आढावा घेताना महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची आठवण होते. त्यामुळे लोकसंस्कृतीच्या संशोधकांनी निर्भय होऊन मांडे यांच्यासारखी सरस्वतीसाधना केली पाहिजे!" डॉ. अविनाश कुंभार यांनी अध्यक्षीय मनोगतातून, "डॉ. मांडे यांच्या सांस्कृतिक संशोधनकार्याचा अंतर्भाव नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात व्हायला हवा!" अशी अपेक्षा व्यक्त करून चर्चासत्रासारख्या उपक्रमांना विद्यापीठाचा नेहमीच पाठिंबा राहील, अशी ग्वाही दिली. यावेळी नियोजित प्रभाकर मांडे अध्यासनासाठी सुधीरकुमार अग्रवाल यांनी प्रतिवर्षी ₹११०००/- देणगी जाहीर केली.

---

## क्रिकेट खेळताना हार्टअटॅकने अभियंत्याचा दुर्दैवी मृत्यू



**निगडी :** क्रिकेट खेळताना एका अभियंत्याचा मृत्यू झाला. मात्र ज्या ठिकाणी मृत्यू झाला या हद्दीबाबत रावेत आणि निगडी पोलिसांनी एकमेकांकडे बोट दाखविले. अखेर राजकीय नेत्यांनी वरिष्ठ पातळीवर चर्चा केल्याने तब्बल साडेचार तासांनी पोलिसांनी पंचनामा केला.

अभिजित गोवर्धन चौधरी (रा. रूपीनगर, तळवडे) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. अभिजित हे अभियंता होते. ते कंपनीतील आपल्या मित्रांसोबत शनिवारी क्रिकेट खेळण्यासाठी प्राधिकरणात गेले होते. मात्र मैदानावर ते चक्कर येऊन पडल्याने त्यांना निगडीतील लोकमान्य रूग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच अभिजीत यांचा मृत्यू झाला होता.

## सोनसाखळी हिसकावल्या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

**पिंपरी :** मारहाण करून जबरदस्तीने सोनसाखळी हिसकावल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना हिंजवडी येथे घडली. याप्रकरणी प्रवीण वाल्मीकी भोंडवे (रा. हिंजवडी) यांनी हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी प्रदीप बबन भिंताडे (मु. पो. कासारसाई, ता. मुळशी, जि. पुणे), ज्ञानेश्वर निवृत्ती काळभोर (रा. आकुर्डी), भूषण प्रभाकर बोडके (रा. रिहे, ता. मुळशी, जि. पुणे) आणि त्यांचा एक साथीदार यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी फिर्यादीला म्हणाले, तू नेरे दत्तवाडी येथे विकत घेतलेली जमीन दे नाहीतर आम्हाला दोन कोटी रुपये दे, असे म्हणत फिर्यादी यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. फिर्यादी यांच्या गळ्यातील एक लाख रुपये किमतीची सोनसाखळी जबरदस्तीने हिसकावून घेतली. तसेच याबाबत फिर्यादी हे तक्रार देण्यासाठी जात असताना त्यांना पुन्हा अडवून तू पोलिस ठाण्यात कसा जातो तेच बघतो, असे म्हणून फिर्यादी यांची अडवणूक केली.

---

## अजित पवारांच्या गटात फूट?

# चिंचवडमधून जेष्ठ नेते भाऊसाहेब भोईर रिंगणात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** चिंचवड विधानसभेतून जेष्ठ नेते भाऊसाहेब भोईर हे देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. आज झालेल्या पत्रकार परिषदेत भाऊसाहेब भोईर यांनी आपली राजकीय भूमिका स्पष्ट केली. याच बरोबर येत्या २ ऑक्टोबरला मतदारसंघात कार्यकर्ता निर्धार मेळाव्याचे आयोजन करत आपली राजकीय भूमिका स्पष्ट करणार आहेत.

बुधवारी २ ऑक्टोबरला सायंकाळी ५ वाजता रहाटणी येथील थोपटे लॉन्स मध्ये याठिकाणी हा निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. भाऊसाहेब भोईर म्हणाले की, गेली अनेक वर्षे मी नगरसेवक म्हणून या शहराचे प्रतिनिधित्व करत आलेलो आहे. उद्योगनगरी म्हणून ओळख असलेल्या या शहराला सांस्कृतिक नगरी ही ओळख निर्माण करुन देण्यासाठी मी सतत प्रयत्नशील आहे.

चिंचवड विधानसभेमध्ये असलेल्या घराणेशाही आणि दडपशाहीमुळे या मतदार संघात विकासाचे केंद्रीकरण होऊ शकले नाही. केवळ स्वतःच्या राजकीय आणि आर्थिक फायद्यासाठी इथल्या लोकप्रतिनिधींनी आपल्या सत्तेचा वापर केलाय. मला वैयक्तिक कोणावरही टीका करायची नसली तरी जनतेला सर्व वस्तुस्थिती माहिती आहे. आणि त्यामुळेच या मतदारसंघातील जनतेला आता बदल हवा आहे.

या सर्व परिस्थितीचा विचार करुन माझ्या कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यावर आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरायचे निश्चित केल्याचे भोईर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. मतदार संघात मतदारांची संख्या वाढली. मात्र, समस्या जैसे थे च आहेत. त्यामध्ये २४ तास पाणी पुरवठ्याचा प्रश्न असू द्या, वाढती वाहतूक कोंडीची समस्या असो की घन कचरा व्यवस्थापन, याकडे आत्तापर्यंत इथल्या सत्ताधाऱ्यांनी सोयीस्कर दुर्लक्ष केलं आहे. हेच प्रश्न घेऊन मी मतदारांच्या पाठींब्यावर या निवडणुकीच्या रिंगणात उतरतोय. मोरया गोसावींची भक्ती हाच माझा पक्ष आणि चाफेकरांची क्रांती हे माझं ध्येय असल्याचे भोईर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

काही दिवसांपूर्वीच अजित पवार गटातील चार ते पाच माजी नगरसेवकांनी चिंचवड विधानसभा लढण्याची आग्रही भूमिका घेतली. त्यानंतर आता अजित पवार गटातील भोईर चिंचवड विधानसभा लढण्यावर भर दिला आहे.

## अपघाताच्या तपासाबाबत पोलिसांना प्रशिक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** अपघात स्थळाचा प्रभावी तपास, विश्लेषणासाठी उपयुक्त माहिती गोळा करणे आणि अपघातास कारणीभूत घटकांची ओळख पटविणे याबाबत पिंपरी-चिंचवड पोलिसांसाठी आयोजित केलेल्या कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांमार्फत पोलिसांना प्रशिक्षण देण्यात आले.

पिंपरी - चिंचवड पोलिस व ब्लुमबर्ग फिलॉन्थ्रॉपीज इनिशिएटिव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी अंतर्गत भागीदार असलेल्या ग्लोबल रोड सेफ्टी पार्टनरशिप यांच्यावतीने निगडी येथील पोलिस मुख्यालय येथे या अपघात तपासणी विषयक कार्यशाळेचे आयोजन केले होते. क्रॅश इन्वेस्टीगेशनवरील कार्यशाळेत पोलिस कर्मचाऱ्यांना अपघात स्थळाचा प्रभावी तपास, विश्लेषणासाठी उपयुक्त असलेली माहिती गोळा करणे आणि अपघातास कारणीभूत घटकांची ओळख पटविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणामुळे रस्ते अपघातातील दुखापती आणि मृत्यू कमी होण्यात मदत होते. यावेळी ५० पोलिस अधिकारी, कर्मचारी हजर होते.

## कर्मचारी, अधिकारी सस्पेंड करण्याची पालिकेची रेकॉर्डब्रेक कारवाई

# एका दिवसात पालिकेच्या ८ कर्मचाऱ्यांचा राजीनामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** लाचखोरीसह फसवणुकीसारख्या फौजदारी गुन्ह्यांत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सहा कर्मचारी, अधिकाऱ्यांना गेल्यावर्षी आयुक्त तथा प्रशासक शेखरसिंह यांनी घरचा रस्ता दाखवला होता.

यावर्षी एकाच दिवसात महापालिकेच्या आठ कर्मचाऱ्यांनी थेट नोकरीचा राजीनामा नुकताच दिला. गेल्यावर्षी कर्मचारी, अधिकारी सस्पेंड करण्याची रेकॉर्डब्रेक कारवाई पिंपरी महापालिकेत झाली. त्यामुळे प्रशासकीय कारभारावर सडकून टीका झाली होती. १३ मार्च २०२२ ला पिंपरी महापालिकेची मुदत संपली. तेव्हापासून म्हणजे अडीच वर्षापासून शहरात प्रशासकीय राजवट सुरु आहे.

दुसरीकडे पदाधिकारीच नसल्यापासून महापालिकेचा कारभार बेशिस्त आणि भोंगळ झाला आहे. विक्रमी संख्येने या कालावधीत कर्मचारी, अधिकारी हे निलंबित झाले. त्यामुळे प्रशासनाची नाचक्की झाली. प्रशासकीय राजवट म्हणजे आयुक्तांचा कारभार वादात सापडला असतानाच यावर्षी एकाच दिवशी म्हणजे २५ सप्टेंबरला आठ महापालिका कर्मचाऱ्यांनी राजीनामा दिला. त्यात बहुतांश लिपिक (क्लार्क) आहेत.

पिंपरी महापालिकेत सेवा बजावत असताना काहींना अधिक पगाराची, दोघांना प्रतिष्ठेची, एका वरच्या पदावर सरकारीच नोकरी मिळाली. त्यामुळे त्यातील काहींनी काहीच दिवसांत, तर इतरांनी अवघ्या काही महिन्यांत पिंपरी महापालिका सेवेचा स्वत:हून राजीनामा दिला.

#रा

## दोषी अधिकाऱ्यांची नावे चौकशी समितीकडे

# मालमत्तेच्या चुकीच्या नोंदी; पालिकेला लाखोंचा गंडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेच्या करआकारणी व करसंकलनच्या विभागीय कार्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांचा मनमानी आणि बेकायदेशीर कारभार सुरू आहे. विशेषतः चिखली, तळवडे, थेरगाव, वाकड, सांगवी, किवळे यासह अन्य विभागीय कार्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नियमबाह्य, बेकायदेशीर कामकाज करून महापालिकेचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान केले आहे. याबाबत करसंकलन गैरव्यवहार, अनियमितता प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पालिकेचे आर्थिक नुकसान करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. याकरिता ३० सप्टेंबरपर्यंत संबंधितांची नावे चौकशी समितीकडे पाठवून द्यावीत, असे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहेत.



अधिकाऱ्यांनी स्वतःच्या आर्थिक लाभासाठी शेकडो मिळकतींच्या नियमबाह्य नोंदी केल्या आहेत. अनेक मिळकतींची विभागणी, हस्तांतर केले आहे. त्याकरिता ५०० रुपयांचे नोटरी प्रतिज्ञापत्र आणि कुलमुखत्यारपत्राचा सर्रास वापर केला आहे. तसेच मिळकतींचे क्षेत्रफळ कमी नोंदवणे, बिगरनिवासी मिळकत निवासी म्हणून दाखवणे, व्यावसायिक पत्रा शेडला करात सूट देणे, अशा प्रकारे मिळकतींच्या नोंदी केल्या आहेत. त्यानंतर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी तत्कालीन आयुक्तांचा ५ ऑक्टोबर २०१९ चा आदेश रद्द केल्याने त्या नियमबाह्य नोंदी वाढल्या आहेत. करसंकलनच्या भ्रष्ट कारभार करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी चौकशी सुरू केली. नस्ती मागवून त्या ५४ नस्तींची काटेकोर तपासणी करण्यात आली. त्या नस्तीत तथ्य आढळून आले. त्यानुसार चिखली-तळवडे, वाकड, थेरगावातील जबाबदार दहा ते बारा अधिकारी-कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागवण्यात आला. मात्र, संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर करत महापालिकेची प्रतिमा मलिन होईल, असे कृत्य केले. तसेच महापालिकेचे आर्थिक नुकसान करून गैरकारभार केला. त्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन विभाग प्रमुख नीलेश देशमुख यांनी त्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना पाठिशी घालत भ्रष्ट कारभाराला पाठबळ दिले आहे.

### दोन लाख मालमत्तांची नोंदच नाही...

- महापालिकेच्या करसंकलन व करआकारणी विभागाने केलेल्या सर्वेक्षणात सुमारे दोन लाख मालमत्तांची नोंद नसल्याचे आढळून आले आहे. यामुळे वर्षानुवर्षे आर्थिक देवाण-घेवाण करून करसंकलनच्या प्रशासन, मंडलाधिकारी, मुख्य लिपिक, लिपिक यांनी महापालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे.
- शहरात निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक अशा ६ लाख ३० हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. यापूर्वी सन २०१३ मध्ये सर्वेक्षणात सुमारे ३५ हजार, २०२१ मध्ये झालेल्या सर्वेक्षणात २१ हजार नवीन मालमत्ता आढळून आल्या. त्यानंतर शहरात नोंदणी नसलेल्या मोठ्या प्रमाणात मालमत्ता आढळून येत आहेत. यामुळे महापालिकेने खासगी एजन्सीद्वारे आधुनिक ड्रोनद्वारे सर्वेक्षण सुरू केले.
- आधुनिक ड्रोनद्वारे होणाऱ्या सर्वेक्षणात तब्बल २ लाखापेक्षा अधिक नोंदणी नसलेल्या मालमत्ता आढळल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. त्यामुळे करसंकलन विभागाचे अधिकारी-कर्मचारी यांना नागरिकांच्या करातून गलेलठ्ठ पगार, एअर कंडिशन गाडी, भत्ते, आदी सुविधा पुरवल्या जातात. तरीही वेळेवर मालमत्तांची नोंदणी होत नसेल तर या मागचे नेमके गौडबंगाल काय? हे करदात्या नागरिकांना समजले पाहिजे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

### दोन लाख मालमत्तांची नोंदच नाही...

- या करसंकलन गैरव्यवहार प्रकरणात आयुक्त शेखर सिंह यांनी त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत केली. या समितीत तब्बल ५४ हून अधिक प्रकरणांची तपासणी सुरू आहे. मागील आठ महिन्यांपासून चौकशी सुरू होती. या समितीच्या ५४ प्रकरणातील महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यांची आकडेवारी आयुक्त शेखर सिंह यांना सादर केली आहे.
- पिंपरी-चिंचवड शहरातील इमारती, जमिनीवर करआकारणी करून मिळकतकर वसुली आणि मिळकतीचे हस्तांतरण नोंदणीची कार्यवाही करण्यात येते. वास्तविक नोंदणीकृत खरेदी खत, वाटणीपत्र आणि बक्षीसपत्र आदीने कायदेशीर कागदपत्रांच्या आधारे मिळकतीचे हस्तांतरण करणे आवश्यक आहे.
- कुलमुखत्यारपत्राच्या आधारे मिळकतीचे विभाजन, विभागणी व हस्तांतर करण्यात येऊ नये, असे महापालिका तत्कालीन आयुक्तांचे आदेश आहेत.
- परंतु, विभागीय कार्यालयात सर्रासपणे नोंदणीकृत, विना नोंदणीकृत, नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र, कुलमुखत्यारपत्राच्या आधारे कुटुंबातील, इतर व्यक्तींचे नावे मिळकतकर आकारणी झालेल्या एकाच मिळकतीचे हस्तांतरण, विभाजन, विभागणी केलेली आहे.

## Selected



### ज्येष्ठांसाठी 'निरामय आनंदी जीवन'वर व्याख्यानाचे आयोजन

**पिंपळे सौदागर :** निरामयता शरीराशी निगडीत आहे आणि आनंद हा मनाशी निगडीत आहे तेंव्हा या दोन्ही गोष्टी प्राप्त करण्यासाठी सत्कर्म करीत रहा , इतरांना बदलायच्या भानगडीत न पडता स्वतःला बदला , सत्संग करा, अध्यात्माकडे वळा असे प्रतिपादन डॉ. विलास सोमवंशी यांनी केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्यावतीने आयोजित " निरामय आनंदी जीवन " या विषयावरील मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाष पवार आणि उपाध्यक्षा शकुंतला शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात रविवार दि. २९ रोजी हा कार्यक्रम झाला. आपल्या व्याख्यानात डॉ. सोमवंशी यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना अध्यात्म आणि आरोग्य यांची योग्य सांगड घालून सुखी जीवनाचे मर्म समजाऊन सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला असोसिएशनचे सदस्य नीता गुप्ता, सुरेखा पाटील, शशिकांत कुलकर्णी, अनिल कुलकर्णी, उषा भागवत , अशोक येळंमकर, शोभा पोरवाल यांनी कविता आणि गाणी सादर केली. प्रास्ताविक डॉ.सुभाष पवार यांनी केले. सुत्रसंचलन निर्मला कासार यांनी केले तर सखाराम ढाकणे यांनी आभार मानले.

## वीरशैव लिंगायत समाज सन्मान यात्रेचे शहरात जल्लोषात स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** वीरशैव लिंगायत समाज सन्मान यात्रा ही राजकीय नसून पूर्णपणे सामाजिक आहे. ही यात्रा हिंदूत्व हेच राष्ट्रीयत्व आहे; आणि लिंगायत समाज हा हिंदू धर्माचा अविभाज्य घटक आहे. हा संदेश देणारी यात्रा आहे. मागील लोकसभा निवडणुकीत ज्या प्रकारे विरोधकांनी विष पसरवण्याचे काम केले; त्याला उत्तर देणारी ही यात्रा आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात लिंगायत समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत लिंगायत समाजाला योग्य प्रतिनिधीत्व मिळावे अशी अपेक्षा राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केली.

लिंगायत समाजातील युवक, तरुण व सर्व समाज बांधवांना एकत्र आणण्यासाठी वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने राज्यात वीरशैव लिंगायत समाज सन्मान यात्रा खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात मोठ्या असलेल्या १७ जिल्ह्यामध्ये भक्ती स्थळ (राजूर, अहमदपूर) ते शक्ती स्थळ (श्रीक्षेत्र मंगळवेढा) अशी लिंगायत सन्मान यात्रा जाणार आहे. ही यात्रा आज (रविवार, दी. २९) ६०विधानसभा मधील प्रवास करीत पिंपरी चिंचवड शहरात दाखल झाली. या निमित्त गणेश इंटरनॅशनल स्कूल, चिखली, नेवाळे वस्ती येथे वीरशैव लिंगायत समाज सन्मान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे बोलत होते.

## भिडेवाडा कविसंमेलनाला उदंड प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** भिडेवाडाकार कवी विजय वडवेराव आयोजित भिडेवाडा देशातील मुलींची पहिली शाळा आंतर राष्ट्रीय काव्य जागर अभियानांतर्गत पुणे जिल्हास्तरीय पिंपरी - चिंचवड विभागाचे कविसंमेलन पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात रविवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झाले. या कविसंमेलनास रसिक आणि कवी यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. पुणे जिल्ह्यातील विविध भागातून आलेल्या कवींनी देशातील मुलींची पहिली शाळा या विषयावर आपल्या अतिशय सुंदर, वैविध्यपूर्ण, प्रबोधनपर रचना सादर केल्या. क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्याच्या बुधवार पेठेतील भिडेवाड्यात सुरू केलेल्या देशातील मुलींच्या पहिल्या शाळेचा इतिहास जतन व्हावा, घराघरात पोहोचावा या एकमेव उद्देशाने भिडेवाडा काव्य जागर अभियानांतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात या जिल्हास्तरीय कविसंमेलनांचे आयोजन आणि नियोजन करण्यात येणार आहे, असे या अभियानाचे जनक आयोजक कवी विजय वडवेराव यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कांचन मून, अशोक सोनवणे, मेहमूदा शेख, प्रतिमा काळे, प्रतिभा कीर्तीकर्वे, आत्माराम हारे, संजय खोत, कांचन नेवे इत्यादी कवींनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन प्रतिमा काळे आणि प्रतिभा कीर्तीकर्वे यांनी केले; तर आभार प्रदर्शन मेहमूदा शेख यांनी केले.

### नोकरी महोत्सवात 'ऑन द स्पॉट' ३५५ जणांना रोजगार

**चिखली :** सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य नोकरी महोत्सवाला मोठा प्रतिसाद मिळाला. यामध्ये ५३४ जणांनी सहभाग घेतला. त्यातील ३५५ जणांना 'ऑन द स्पॉट' नोकरी देण्यात आली. तर, १२२ जणांना दुस-या राऊंडमध्ये मुलाखतीसाठी बोलविण्यात आले आहे. सामाजिक उपक्रमांनी निलेश नेवाळे यांचा वाढदिवस साजरा केला. घरकुल हॉस्पिटल येथे व्हील चेअर, बाकडे भेट देण्यात आले. मिठाईचे वाटप करण्यात आले. बेरोजगार तरुणांसाठी रविवारी (२९) भव्य नोकरी महोत्सव घेण्यात आला.

पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), हिंजवडी माहिती व तंत्रज्ञाननगरी (आयटी पार्क) मधील कंपन्यांसह बीव्हीजी कंपनी सहभागी झाली होती. या नोकरी महोत्सवात ५३४ जणांनी सहभाग घेतला. त्यातील ३५५ जणांना 'ऑद न स्पॉट' नोकरी देण्यात आली. तर, १२३ जणांना दुस-या राऊंडमध्ये मुलाखतीसाठी बोलविण्यात आले आहे. ३५५ जणांना जागेवर नोकरी मिळाली. याचे समाधान आहे. उर्वरित १२३ जणांनाही लवकरच नोकरी मिळेल असा विश्वास नेवाळे यांनी व्यक्त केला.

पान १ वरून

### दोन तास अडतीस निर्णय

आला आहे. प्राचीन काळापासून मानवाच्या दैनंदिन जीवनामध्ये गायीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वैदिक काळापासून गायीचे धार्मिक, वैज्ञानिक व आर्थिक महत्त्व विचारात घेऊन त्यांना कामधेनू असे संबोधण्यात येते. राज्यातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या देशी जातींच्या गायी आढळतात. (उदा. मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी, पश्चिम महाराष्ट्रात खिल्लारी, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ). तथापि दिवसेंदिवस देशी कायींच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर घट होत आहे', अशी चिंता या आदेशाच्या सुरुवातीलाच व्यक्त करण्यात आली आहे.

#### मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय

- पालघर जिल्ह्यातील मुरबे येथे बहुउद्देशीय बंदर प्रकल्प. जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर विकासक (बंदरे विभाग)
- धारावीतल्या अपात्र झोपडीधारकांसाठी परवडणारी भाडेतत्त्वावरील घरे योजना.धारावी पुनर्वसन प्रकल्पावर जबाबदारी. (गृहनिर्माण विभाग)
- सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उत्पादनाची मर्यादा वाढवून 20 लाख. (वित्त विभाग)
- अनुसूचित जाती, नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी कृषी स्वावलंबन योजनेचे आर्थिक निकष वाढवले. अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ होणार. (कृषी विभाग)
- सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ. (इतर मागास बहुजन कल्याण)
- जामखेडच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सूत गिरणीला अर्थसहाय्य करणार. (इतर मागास बहुजन कल्याण)
- राज्यातील होमगार्डांच्या भत्त्यात भरीव वाढ. सुमारे ४० हजार होमगार्डना लाभ. (गृह विभाग)
- नाशिकचे वैद्यकीय पदवी महाविद्यालय व रुग्णालय शासनाच्या अखत्यारीत घेणार. (वैद्यकीय शिक्षण)
- आयुर्वेद, युनानी महाविद्यालयातील पदभरतीसाठी निवड समिती. (वैद्यकीय शिक्षण)
- राज्यातील आणखी २६ आयटीआय संस्थांचे नामकरण. (कौशल्य विकास)
- आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ. (नियोजन विभाग)
- श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर समितीवरील सदस्यांची संख्या वाढवून 15. (विधी व न्याय विभाग)
- अधिसंख्य कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित. (सामान्य प्रशासन विभाग)
- बार्टीच्या धरतीवर वनार्टी स्वायत्त संस्था. (इतर मागास बहुजन कल्याण)
- मेट्रो तीन प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मुद्रांक शुल्कात सवलत. (महसूल विभाग)
- जिल्हा परिषदेतील 2005 नंतर रुजू कर्मचाऱ्यांना एक वेळ पर्याय. (ग्रामविकास विभाग)
- पंचगंगा नदी प्रदूषणासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अद्यावत करणार. (उद्योग विभाग)
- राज्यात विशेष शिक्षक 4860 पदांची निर्मिती. (शालेय शिक्षण)
- शासन हमी शुल्काचा दर कमी करण्याचा निर्णय. हमी शुल्क माफी मिळणार नाही. (वित्त विभाग)
- अवयवदान व अवयव प्रत्यारोपणासाठी यंत्रणा. जनजागृतीवर भर. (वैद्यकीय शिक्षण विभाग)
- माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा तिसरा अहवाल स्वीकारला. (सामान्य प्रशासन विभाग)
- राज्यातील सैनिकी शाळांसाठी आता सुधारित धोरण. (शालेय शिक्षण)
- डाळींब, सिताफळ इस्टेट उभारणार उत्पादकांना मोठा लाभ. (कृषी विभाग)
- महसुली उत्पन्न वाढवण्यासाठी मुद्रांक अधिनियमात सुधारणा. (महसूल विभाग)

### तरुणीला गुंगीचे औषध देऊन बलात्कार

दरम्यान, या प्रकारातून तरुणी गर्भवती राहिल्यावर चंदननगर येथील हॉस्पिटलमध्ये तिचा जबरदस्तीने गर्भपात देखील करण्यात आला. यानंतर तिला जीवे मारण्याचा देखील प्रयत्न करण्यात आला. पीडित मुलीचा गळा आवळून हाताने मारहाण देखील केली. ऐवढेच नाही तर तिच्याशी पुन्हा अनैसर्गिक शारीरिक संबंध देखील ठेवले. अखेर या त्रासाला कंटाळलेल्या मुलीने पोलिसांत धाव घेत या प्रकरणी तक्रार दिली आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक वंजारी तपास करीत आहेत. पुण्यात मुली व महिलांवर अत्याचार वाढले आहे. रोज अशा घटना उघडकीस येत आहेत. त्यामुळे पुणे शहर महिलांसाठी असुरक्षित बनले आहे. आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सर्व सामान्य नागरिक करत आहेत.

### निवडणूक आयोगाची तयारी झाली पूर्ण

यात एससीचे २९ आणि एसटीचे २५ मतदारसंघ आहेत. तर नोंदणीकृत मतदारांची संख्या ९.५९ कोटी आहे. यापैकी पुरूष मतदार - ४.५९ कोटी आणि महिला मतदारांची संख्या ४.६४ कोटी आहे. तर तृतीयपंथीय मतदारांची संख्या देखील ६ हजार आहे. ८५ वर्षांच्या पुढचे मतदार १२.४८ लाख असून पहिल्यांदाच मतदान करणारे मतदार १९.४८ लाख मतदार आहेत. राज्यात १ लाख १८६ मतदान केंद्र असून ९ लाख नवीन महिला मतदार असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिली. तसेच मतदान १०० टक्के होण्यासाठी प्रयत्न केले जातील. शहरी विभागात बुथवर १०० टक्के आणि ग्रामीण भागात ५० टक्के सीसीटीव्ही लावण्यात येतील, अशी माहिती दिली. राजीव कुमार यांनी राज्यातील निवडणुकांच्या अनुशंगाने सर्व राजकीय पक्ष आणि शासकीय कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्यात आला. यामध्ये ११ राजकीय पक्षांशी साधण्यात आला. यावेळी राजकीय पक्षांनी दिपावली आणि छट पुजेचा विचार करून निवडणुकांची तारीख जाहीर करावी. शनिवार, रविवार सोडून मतदान घ्यावे, मतदान केंद्रावर मतदाना वेळी योग्य तयारी करण्यात यावी. त्याचबरोबर सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्यांवर विचार व्हावा. तर पोलिंग एजंट त्याच मतदान केंद्राचा असावा, खर्चाचा विचार करून वाढवावा. फेक न्यूज वर देखील काम करावे, अशा मागण्या करण्यात आल्याचेही राजीव कुमार म्हणाले. राजीव कुमार यांनी सण उत्सवाचा विचारकरून निवडणूकबाबत विचार केला जाईल, अशी माहिती दिली. तसेच राजीव कुमार यांनी, ज्या नेत्यांवर गुन्हे दाखल आहेत त्यांना स्थानिक वृत्तपत्र आणि चॅनलमध्ये तीनदा जाहिरात द्यावी लागणार असल्याचे स्पष्ट केले आहे. यामुळे राजकिय पक्षांना नियम पाळत गुन्हे दाखल असलेल्या नेत्याला उमेदवारी का दिली याबाबत स्पष्टीकरण द्यावे लागणार आहे. प्रत्येक केंद्रावर व्हिलचेअर, रॅम दिव्यांगासाठी करण्यात येतील. पाणी, लाईटची व्यवस्था करण्यात येईल. तर जेथे लांब लाईन लागणारी ठिकाणे आहेत तेथे मतदारांना बसण्याची व्यवस्था केली जाईल. तर यावेळी देखील वयोवृद्धांचे घरात जाऊन फार्म डी च्या माध्यमातून मतदान घेतले जाईल. पण अनेक वृद्धांची अशी इच्छा असते की ते घराबाहेर पडून मतदान करण्यास येतात. त्याप्रमाणे तरूणांनी देखील घराबाहेर पडावे, असे आवाहन कुमार यांनी केले.

### 16 ऑक्टोबरला होणार सुनावणी

वास्तविक, या प्रकरणी मशिदीच्या वतीने रिकॉल अर्ज दाखल करण्यात आला आहे. ज्यामध्ये असे म्हटले आहे की इश्यू पॉइंट ठरवण्यापूर्वी, रिकॉल ॲप्लिकेशन (ऑर्डर मागे घेण्यासाठी दाखल केलेला अर्ज) ऐकला जावा. याचा मंदिराच्या वतीने निषेध करण्यात आला. गेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाने मंदिराच्या बाजूने 30 सप्टेंबरपर्यंत उत्तर दाखल करण्यास सांगितले होते.

### राजकारणापासून देवाला ...



याचिकाकर्त्यांमध्ये डॉ. सुब्रमण्यम स्वामी, वाय.व्ही. सुब्बा रेड्डी, विक्रम संपत आणि दुष्यंत श्रीधर. सुरेश चव्हाणके यांच्या वतीने ज्येष्ठ वकील सोनिया माथूर युक्तिवाद करत आहेत. सिद्धार्थ लुथरा आणि मुकुल रोहतगी हे आंध्र प्रदेश सरकारचे आहेत. केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता उपस्थित आहेत. सुब्रमण्यम स्वामींच्या वतीने ज्येष्ठ वकील राजशेखर राव सर्वोच्च न्यायालयात म्हणाले - मी भक्त म्हणून न्यायालयात हजर झालो आहे. प्रसादाच्या भेसळीवर प्रसारमाध्यमांमध्ये दिलेल्या वक्तव्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतील आणि जातीय सलोखा बिघडू शकतो. तो चिंतेचा विषय आहे, देवाच्या प्रसादावर काही प्रश्नचिन्ह असेल तर त्याची चौकशी झाली पाहिजे. यावर कोर्ट म्हणाले- 'जेव्हा खुद्द मुख्यमंत्र्यांनी प्रसादमध्ये प्राण्यांची चरबी असल्याबाबतचा तपास एसआयटीकडे दिला आहे. मग त्यांना आधी माध्यमांसमोर जाण्याची काय गरज होती? निदान देवाला तरी राजकारणापासून दूर ठेवा.

### हिटलरनंतर नेतान्याहू हे...

लेबनॉनवरील हल्ल्याने ते गुन्हेगार असल्याचे सिद्ध झाले आहे. पॅलेस्टाईननंतर आता तो लेबनॉनमध्येही हजारो लोकांची हत्या करत आहे. यापूर्वी मेहबूबा यांनी इस्रायली हवाई हल्ल्यात हिजबुल्ला प्रमुख हसन नसराल्लाहच्या हत्येचा निषेध केला होता. आणि लेबनॉन-पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आपला निवडणूक प्रचार एक दिवसासाठी रद्द केला होता.

### अंतर्गत मतदानातून आज ठरणार भाजपचा उमेदवार

विधानसभा मतदारसंघात ६० ते ७० जणांना आपल्या पसंतीच्या तीन उमेदवारांना मते देण्यास सांगण्यात येणार आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केंद्रातून आलेले निरीक्षक पसंती क्रमानुसार तीन नावे प्रदेश भाजपाला पाठवतील. नंतर भाजपा प्रदेश कोण ही नावे पुढे केंद्र स्तरावर पाठवण्यात येतील. त्यानंतर वरिष्ठांकडे पाठवण्यात आलेली नाव आणि पक्षाच्या पातळीवर करण्यात आलेले सर्वेक्षण यांच्या आधारावर ज्याची निवडणूक जिंकण्याची जास्त क्षमता असेल त्यालाच तिकीट जाहीर करण्यात येईल, असं भाजपाच्या सूत्रांकडून सांगण्यात आले.

### सतरा वर्षीय युवकाचा खून

तेव्हा आरोपींनी चाकू काढून ओंकार पोळ याच्यावर सपासप वार केले. ओंकार रक्ताच्या थारोळ्यात पडल्यावर दोघेही आरोपी पळून गेले. त्यानंतर ओंकार याला सिल्व्हर ज्युबिली रुग्णालयात आणण्यात आले. पण डॉक्टर तपासणीपूर्वीच त्याचा मृत्यु झाला होता. या प्रकाराने बारामती शहरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले आहे.

### अजित पवार गटाचं ...

अजित पवार गटाचे टेन्शन वाढले आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात शरद पवार गटाला अपक्षांचा मोठा फटका बसला होता. शरद पवार गटाला निवडणुकीत तुतारी हे चिन्हं मिळालं. तर काही अपक्षांना पिपाणी चिन्ह मिळालं होतं. या चिन्हामुळे मतदार संभ्रमीत झाला आणि शरद पवारांची मतं अपक्षांना मिळाली होती. विधानसभेत हा घोळ टाळण्यासाठी आणि अजित पवारांच्या अडचणी वाढवण्यासाठी शरद पवारांकडून हा नवा डाव टाकण्यात आल्याचे बोलले जाते.

### यंदा नवरात्र उत्सव दहा दिवसांचा

आणि दसरा आहे.वयोमानामुळे किंवा आरोग्य विषयक अडचणींमुळे ज्यांना नवरात्रीचे ९ दिवस उपवास करणे शक्य नाही, त्यांनी उठता बसता म्हणजे नवरात्रीच्या पहिल्या आणि शेवटच्या दिवशी उपवास करावा. मात्र ते ही शक्य नसल्यास किमान अष्टमीचा उपवास तरी करावा.अशौचामुळे किंवा इतर काही अडचणींमुळे ज्यांना ३ ऑक्टोबर रोजी घटस्थापना करणे शक्य होणार नाही त्यांनी अशौच निवृत्तिनंतर (अशौच संपल्यावर) ५ ऑक्टोबर, ८ ऑक्टोबर, १० ऑक्टोबर किंवा ११ ऑक्टोबर यापैकी कोणत्याही दिवशी घटस्थापना करावी व १२ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्थापन करावे. महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे) ह्या दिवशी मध्यरात्री अष्टमी तिथीवर देवीचे पूजन करण्याची प्रथा आहे. अशी अष्टमी १० ऑक्टोबर रोजी मध्यरात्री मिळते. त्यामुळे त्या दिवशी महालक्ष्मीपूजन दिलेले आहे. मात्र, दुर्गाष्टमी ११ ऑक्टोबर रोजी आहे. विजया दशमी, दसरा, सीमोल्लंघन हे १२ ऑक्टोबर रोजी असून साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला दसरा हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो. या दिवशी विजय मुहूर्तावर अनेक लोक आपल्या नवीन उपक्रमाचा आरंभ करतात. हा विजय मुहूर्त महाराष्ट्रामध्ये दुपारी २.२२ ते ३.०९ या दरम्यान आहे, अशी माहिती दाते पंचांगकर्ते यांनी दिली आहे.

### प्रचार संपला, आज मतदान

आतापर्यंत २३ सरकारी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच 6 कंत्राटी व तदर्थ कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यात आले आहे. अंमलबजावणी यंत्रणांनी 130 कोटी रुपये जप्त केले आहेत. पोलिस विभागाने सर्वाधिक 107.50 कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आयोगाच्या म्हणण्यानुसार, आतापर्यंत नोंदवलेल्या 1263 MCC उल्लंघनाच्या प्रकरणांपैकी 600 तपासानंतर बंद करण्यात आले आहेत. तसेच कारवाईही करण्यात आली आहे. 364 प्रकरणांची चौकशी सुरू आहे. एमसीसी उल्लंघनाच्या 115 नोटिसा अजूनही उमेदवार, राजकीय पक्ष, मीडिया हाऊस यांच्याविरुद्ध जारी करण्यात आल्या आहेत. अंमलबजावणी संस्थांनी ड्रग्ज, रोख रक्कम आणि अवैध दारूशी संबंधित 32 एफआयआर देखील नोंदवले आहेत.

# चाकण औद्योगिक भागात नैसर्गिक प्रवाह खुले होणार का?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शेलपिंपळगाव :** चाकण मध्ये कारखानदारी आल्यानंतर जमिनींना सोन्याचे भाव आले. त्यानंतर अनेक जुने ओढे अतिक्रमणे करून एकीकडे बुजवण्यात येत आहेत; तर अजून अस्तित्वात असलेल्या काही ओढ्यांना पाईप लाईन मध्ये बंदिस्त करण्यात आले. त्यामुळे संततधार आणि मुसळधार पाऊस एक दिवस जरी पडला तरी काय स्थिती होते, याचा अनुभव यंदाच्या पावसाळ्यात पावसाने ठीकठिकाणी आला.





**अतिक्रमण पुन्हा एकदा चव्हाट्यावर:** चाकण औद्योगिक भागात ओढ्यांवर झालेल्या अतिक्रमणांमुळे निर्माण होणारी स्थिती. ( छाया : सतीश आगळे, शेलपिंपळगाव )

यंदा पावसाने ठिकठिकाणी घरे, दुकाने आणि महामार्गावर पाणी तुंबले. सर्वत्र ओढ्यांवर झालेले अतिक्रमण पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे. चाकण परिसरात जमिनींना सोन्याचे मोल आल्याने अनेक जुने मोठे ओढे नाले आणि पाण्याचे नैसर्गिक प्रवाह अडविण्यात आले आहेत. मोठ्या ओढ्यांना अटकाव करीत त्याजागी लहान पाईप टाकून पाणी वाहून जावे यासाठी केविलवाणा प्रयत्न केल्याचे दृश्य अनेक ठिकाणी पहावयास मिळते. अनेक ठिकाणी ओढ्यांमध्ये अतिक्रमणे करण्यात आली आहेत. या बाबतच्या तक्रारी प्रशासनाच्या समोर करण्यात आलेल्या आहेत. चाकणच्या पश्चिमेला शेती - टेकड्या असून त्यातून खाली येणारे नैसर्गिक ओढे अशी भूरचना आहे. हे ओढे रस्त्याच्या खालून पूर्व दिशेला वाहत येतात. केवळ पावसाळ्यात ओढ्यांमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाहते आणि ओढे स्वच्छ होतात . अन्य वेळी या ओढ्यांच्या जवळून जाणेही कठीण होते. वाढलेल्या नागरीकरणाने अनेक ठिकाणी सांडपाणी आणि शौचालयांचे पाणी थेट ओढ्यांमध्ये सोडण्यात आल्याने ओढ्यांची स्थिती गंभीर झाली आहे. संपून चाकण औद्योगिक परिसरातील ओढ्यांचे नैसर्गिक प्रवाह खुलेच करता येणार नाहीत अशी एकूणच स्थिती झाली आहे.

# राजगुरुनगर सहकारी बँकेला सर्वोत्कृष्ठ बँक पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या राजगुरुनगर सहकारी बँकेस 'महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन'ने यावर्षीचा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार, तृतीय क्रमांकासाठी जाहीर केला. हा पुरस्कार बँकेस केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष दिनेश ओसवाल यांनी दिली.

फेडरेशन राज्यभरातील उत्कृष्ट कामकाज असलेल्या बँकांमधून दरवर्षी पुरस्कारार्थी बँका निवडते. राजगुरुनगर बँकेला १००० ते २५०० कोटींच्या दरम्यान ठेवी असलेल्या गटातून हा पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराचे वितरण २८ सप्टेंबर रोजी पुणे येथे कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभागृहात झालेल्या बँक फेडरेशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आले. यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, फेडरेशनचे अध्यक्ष अजय



'महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन'

ब्रह्मेचा, उपाध्यक्षा वैशाली आवाडे, राजगुरुनगर बँकेचे अध्यक्ष दिनेश ओसवाल, उपाध्यक्ष अविनाश कहाणे, संचालक किरण आहेर, राजेंद्र सांडभोर, विजया शिंदे, राजेंद्र वाळुंज, अरूण थिगळे, विनायक घुमटकर, समीर आहेर, सचिन मांजरे, अश्विनी पाचारणे, रामदास धनवटे, तज्ञ संचालक अॅड. धर्मेंद्र खांडरे, गौतम कोतवाल, दीपक वारुळे, प्रकाश डोळस, मुख्य कार्यकारी अधिकारी शांताराम वाकचौरे उपस्थित होते.

रिझर्व्ह बँकेने 'फिनान्शियली साउंड अँड वेल मॅनेज्ड' बँकेसाठी ठरवून दिलेले निकष पूर्ण करण्यासाठी बँक कसोशीने प्रयत्न करत आहे. बँकेला ४५ कोटी हा आजवरचा उच्चांकी ढोबळ नफा यावर्षी झाला आहे. बँकेने ९४४ कोटींचे कर्जवाटप केलेले आहे तर १५५२ कोटींच्या ठेवी गोळा केल्या आहेत. बँकेचा एकूण व्यवसाय २४९६ कोटींचा झाला आहे. बँकेचा नेट एनपीए तब्बल अकरा वर्षांनंतर शून्य टक्के झाला आहे. बँकेला लेखापरीक्षणात 'अ' वर्ग मिळाला आहे. केंद्र शासनाच्या एमएसएमई अनुदानासाठी पात्र ठरलेली पुणे जिल्ह्यातील पहिली नागरी सहकारी बँक ठरली आहे. बँकेच्या या एकंदरीत कामगिरीचा विचार करून फेडरेशनने बँकेला हा पुरस्कार दिला आहे, असे ओसवाल यांनी सांगितले.

बँकेला तब्बल ११ वर्षांच्या कालखंडानंतर फेडरेशनचा पुरस्कार मिळाला आहे. नोटाबंदी आणि कोरोनाच्या निराशाजनक कालावधीनंतर व्यावसायिक दृष्टिकोन, प्रेरणादायी वातावरण आणि सकारात्मक भूमिका यांमुळे बँकेने पुन्हा नवी भरारी घेतली आहे.

# डॉ. गणेश राऊत साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खडकवासला :** अठराव्या अखिल भारतीय प्रतिभा महा सम्मेलन 2024 आचार्य अत्रे रंगमंदिर पिंपरी चिंचवड येथे झालेल्या, महासंमेलनात कोंढवे धावडे गावाचे सुपुत्र डॉ. गणेश विठ्ठल राऊत यांना संमेलनाध्यक्ष डॉ. शामकांत देवरे साहेब सचिव महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश, डॉ. क्रांती महाजन, सुभेदार कुणाल मालुसरे सुभेदार तानाजी बाबा मालुसरे यांचे तेरावे वंशज, व सरदार किरण सिंह क्रांतिकारी शहीद भगतसिंग यांचे भाचे या दिग्गज व्यक्तीच्या शुभ हस्ते " महाराष्ट्र साहित्य रत्न पुरस्काराने ट्रॉफी सर्टिफिकेट व मेडल गौरविण्यात आले.

गेली अनेक वर्ष वास्तववादी लिखाण, प्रत्येक सामाजिक राजकीय दिग्गज व्यक्तींवर शब्दांकन, छत्रपती शिवराय छत्रपती शंभूराजे यांच्या वर वास्तववादी कविता, निसर्ग दैनंदिनी जीवन, कारोना काळात जीवन तसेच आयुष्याच्या जीवनातील संघर्ष यावर जवळपास सातशे पन्नास स्वेयलिखित कविता आणि गरीब सामान्य अपंग, महिला सक्षमीकरण या सर्व बाबींचा विचार करून त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण आपल काम आहे असे तसेच त्यांनी केलेल्या छत्रपती शिवराय यांच्या कवितेचे प्रकाशनही आम्ही करणार कोळशाच्या खाणीतच हिरे सापडतात तसाच एक हिरा डॉ. गणेश राऊत यांच्या रूपांत सापडला असे मत डॉ. क्रांती महाजन यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाला डॉ. सुषमा कुलकर्णी कुलाधिपती , जय नारायण चौकसे कुलाधीपती, यशवंत कुर्वे संचालक अनाथ आश्रम नागपूर,डॉ. सुनील साळवे चेअरमन निरामय सेंटर डॉ. कौशिक गायकवाड हे उपस्थित होते.

# नागरिकाने मोबाईल चोरणाऱ्यांना पकडले

### भगवान थोरवेने केला मोबाईल चोरांचा एक किलोमीटर पाठलाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर सह परिसरात वारंवार मोबाईल चोरीच्या घटना घडत असताना नुकतेच मोबाईल हिसकावून पळून जाणाऱ्या दोघा मोबाईल चोरांना भगवान थोरवे या युवकाने तब्बल एक किलोमीटर पाठलाग करत पोलिसांच्या स्वाधीन केले असून प्रसाद संतोष भोंडवे सह एका अल्पवयीन युवकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिक्रापूर ता. शिरुर येथील बाजार मैदान जवळ परशराम वडर हे मोबाईल हातात घेऊन उभे असताना दुचाकीहून आलेल्या दोघांनी परशराम यांचा मोबाईल हिसकावून पळून जाऊ लागले, सदर घटना पाहिलेल्या साची चायनीज हॉटेलचे संचालक भगवान थोरवे यांनी सदर दुचाकीस्वारांचा पाठलाग करत तब्बल एक किलोमीटर अंतर गेल्यावर शिताफीने दुचाकी स्वारांना धक्का दिल्याने दोघांच्या दुचाक्या घसरल्या मात्र यावेळी दोघे चोरटे पळून जाऊ लागले असताना भगवानने एकाला शिताफीने पकडले मात्र एकजन दुचाकी घेऊन पळून गेला,

# बाजारात लाडक्या सर्जाराजाच्या सणासाठी बळीराजाची गर्दी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड:** उद्या बुधवारी साजरा होणाऱ्या भाद्रपदी बैलपोळ्यानिमित्त सासवडसह ग्रामीण भागातील दुकाने विविध वस्तूंनी सजली आहेत. आज सासवडच्या सोमवारी आठवडी बाजारात बैलांच्या सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांनी गर्दी केली होती. यावर्षी पावसाने चांगली साथ दिल्याने बळीराजा खुश असुन आपल्या लाडक्या सर्जाराजाच्या सणासाठी तो उत्सुक झाला आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानामुळे बैलांची संख्या दिवसेंदिवस घटत असली तरीही हा सण मोठया उत्साहात साजरा केला जात आहे. सध्या भाद्रपद उन्हाची झळ



बसत असूनही बाजारात वस्तू खरेदीसाठी गर्दी पहावयास मिळत आहे यवत येथून पारंपरिक घुंगुर माळा बनवनारे बबन गणगे यांनी भर ऊन्हात बाजारात माळ विक्रीला ठेवल्या आहेत .

साडे पाच हजारांपर्यंत घुंगुरमाळ जोडी असल्याचे ते. सांगतात.पुरंदरच्या पूर्व भागातील पिसर्वे गावचे दुकानदार

विक्रम संजय कोलते यांनी वेगवेगळ्या सजावटीच्या वस्तू विक्रीस ठेवल्या असुन गतवर्षीच्या तुलनेत यंदा १५ ते २० टक्के भाववाढ झाल्याचे सांगितले. आकर्षक झुली, पितळी शेंब्या, म्होरकी, शिंगदोरी, कवडीमाळ, रंगी बेरंगी बेगड, विविध प्रकारचे रंग , फुगे, आसुड, हिंगुळ, दृष्टमाळ, मनीमाळ, गोंडे आदी वस्तू विक्रीस ठेवल्याचे विक्रम कोलते, माऊली कोलते यांनी सांगितले .

# दोन पिस्तुलासह २ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** पोलिस असल्याची बतावणी करत बारामतीतील एका भंगार व्यावसायिकाचे अपहरण करत त्याला लुटणा-या टोळीतील सहाजणांपैकी तिघांना पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली. बारामती तालुका व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. या कारवाईत दोन गावठी पिस्तुलासह २ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.



सोलापूरकडे जाण्याच्या तयारीत असलेल्या या आरोपींकडे सखोल चौकशी केली असता ते सांगोला-जत मार्गावरील शेगाव येथील एका सोनार व्यावसायिकास लुटण्यासाठी जात असल्याची माहिती मिळाली. आरोपी सुरज मदने याने ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा केल्याचे उघडकीस आले. त्याच्या घरासमोर हा ट्रॅक्टर आढळून आला.

# नीरा रेल्वे स्टेशनमध्ये ज्युबिलंट तर्फे स्वच्छता अभियान



नीरा रेल्वे स्टेशनमध्ये स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता करताना ज्युबिलंटचे अधिकारी.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरा रेल्वे स्टेशनमध्ये ज्युबिलंट इंग्रेव्हीया लि. व ज्युबिलंट भारतीया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वछता ही सेवा २०२४ या अभियानांतर्गत सोमवारी( दि.३०) स्वच्छता अभियान राबविण्यात आल्याची माहिती ज्युबिलंट इंग्रेव्हीया कंपनीचे जनसंपर्क अधिकारी इसाक मुजावर यांनी दिली.नीरा - निंबुत येथील ज्युबिलंट भारतीया फाउंडेशनच्या माध्यमातून सतत वेगवेगळ्या योजना नीरा व आसपासच्या भागात राबविल्या जात असल्याचे मुजावर यांनी सांगितले.

नीरा रेल्वे स्टेशनमध्ये राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानाात ज्युबिलंट इंग्रेव्हीया कंपनीचे हेड मेन्टेनन्स अधिकारी राजेंद्र राघव, प्रॉडकशन हेडडॉ. योगेश कोपरकर ,बायोकंपोस्ट हेड मधुकर घोगरे ,बॉयलर इन्चार्ज गणेश पडोळे , किरण ठाकूर, महेंद्र तांक ,युवराज काळे ,सचिन जाधव ,अभिषेक पगारे , सूर्यकांत पाटील , नितीन फिरके व सर्व महिला अधिकारी तसेच ज्युबिलंट भारतीया फाउंडेशनचे अजय ढगे व रेल्वे अधिकारी सत्यनाम सिंग यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## Selected



### शिक्रापूरात महिलांचे आकाशकंदील प्रशिक्षण संपन्न

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथे माहेर संस्थेच्या वतीने तंत्रज्ञान प्रकल्पाच्या माध्यमातून बचत गटातील महिला व युवतींसाठी एक दिवशीय आकर्षक, मोहक, आणि वेगवेगळया डिझाईनचे आकाश कंदील बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथे माहेर संस्थेच्या वतीने तंत्रज्ञान प्रकल्पाच्या माध्यमातून आयोजित आकाश कंदील प्रशिक्षणासाठी तब्बल पंचवीस महिला व युवती सहभागी झाल्या होत्या, दरम्यान तंत्रज्ञान प्रकल्प प्रमुख तेजस्विनी पवार यांनी उपस्थित महिलांना सदर प्रशिक्षण दिले असून महिला सर्व कलांसह विविध प्रशिक्षण घेऊन स्वयंपूर्ण बनावी व सध्याच्या सद्याच्या युगात एकाचे उत्पन्नावर कुटुंबाचे गुजारण होणे दिवसेंदिवस अवघड होत असल्याने कुटुंबातील महिलेचा देखील घराला हातभार लागावा या उद्देशातून हे प्रशिक्षण देण्यात आले, या प्रशिक्षणावेळी महिलांनी वेगवेगळे आकाश कंदील बनवल्याने आपण स्वतः आकर्षक आकाश कंदील बनवू शकतो हा आत्मविश्वास महिलांमध्ये आला आहे, यावेळी सर्व महिलांनी प्रशिक्षिका तेजस्विनी पवार यांचे आभार मानले.



### अवैध दारू विक्री व्यवसायांवर सासवड पोलीसांची कारवाई

**सासवड :** शहराचे हद्दीत अवैधरित्या गावठी हातभट्टीची तयार दारू चोरून लोकांना विक्री करीत असल्याचे सासवड पोलीसांना समजले होते. त्याप्रमाणे पालीस निरीक्षक ऋषिकेष अधिकारी यांनी छापा टाकणे कामी दोन वेगवेगळे पोलीस पथके सासवड शहरात रवाना केले. दोन पथकांनी सासवड शहरातील गिरमेआळी सार्वजनीक शौचालयाचे बाजुला, कैकाडीआळी येथे पडक्या घराचे आडोशाला गावठी हाथभट्टीची तयार दारूचे प्लास्टीकचे फुगे लोकांना चोरून विक्री करीत असतांना दोन व्यक्ती सापडल्या . त्यांचेवर छापा टाकून ताब्यात घेवून दारूचा साठा जप्त केला आहे.

छापा कारवाई दोन पथके - सहा.पोलीस निरीक्षक - वैभव सोनवणे, पोलीस उप.निरीक्षक - अर्जुन चोरघे, पोलीस हवालदार - जब्बार सय्यद, सुहास लाटणे, गणेश पोटे, पोलीस अंमलदार - अक्षय चिले, सचिन किवळे. आदींचा समावेश होता



गोजुबावीयेथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये व्यंगचित्रकार शिवाजी गावडे विद्यार्थ्यांसमोर मनोगत व्यक्त करताना.

### विद्यार्थ्यांनी कला जोपासावी: गावडे

**बारामती, :** प्रत्येकात एक कला असते. लहानपणापासूनच मुलांनी कला जोपासली पाहिजे. कलेमुळे मन निर्मळ होते, आरोग्य सुधारते. दररोज कलेसाठी थोडा वेळ दिला तर आपण कलेमध्ये पारंगत होतो. विद्यार्थी हेच कलेचे बीजेपेरण्याचे वय आहे. जीवनात प्रत्येकाकडे कोणतीही एक कला अंगीकृत असली पाहिजे. " असे मत व्यंगचित्रकार शिवाजी गावडे यांनी व्यक्त केले. गोजुबावी ( ता. बारामती )येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये कला हेच जीवन या विषयावर आनंददायी शनिवार अंतर्गत व्यंगचित्रकार शिवाजी गावडे यांचे व्याख्यान पार पडले. यावेळी गावडे बोलत होते. यावेळी मुख्याध्यापक बाळू भिसे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी गावडे पुढे म्हणाले, " कलाभिमुख समाज असेल तर समाजात एकोपा वाढीस लागण्यास मदत होते. व्याख्यानाच्या शेवटी श्री. गावडे यांनी काही व्यंगचित्रे विद्यार्थ्यांच्या समोर काढून दाखवली. व्यंगचित्रे पाहून विद्यार्थी अवाक झाले.

## ऑक्टोबर जागतिक वन्यजीव सप्ताह विशेष

# मुस्लीम समाजातील युवक करतोय पशु-पक्षांची सेवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** मुस्लीम समाजातील काही युवक समाजात आदर्श काम करुन आपल्या नावाचा आगळावेगळा ठसा निर्माण करताना दिसत असून असाच शिरुर तालुक्यातील शेरखान शेख हा मुस्लीम समजातील युवक शेरखान शेख पशु पक्षांच्या रक्षणासाठी अनोखे कार्य करत असल्याने पशु पक्षांच्या रक्षणासाठी झटणारा अवलिया अशी शेरखानची ओळख निर्माण केली आहे.



शिरुर तालुक्यात पशु पक्षांच्या रक्षणासाठी झटणारा शेरखान शेख

शिरुर तालुक्यातील शेरखान शेख यांना पशु पक्षांबाबत आवड असल्याने अनेक पशु पक्षांच्या रक्षणाचे कार्य सुरु करुन शेकडो विषारी बिनविषारी सापांसह जखमी मोर, पोपट, कासव, बगळा, कोल्हा, घुबड, घोरपड, सरडे, हरीण, साळींदर यांच्या सह शेतांमध्ये आढळून आलेल्या बिबट्याच्या बछड्यांसह वन्य प्राण्यांना देखील वनविभागांच्या मदतीने जीवदान देत त्या बछड्यांना त्यांच्या आईच्या स्वाधीन करण्याचे काम केले आहे, त्यांना पशु पक्षांची आवड असल्याने अनेक पशु पक्षांची ते सेवा करतात, शेरखान शेख यांनी यापूर्वी सापांच्या अंड्यांमधून कुत्रिम मदतीने सापाच्या पिलांना जन्म दिला असून उन्हाळ्यामध्ये पशु पक्षांच्या अन्न पाण्याची देखील व्यवस्था करण्यात पुढाकार घेतला, इतकेच नव्हे तर शेरखान शेख हे मुस्लीम समाजातील असून देखील त्यांनी कत्तलीसाठी जाणाऱ्या गाई बैलांची सुटका करत कत्तली साठी जाणारी जनावरे गोशाळेत जमा केली आहेत. तसेच सापांची हत्या करणाऱ्या आणि सापांबाबत अंधश्रद्धा पसरविणाऱ्या लोकांवर सुद्धा गुन्हे दाखल केले आहे, अनेक श्वानांच्या तोंडात अडकलेल्या तसेच पाण्यात पडलेल्या श्वान तसेच वन्य प्राण्यांना जीवदान यांनी दिले आहे, शेरखानने साप पकडण्यासाठी अर्धा किलो वजनाची चांदीची स्टिक बनवून महाराष्ट्रात आपली ओळख निर्माण केली, त्यामुळे साप पकडण्यासाठी चांदीची काठी बनवणारा प्रथम सर्पमित्र म्हणून त्यांच्या नावाची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉड व राष्ट्रीय पातळीवरील ओएमजी बुक रेकॉर्ड मध्ये झाली आहे, शेरखान शेख यांच्या पशु पक्षांसाठी सुरु असलेल्या कार्यामुळे त्यांना अनेक पुरस्कार मिळाले असून शेरखान शेख यांची पशु पक्षांच्या रक्षणासाठी झटणारा अवलिया म्हणून ओळख निर्माण झाली आहे.

#रा

## शरद पवार यांनी केले आघाडीचे धोरण स्पष्ट

# निर्णयाचे सर्वाधिकार राऊत, पटोले व पाटील यांच्याकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती:** आगामी महाविकास आघाडीच्या वतीने जागांविषयी निर्णय घेण्याचे सर्व अधिकार संजय राऊत, नाना पटोले व जयंत पाटील यांना दिलेले आहेत, इच्छुकांना विचारण्यापेक्षाही सामान्य कार्यकर्त्यांना विचारुन व सर्वेक्षणाचा अंदाज घेऊन संबंधित उमेदवार ठरवले जातील, अशी माहिती ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिली.

इंदापूर तालुक्यातील तुतारीच्या चिन्हावर आगामी विधानसभा निवडणूक लढविण्याची इच्छा असलेले उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी रविवारी (ता. 29) शरद पवार यांची त्यांच्या गोविंदबाग निवासस्थानी भेट घेत आपले म्हणणे मांडले. त्यांच्या समोर बोलताना शरद पवार यांनी ही माहिती दिली.

या वेळी दशरथ माने, अप्पासाहेब जगदाळे, प्रवीण माने, महारुद्र पाटील, अशोक घोगरे, तेजसिंह पाटील, अमोल भिसे, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.शरद पवार म्हणाले, पंतप्रधान लोकसभेच्या वेळी त्यांच्या चारशे जागा येतील असे सांगत होते, आज महाराष्ट्रातील वातावरण बदलले आहे. यंदा आम्ही दहा जागा लोकसभेच्या लढविल्या, त्यातील आठ जागांवर विजय मिळाला, यंदा लोकांनीच बदल करायचा



निर्णय घेतला होता. नेत्यांनी काही सांगितले तरी लोकांनी त्यांना जे योग्य वाटले तो निर्णय घेतला. बारामतीतही अनेक नेत्यांनी भाषणे केली, पण तुम्हीच ठरवलेले होते, दीड लाखांहून अधिक मताधिक्याने आपला उमेदवार विजयी झाला.

काही लोकांना आभाळाकडे बघून पाऊस पडेल की नाही ते समजते, आता अनेकांना वाटू लागले आहे की पाऊस पडेल त्या मुळे आपल्याकडील गर्दी वाढू लागली आहे. राज्यात कुठही गेलो तरी हजारोंच्या संख्येने लोक जमतात, लोकांनीच या निवडणूकीत जिंकायच ठरवले आहे, त्या मुळे यंदा चांगले निकाल लागतील यात शंका नाही.महाविकास आघाडी तीन पक्षांची आहे, प्रत्येक तालुक्यात सर्वेक्षण होईल, इच्छुकांना नाही तर कार्यकर्त्यांना विचारुन मगच निर्णय घेतला जाईल, आगामी दहा दिवसात हे काम पूर्ण होईल. माझा अंदाज आहे की 6 ते 10 ऑक्टोबर दरम्यान आयोग तारखा जाहीर करतील. 15 ते 20 नोव्हेंबर दरम्यान मतदान होईल. विचारविनिमय करुन मगच निर्णय घेतला जाईल. यंदा इंदापूरमध्ये बदल घडेल अस वातावरण आहे, त्या मुळे निवडून येण्याची क्षमता विचारात घेत सर्वांना विश्वासात घेऊन अंतिम निर्णय घेऊ, अशी ग्वाही शरद पवार यांनी उपस्थितांना दिली.

आघाडी म्हणून लढणार असल्याने काही जागा मित्रपक्षांना द्याव्या लागणार आहेत, निवडणूकीत त्यांचेही काम करावे लागणार आहे. तुम्हाला तुमचे म्हणणे मांडायचा अधिकार आहे, पण इंदापूरचा पुढचा आमदार आपलाच असेल हे लक्षात घेत सर्वांनी कामाला लागा, असा कानमंत्रच शरद पवार यांनी इंदापूरच्या कार्यकर्त्यांना दिला.

**नको माजी नको आजी आम्हाला हवा नवीन बाजी.....**

इंदापूर तालुक्यातील शिष्टमंडळाने शरद पवार यांच्याकडे निष्ठावान कार्यकर्त्याला संधी देण्याची मागणी केली. नको माजी नको आजी आम्हाला हवा नवीन बाजी या शब्दात कार्यकर्त्यांनी पवार यांच्यासमोर भावना व्यक्त केल्या. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना तुतारीच्या कार्यकर्त्यांनी कडाडून विरोध केल्याने पाटील यांच्यापुढे आता अडचणी वाढल्या आहेत.

## » Selected



### पुरस्कार म्हणजे जबाबदारीमध्ये वाढ : प्रा.जयंत आसगांवकर

**रांजणगाव गणपती :** शिरूर तालुक्यातील शिक्षक म्हणजे उपक्रम व शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमुख केंद्र आहे यामुळे रोटरी क्लबचा राष्ट्र निर्माता शिक्षक पुरस्कार प्राप्त करणे म्हणजे जबाबदारीमध्ये वाढ असल्याचे प्रतिपादन पुणे विभागाचे शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी केले. शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी रोटरी क्लब ऑफ शिक्रापूर यांच्या वतीने सन २०२४ साठीचे नेशन बिल्डर अवॉर्ड प्रदान करण्याच्या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते . शिरूर तालुक्यातील विविध शाळांमधून प्राथमिक व माध्यमिक विभागाचे एकूण २१ गुणवंत शिक्षक यासाठी निवडण्यात आल्याचे प्रतिपादन रोटरी क्लब ऑफ शिक्रापूरचे अध्यक्ष विठ्ठल वाघ व सचिव तुषार पाचुंदकर पाटील यांनी केले. रांजणगाव गणपती येथे स्व.बाबुराव दौंडकर स्मारक समिती सभागृहामध्ये या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी पाठ्यपुस्तकातील कवी हनुमंत चांदगुडे,संस्थापक अध्यक्ष वीरधवल करंजे, असिस्टंट गव्हर्नर डॉ.मिलिंद भोसुरे इ. मान्यवर उपस्थित होते.

# पारगांव पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ वी जयंती उत्साहात साजरी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगांव :** येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज पारगाव विद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त आयोजित विविध कार्यक्रमाचा सांगता समारंभ दि.२९रोजी विद्यालयात पार पडला.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त विद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यातील एक उपक्रम म्हणून माता पालक महामेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यातील संगीत खुर्ची स्पर्धेत मध्ये प्रथम विजेता सौ.पुनम लक्ष्मण वाघमोडे यांना मानाची पैठणी देण्यात आली.तसेच इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी खाऊगल्लीचे सात स्टॉल मध्ये परिश्रम घेत विविध खाद्यपदार्थ तयार करून विक्रीतून शाळेसाठी ६१००० रु जमवले. या खाऊ गल्ली साठी अनेकांचे मार्गदर्शन लाभले.

माजी विद्यार्थी विजय शिवरकर, विश्वजीत कदम, दत्तात्रेय शेलार, गणेश चौधरी, महेश किर्जत, सचिन चव्हाण, गौरव चव्हाण, मनोज बोत्रे यांनी जेसीबी व हायवासाठी फक्त इंधन खर्चच घेत शाळेचे भव्य मैदान तयार करण्यात मोलाचे योगदान दिले. विद्यालयाच्या वतीन या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला,माजी विद्यार्थ्यांकडून तसेच स्कूल कमिटी कडुन विद्यार्थ्यांसाठी लाल मातीत खो-खोसाठी २ मैदाने,कबड्डीसाठी २ मैदाने, लांब उडी साठी एक मैदान व क्रिकेटसाठी १ मैदान सज्ज झाले आहे. पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती निमित्त रांगोळी प्रदर्शन व अटल टिंकरिंग लॅब चे प्रोजेक्ट पाहण्यासाठी ठेवण्यात आले होते. कबड्डी व खो-खो या खेळाच्या मैदानाचे उद्घाटनही मा. श्री. संजय जयसिंग मोहिते (पश्चिम विभागीय अधिकारी) व श्री.पवार एस. टी. यांच्या हस्ते करण्यात आले.

# रब्बी हंगामासाठी बियाणे विक्री सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून यंदाच्या (२०२४-२५) हंगामासाठी ज्वारी, करडई, हरभरा व गहू पिकांच्या वेगवेगळ्या वाणांची सुधारित बियाणे उपलब्ध आहेत. विद्यापीठातील कार्यक्षेत्रासह राज्यातील शेतकऱ्यांनी बियाणे खरेदीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून करण्यात आले आहे. गेल्या वर्षी उत्पादित केलेली बियाणे यंदाच्या रब्बी (२०२४-२५) हंगामात पेरणीसाठी ज्वारी, करडई, हरभरा व गव्हाची बियाणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध संशोधन केंद्रे, कृषी महाविद्यालय, कृषी तंत्र विद्यालय व कृषी विज्ञान केंद्र या ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

राहुरी येथील मध्यवर्ती बियाणे विक्री केंद्रावर व कृषी संशोधन केंद्र, चास, (ता. जि. नगर) येथे ज्वारीच्या फुले रेवती, फुले वसुधा, फुले सुचित्रा, फुले यशोमती, फुले मधूर, फुले रुचिरा, करडईच्या फुले भिवरा (एसएसएफ- १३- ७१) विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

हरभऱ्याचे विजय, फुले विश्वराज, दिग्विजय, विशाल, फुले विक्रम, फुले विक्रांत व गव्हाचे फुले समाधान या वाणांचे बियाणे ऑक्टोबर- २०२४ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल. सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषी संशोधन केंद्र, सोलापूर येथे करडईच्या फुले भवरा (एसएसएफ- १३-७१) या वाणांचे प्रमाणित /सत्यप्रत बियाणे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

कृषी संशोधन केंद्र, कुंदेवाडी, ता. निफाड या विक्री केंद्रावर हरभऱ्याच्या दिग्विजय, विशाल, फुले विक्रम, फुले विक्रांत व गव्हाच्या फुले समाधान या पिकांच्या वाणाचे बियाणे ऑक्टोबर २०२४ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल. कृषी तंत्र विद्यालय, मांजरी फार्म ता. हवेली, जि. पुणे या विक्री केंद्रावर गव्हाचे फुले समाधान या वाणांचे प्रमाणित/ सत्यप्रत बियाणे ऑक्टोबर २०२४ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल.

कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव, जि. सातारा व कृषी विज्ञान केंद्र, धुळे येथील विक्री केंद्रावर गव्हाचे फुले समाधान या वाणाचे बियाणे ऑक्टोबर- २०२४ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल. शेतकऱ्यांनी त्यांच्या नजीकच्या कृषी विद्यापीठाच्या संशोधन केंद्रावर, कृषी महाविद्यालय, कृषी तंत्र विद्यालय व कृषी विज्ञान केंद्र येथे बियाण्यांसाठी संपर्क साधून सुधारित वाणांची बियाणे पेरणीसाठी उपलब्ध करून घ्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

### करडेत दारु अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**शिक्रापूर :** तांदळी ता. शिरुर येथील हॉटेल सागर जवळ एक इसम पोलिसांनी त्याला ताब्यात घेत त्याच्याजवळील दारुसाठा जप्त केला, याबाबत पोलिसांनी कुमार दिलीप जाधव वय ३२ वर्षे रा. करडे ता. शिरुर जि. पुणे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, गाव मौजे चाकण ता. खेड, जि. पुणे येथील मिळकत नं. ६५६ नवा व जुना ५९८ हि मिळकत हि कै. महादु धोंडीबा सायकर याचे मालकीचे असुन कै. महादु धोंडीबा सायकर हे दिनांक ११/०६/२०२४ रोजी मयत त्यांच्या मालकीची वर नमुद मिळकतीस कायदेशीर वारस म्हणुन पत्नी श्रीमती. संगिता महादु सायकर, मुलगा - विशाल महादु सायकर व मुली चैताली सतीश जगताप व सौ वैशाली गणेश कर्पे हे त्याचे कायदेशीर वारस आहे तरी याबाबत कोणास अक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर अस्सल कागदपत्रांनिशी येऊन आमची खात्री पटवून द्यावी

चाकण,
दिनांक: ०१/१०/२०२४

**अॅड. श्री. विकास सोपान राऊत**
ऑफिस नं.४८ सद्‌गुरु कॉम्प्लेक्स, शिक्रापुर रोड चाकण, ता. खेड, जि. पुणे, मो. ८३८१०१६२३०

**श्री सिध्दनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित**
स.नं. २५,गणेश आर्केड, पुणे – सातारा रोड, धनकवडी, पुणे – ४११०४३
**स्थावर मालमत्ता प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष ताबा मिळण्याबाबत नोटीस**
( कायदा कलम १९६१ (११ (ड – १ ) नियम १०७ अन्वये )

**''नमुना झेड''**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ पोटनियम ११ ( ड – १ ) उपनियमान्वये मी खाली सही करणार वसुली अधिकारी, व्दारा श्री सिध्दनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., स.नं. २५, गणेश आर्केड पुणे – सातारा रोड, धनकवडी, पुणे – ४११०४३ महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये दिनांक २४/११/२०२० रोजी कोर्टाच्या निकालानुसार संस्थेचे लवादी थकबाकीदार श्री. रमेश नाना चव्हाण व सौ. वनिता रमेश चव्हाण रा. फेज ६ ए फ्लॅट नं.०८, चंद्रांगण सोसायटी, आंबेगाव बु।।, पुणे – ४११०४६ यांना रक्कम रूपये १३,८४,३७६ / – ( अक्षरी रुपये तेरा लाख चौऱ्याऐंशी हजार तीनशे शहात्तर फक्त ) ची मागणी नोटीस दि. ०७/१२/२०२० रोजी जारी केली आहे. श्री. रमेश नाना चव्हाण व सौ. वनिता रमेश चव्हाण यांनी मागणी नोटीसीनुसार परतफेड केली नसल्यामुळे वसुली अधिकारी या नात्याने खाली निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्ती नोटीस दि. ०९/०८/२०२४ रोजी दिली असून सदरील निर्दिष्ट मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे. संस्थेचे थकबाकीदार श्री. रमेश नाना चव्हाण व सौ. वनिता रमेश चव्हाण व सर्व नागरीकांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६९ मधील नियम १०७ पोटनियम (११ (ड – १) नुसार दि. १२/०९/२०२४ रोजी घेण्यात आला आहे. संस्थेचे थकबाकीदार श्री. रमेश नाना चव्हाण व सौ. वनिता रमेश चव्हाण व सर्व नागरीकांना या नोटीशीव्दारे सावध करण्यात येते की, खालील तपशिलाच्या स्थावर मालमत्तेसंबंधी कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये आणि व्यवहार केल्यास श्री सिध्दनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., स.नं. २५, गणेश आर्केड, पुणे–सातारा रोड, धनकवडी, पुणे–४११०४३ या संस्थेच्या कर्ज बोज्याची रक्कम रु. १३,८४,३७६/– आणि त्यावरील व्याज याला अधिन रहावे लागेल.

| वसुली दाखला / हुकुमनामा क्रमांक व दिनांक | गावाचे नाव तालुका जिल्हा स.नं. / हिस्सा नं. व क्षेत्र | प्लॉट चतुर्सिमा |
| --- | --- | --- |
| १०१/१०१२/ १४२२/२०२० दिनांक २४/११/२०२० | पुणे महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे आंबेगाव बु।। येथील स.नं.११ हिस्सा नं. १ / ११ यांसी क्षेत्र ०० हे. ०५ आर प्लॉट मिळकतीवर बांधलेल्या श्री अपार्टमेंट इमारतीतील पाचव्या मजल्यावरील फ्लॅट नं. ५०४ यांसी क्षेत्र ५३० चौ. फु. म्हणजेच ४९.२५ चौ. मी. बिल्टअप लगतचे बाल्कनीसह ही फ्लॅट मिळकत. | **पुर्वेस :** स.नं.११/१ मधील मिळकत **पश्चिमेस :** स.नं.११/१ मधील मिळकत **दक्षिणेस :** सरकारी रस्ता **उत्तरेस :** स.नं. ११/१ मधील मिळकत |

सदरची ताबा नोटीस आज दिनांक १२/०९/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

**श्री. अजित उ. देशमुख**
**वसुली अधिकारी**
म.स.सं.का.१९६० चे कलम १५६ व
म.स.सं.अ.१९६१ चे नियम १०७ अन्वये

**दिनांक:** १२/०९/२०२४
**ठिकाण :** आंबेगाव बु।।, पुणे.

# जेजुरी कडेपठार पतसंस्था आदर्श जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी:** येथील कडेपठार ग्रामीण बिगर शेती सहकारी संस्थेच्या ७ शाखा असून संस्थेने ठेवींचा 100 कोटी रुपयांचा टप्पा पार केल्याबद्दल आणि पतसंस्थेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, कृषी क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन पुणे यांचे वतीने जिल्हास्तरीय स्वर्गीय आमदार शिवाजीराव भोसले आदर्श पतसंस्था पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या फेडरेशनचे उपाध्यक्ष विनायक तांबे, मानद सचिव शामराव हुलावळे, सचिव शहाजी रानवडे, संचालक रमेश भुजबळ, यज्ञेश्वर धारक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि पुरस्काराने कडेपठार पतसंस्थेचे चेअरमन माणिकराव झेंडे पाटील आणि उपाध्यक्ष रोहिदास कुदळे यांना गौरविण्यात आले. यावेळी कडेपठार पतसंस्थेचे संचालक संपत कोळेकर, आबुराव खैरे, मुख्य व्यवस्थापक अरविंद शेंडकर वसूली अधिकारी मोहन चिकणे, सासवड शाखेचे व्यवस्थापक शरद रणनवरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पीएमआरडीएच्या हद्दीत अग्निशमन केंद्रांना मंजूरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीएआरडीएच्या हद्दीत ८१४ गावांचा समावेश होतो. प्राधिकरणाच्या हद्दीत औद्योगिक कंपन्या अनेक आहेत. तसेच औद्योगिक वसाहतीही आहेत. याचसह मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. त्यामुळे अग्निशमन केंद्रांची आवश्यकता आहे. त्यामुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत अग्निशमन केंद्र उभारण्याची मागणी होत होती. अखेर प्राधिकरणाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दौंड, पुरंदर, मुळशी, शिरुर आणि खेड या या तालुक्यात प्रत्येकी एक तर, मावळमध्ये दोन आणि हवेली तालुक्यात तीन असे एकूण 10 अग्निशमन केंद्र मंजूर करण्यात आले आहे. जर एखादी दुर्घटना घडली तर पुणे , पिंपरी चिंचवड शहरातून अग्निशमन केंद्रांतून गाड्या बोलवाव्या लागतात. अंतर जास्त असल्याने या गाड्या पोहचण्यास उशीर लागतो. त्यामुळे प्राधिकरणाच्या हद्दीत अग्निशमन केंद्र स्थापन करण्याची मागणी होत होती. पीएमआरडीए हद्दीतील ३४ जागांवर या केंद्रांसाठी आरक्षण टाकण्यात आले.

# संत सोपानकाका सहकारी बँकेचा बँक्स असोसिएशनकडून गौरव

**सासवड :** सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात शून्य टक्के एनपीए ठेवल्याबद्दल पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनकडून संत सोपानकाका सहकारी बँक लि., सासवड या बँकेला शनिवारी ( दि २८ ) खासदार आणि सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



पुणे येथील विजय तेंडुलकर सभागृहात हा सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी सहकार आयुक्त दिपक तावरे, प्रशासकीय अधिकारी अनिल कवडे, सतिश मराठे, डॉ हेमा यादव, बाळासाहेब अनास्कर उपस्थित होते. संत सोपानकाका सहकारी बँकेचे अध्यक्ष रमणिकलाल कोठडिया, उपाध्यक्ष शिवाजी ढमढेरे, संचालिका व व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या राजवर्धिनी जगताप, संचालक धनंजय काकडे, राजेंद्र बडदे, अॅड युवराज वारघडे, मार्तंड भोंडे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप साबणे, मुख्य अधिकारी गणेश मोहोळ, विश्वजीत आनंदे आदी याप्रसंगी उपस्थित होते.

## संपूर्ण ग्रामीण भारतातील मजुरांसाठी एक क्रांतिकारी उपक्रम

# रोजगार अॅप : ग्रामीण मजुरांसाठी रोजगाराची नवी संधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कात्रज:** रोजगार अॅप हे ग्रामीण भागातील मजुरांसाठी एक अत्यावश्यक डिजिटल साधन ठरत आहे. नोकरी डॉट कॉम, मॉन्स्टर डॉट कॉम आणि फ्रेशर्स वर्ड यांसारख्या प्लॅटफॉर्मसारखेच, रोजगार अॅप ग्रामीण भागातील अशिक्षित वा कमी शिकलेल्या अकुशल मजुरांना रोजगार मिळवून देण्यासाठी तयार करण्यात आले आहे. ग्रामीण भागात शेती आणि शेतीपूरक व्यवसायांमध्ये मोठ्या प्रमाणात मजुरांची आवश्यकता असते.



मात्र, मजुरांना वेळेवर काम मिळणे किंवा शेतकऱ्यांना आवश्यक ते मजूर उपलब्ध होणे, हे आव्हान असते. या समस्येवर उपाय म्हणून रोजगार अॅप विकसित करण्यात आले आहे. हे अॅप शेतकरी, लघु उद्योग व्यावसायिक, आणि इतर कामाची गरज असणारे यांना सहजपणे स्थानिक मजुरांशी जोडते. या माध्यमातून शेतकरी केवळ आपल्या ओळखीच्या लोकांपुरते मर्यादित न राहता पंचक्रोशीतील कोणत्याही मजुरांशी संपर्क साधू शकतात. त्यामुळे शेतीकामे वेळेवर होण्यास मदत मिळते आणि मजुरांनाही रोजच्या रोज काम मिळते.

सध्या ग्रामीण भागातील अनेक व्यवसायांमध्ये अकुशल मजुरांची आवश्यकता आहे. बांधकाम, कारखाने, लघु उद्योग, आणि इतर व्यवसायांमध्ये रोजच्या रोज कामाची मागणी असते.रोजगार अॅप या सर्व कामांसाठी उपयुक्त आहे, ज्यामुळे मजुरांना विविध क्षेत्रांत रोजगार मिळवण्याची संधी मिळते. अॅपचा वापर सोपा करण्यासाठी आणि अधिक लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी, हे अॅप प्रादेशिक भाषेत उपलब्ध करून देण्यात आले आहे. ग्रामीण भागातील शिक्षण कमी असलेल्या लोकांना इंग्रजीतील अडचणी येतात, म्हणूनच मराठी आणि इतर प्रादेशिक भाषांमध्ये हे अॅप उपलब्ध आहे. यामुळे प्रत्येक व्यक्ती आपली माहिती नोंदवू शकतो आणि काम शोधू शकतो.

रोजगार अॅपचा वापर करण्यासाठी सर्वांनी प्ले स्टोअरवरून रोजगार अॅप डाउनलोड करून त्यावर नोंदणी करणे आवश्यक आहे. या डिजिटल प्रणालीचा वापर जितका जास्त केला जाईल, तितक्या जास्त प्रमाणात मजुरांना आणि शेतकऱ्यांना फायदा होईल.

या अॅपचा उद्देश केवळ मजुरांना रोजगार मिळवून देणे नसून, त्यांचा कष्टांचा योग्य मोबदला मिळवणे हाही आहे. "चीज कष्टाचे, दाम घामाचे" या म्हणीप्रमाणे रोजगार अॅप मजुरांना त्यांच्या मेहनतीचे योग्य मूल्य मिळवण्यासाठी एक प्रभावी साधन ठरत आहे.

योग्रामीण भागातील युवकांनी आपल्या समस्या ओळखून त्यावर प्रभावी उपाययोजना कशा करू शकतात. रोजगार अॅप हे केवळ एका भागापुरते मर्यादित नसून, संपूर्ण ग्रामीण भारतातील मजुरांसाठी एक क्रांतिकारी उपक्रम ठरू शकते. #रा

**ग्रामपंचायत सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे**
**खुली निविदा सुचना**

ग्रामपंचायत सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे येथील खालील कामांची मोहोरबंद निविदा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, म.जी.प्रा. व जि.प.पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून दोन लिफ़ाफ़ा पध्दतीने खालील कामांची मोहरबंद निविदा २ पाकिटे पध्दतीने मागविणेत येत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत कार्यालय सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे यांच्याकडुन दि.०१/१०/२०२४ ते दि. ०७/१०/२०२४ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सकाळी १०:०० ते सायं ०४:३० वाजेपर्यंत) देण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि.०१/१०/२०२४ ते दि. ०७/१०/२०२४. सायं ०४:०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय सुपे खुर्द, येथे स्विकारल्या जातील व ०८/१०/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | टेंडर फी.रू. | बयाणा रक्कम रूपये | कामाचा कालावधी |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १. | अंतर्गत रस्ते करणे | १ लाख ७५ हजार | १००/- | १ टक्का | - |
| २. | अंगणवाडी केंद्र इमारत दुसऱ्या मजल्यावर महिला अश्मिता बांधणे | ३ लाख | १००/- | १ टक्का | - |
| ३. | समाज मंदिर दुरुस्ती | १ लाख ३७ हजार | १००/- | १ टक्का | - |
| ४. | शाळा व अंगणवाडी शुद्ध पाणी पुरवठा, जुन्या योजनांची देखभाल करणे | १ लाख ३९ हजार | १००/- | १ टक्का | - |
| ५. | ग्रामपंचायत कार्यालय नुतनीकरण करणे. | २ लाख ३३ हजार | १००/- | १ टक्का | - |
| ६. | गटर दुरुस्ती व बांधकाम | १ लाख ९९ हजार | १००/- | १ टक्का | - |
| ७. | समाज मंदिर संरक्षण भिंत बांधणे | २ लाख ५० हजार | १००/- | १ टक्का | - |
| ८. | ग्रामपंचायत मोकळ्या जागेचे संरक्षण भिंत व गेट करणे | १ लाख ८८ हजार | १००/- | १ टक्का | - |
| ९. | जि.प.शाळा व अंगणवाडी इमारतीसाठी रेनवॉटर हार्वेस्टींग करणे | १ लाख ७९ लाख | १००/- | १ टक्का | - |
| १०. | अंगणवाडी सुशोभिकरण करणे | ७० हजार | १००/- | १ टक्का | - |
| ११. | अंगणवाडी शौचालय दुरुस्ती | १ लाख | १००/- | १ टक्का | - |
| १२. | अंतर्गत रस्ते करणे | २ लाख ५० हजार | १००/- | १ टक्का | - |

टिप:- १. कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखुन ठेवला आहे. २. सदर निविदा मोहोरबंद लिफ़ाफ़्यामध्ये स्विकारल्या जातील. सुट्टीच्या दिवशी निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. ३. सोबत पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:-१. नोंदणी प्रमाणपत्र २.GST रजिस्ट्रेशन ३. आयकर प्रत ४. पॅनकार्ड.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे

## सुमारे १०० जागांसाठी तब्बल १,६८८ इच्छुकांचे अर्ज

# काँग्रेसच्या उमेदवारांचे; गुडघ्याला बाशिंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत रेकॉर्डब्रेक कामगिरी केल्यानं राज्यात काँग्रेस पक्षाला अच्छे दिन आले आहेत. आता आगामी विधानसभा निवडणुकीची तारीख कधीही जाहीर होण्याची शक्यता आहे. यापार्श्वभूमीवर काँग्रेसनं इच्छुक उमेदवारांकडून तिकीटांसाठी अर्ज मागवले आहेत. विशेष म्हणजे महाविकास आघाडीत असल्यानं काँग्रेस साधारण १०० जागा लढवेल असं बोललं जात आहे. मात्र, तब्बल १,६८८ इच्छुक उमेदवारांनी यासाठी अर्ज केले आहेत..

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल महाविकास आघाडीची बैठक पार पडली. पाच तासापासून ही बैठक सुरू होती. या बैठीकाला काँग्रेस, शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते उपस्थित होते. यावेळी नवरात्रीच्या पहिल्या आठवड्यात जागावाटप जाहीर होईल, अशी चर्चा झाल्याचं कळतं आहे. तसंच आज यासंदर्भात मॅरेथॉन बैठक होणार आहे.

दरम्यान, मविआच्या या तयारीत काँग्रेसनं आघाडी घेतली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांचे अर्ज काग्रेसनं मागवले आहेत. तसंच या आर्जांवर कार्यवाही करण्यासाठी आणि इच्छुकांच्या मुलाखती घेण्याची तयारी देखील काँग्रेसनं पूर्ण केली आहे. यासंदर्भातील एक यादीच काँग्रेसकडून जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील पाचही रिजनमधील मुलाखती घेणाऱ्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांच्या नावांचा समावेश आहे.

त्यानुसार, उद्यापासून अर्थात १ ऑक्टोबर पासून काँग्रेसच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पार पडणार आहेत. उमेदवारांच्या मुलाखतीसाठी काँग्रेसनं नेत्यांवर जबाबदारी सोपवली आहे. १ ते ८ ऑक्टोबरपर्यंत नेते त्यांना ठरवून दिलेल्या जिल्ह्यात जाऊन मुलाखती घेणार आहेत. तसंच मुलाखती पार पडल्यानंतर हे नेते १० ऑक्टोबरपर्यंत आपला गुप्त अहवाल प्रदेश काँग्रेसकडं सुपूर्द करतील.

### १६८८ इच्छुकांनी मागितली उमेदवारी

- आगामी विधानसभा निवडणुकीसाठी १,६८८ इच्छुक उमेदवारांनी अर्ज केले आहेत. या इच्छुकांच्या मुलाखतींची जबाबदारी पृथ्वीराज चव्हाण, नसीम खान, चंद्रकांत हंडोरे, प्रणिती शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अमित देशमुख, नितीन राऊत, यशोमती ठाकूर, विश्वजीत कदम, वसंत पुरके, नाना गावंडे या नेत्यांवर सोपवण्यात आली आहे.




राष्ट्रसंचार पाऊस रा

## मराठवाड्यात पावसाने सरासरी ओलांडली

### शेतकऱ्यांना दिलासा

**संभाजीनगर :** दमदार पावसामुळे मराठवाड्याला दिलासा मिळाला असून वार्षिक सरासरीपेक्षा १२५ मि.मी. अधिक पाऊस झाला आहे. ६७९.५ मि. मी. वार्षिक सरासरी असताना या तुलनेत विभागात आजवर ८०४ मि. मी. पाऊस झाला आहे. विभागातील आठही जिल्ह्यांनी वार्षिक सरासरी ओलांडली आहे. मात्र, पुढील काळात आणखी पाऊस झाल्यास खरीप हंगामातील पिकांना याचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.



कोरडीठाक धरणेही तुडुंब झाली असून रब्बी हंगामाच्या तोंडावर शेतीसिंचनाला पाणी मिळणार असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. मागील वर्षी मराठवाड्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने खरीपातील पिकांचे नुकसान झाले होते. धरणेही तळाशी गेली होती, पिकांनी माना टाकल्या होत्या. पण यंदा ही सगळी झळ भरून निघाल्याचे चित्र मराठवाड्यात आहे.राज्यात परतीच्या पावसाला सुरुवात झाली असून ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पावसाचा जोर राहणार आहे. मराठवाड्यात काही भागात हलक्या ते मध्यम सरींची शक्यता आहे. ऑक्टोबरच्या सुरुवातीस पावसाला पोषक स्थिती आहे.

### जिल्हावार पावसाचे प्रमाण

- छत्रपती संभाजीनगर : १३१ %
- जालना : १३४ %
- बीड : १३६ %
- हिंगोली : ११२ %
- परभणी : १०८ %
- नांदेड : १०७ %
- लातूर : १११ %
- धाराशिव : १२० %

## फलटणचा उमेदवार अजितदादांकडून जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सातारा :** फलटण विधानसभा मतदार संघातील उमेदवार जाहीर करून राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी महायुतीमधील पक्षांत आघाडी घेतली आहे. पवार यांनी विद्यमान आमदार दीपक चव्हाण यांना पुन्हा एकदा उमेदवारी दिली.

फलटण मतदारसंघातील उत्तर कोरेगाव तालुक्यातील सोळशी ग्रामपंचायतीच्या उद्घाटन समारंभाप्रसंगी पवार उपस्थित राहणार होते. परंतु त्यांना या कार्यक्रमास उपस्थित राहता आले नाही. मात्र, त्यांनी सभेत फोनवरुन नागरिकांसोबत संवाद साधला. लोकसभा निवडणुकीत तुतारीला मदत करणारे विधान परिषदेचे माजी सभापती श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांचे भाषण सुरु असताना पवार यांनी फोनद्वारे चव्हाण यांची उमेदवार म्हणून घोषणा केली. चव्हाण यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर रामराजे नाईक निंबाळकर यांच्या चेहऱ्यावर हास्य आले. साताऱ्यात रामराजे नाईक निंबाळकर आणि रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्यातील राजकीय संघर्ष वाढलेला आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीचा उमेदवार असताना रामराजे नाईक निंबाळकर यांनी भाजपच्या उमेदवाराचा प्रचार केला नव्हता. निंबाळकर कुटुंबाने उघडपणे धैर्यशील मोहिते पाटील यांचा प्रचार केला होता.

## श्रीकांत शिंदे यांचे मेहुणे गुहागरमधून?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सिंधुदुर्ग :** भाजप खासदार नारायण राणे यांचे सुपुत्र निलेश राणे कुडाळ किंवा गुहागर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छूक असल्याची चर्चा आहे. गेल्या काही महिन्यात राणे यांचे गुहागरमधील दौरे वाढले असतानाच खासदार श्रीकांत शिंदे यांनी आपल्या मेहुण्याला रिंगणात उतरवण्याची तयारी सुरु केली आहे.

राणे यांची गुहागरमधील सभा गाजली होती. तेव्हापासूनच राणे गुहागर विधानसभा मतदारसंघातून लढण्यासाठी इच्छूक असल्याची चर्चा आहे. मात्र, गेल्या विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघात शिवसेनेच्या भास्कर जाधव यांचा विजय झाला असल्याने ही जागा शिंदे गटाच्या वाट्याला येण्याची शक्यता आहे. त्यामुळे श्रीकांत शिंदे यांचे मेहुणे विपुल कदम गुहागरमधून शिवसेनेचे उमेदवार असू शकतात. विपुल कदम खेडमधील तळेगावचे रहिवासी आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी गुहागरमधील शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत गुहागर विधानसभेसाठी विपुल कदम यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याचे समजते. तसे घडल्यास राणे कुटुंबीय आणि भाजपकडून कदम यांच्या उमेदवारीबाबत काय प्रतिक्रिया उमटणार, याची उत्सुकता आहे. विपुल कदम रिंगणात उतल्यास गुहागरमध्ये शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना रंगेल. ठाकरे गटाकडून विद्यमान आमदार भास्कर जाधव यांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता आहे. भाजपकडून माजी आमदार विनय नातू हेही निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. त्यामुळे या जागेवरुन भाजप आणि शिंदे गटात पेच निर्माण होऊ शकतो.

## महायुतीत ८० टक्के जागांवर मतैक्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच मुख्य लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जागावाटपासह विविध मुद्द्यांवरुन अंतर्गत संघर्ष पाहायला मिळत आहे. दुसरीकडे महायुतीतील जागावाटपाचा तिढा बहुतांश सुटल्याची माहिती समोर आली आहे. महायुतीतील पक्षांचे ८० टक्के जागांवर एकमत झाले आहे.



सर्वच पक्ष मैदानात पूर्ण तयारीनिशी उतरले आहेत. सर्वच पक्षांकडून मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. सध्या महाविकास आघाडीसह महायुतीत जागावाटप, मुख्यमंत्रिपद यावरुन चर्चा सुरु आहे. त्यात महायुतीने काहीशी आघाडी घेतल्याचे प्राथमिक चित्र आहे. त्यांचा जागावाटपाचा तिढा बऱ्याच अंशी सुटला आहे. त्यामुळे आता नवरात्रीच्या काळात भाजप सुमारे ५० उमेदवारांची नावे जाहीर करण्याची शक्यता आहे.

विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवरात्रीच्या काळात महायुतीच्या उमेदवारांची पहिली यादी येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

महायुतीच्या घटक पक्षांकडून ८० टक्के जागा वाटपावर एकमत दर्शविण्यात आहे. यानुसार भाजप १२५ ते १४० जागा लढवणार आहे. तर शिंदे गट ७० ते ७५ जागा लढवण्याच्या तयारीत आहे. कमी जागा लढवून त्यांच्यावरच लक्ष केंद्रित करायचे आणि स्ट्राईक रेट चांगला ठेवत सत्तेत प्रमुख पदावर दावा करायचा, अशी रणनीती शिवसेनेने आखली आहे

## 'अहिल्यानगर नको, अहमदनगर हवे'

# पवारांच्या सभेत मुस्लिम समाजाची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नगर :** नगरमध्ये मुस्लीम समुदायाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सभेत 'अहिल्यानगर नको, अहमदनगर हवे', अशी मागणी केली आहे.

अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करावे, अशी मागणी करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्ह्याचे नाव बदलून अहिल्यानगर झाल्याची घोषणा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमामध्ये केली होती. त्यामुळे जिल्ह्याच्या नामांतराचा मार्ग सुकर झाला होता.

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी चोंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या जयंती सोहळ्यात ही विनंती केली होती. याचवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नामांतराची घोषणा केली होती.






मुख्यमंत्री शिंदे यांनी घोषणा केल्यानंतर अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्याचा ठराव महापालिकेतही मांडण्यात आला. महापालिका सर्वसाधारण सभेने नामांतर प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. काही दिवसांपूर्वीच जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यास केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने हिरवा कंदिल दिला आहे.

शरद पवार अहमदनगर जिल्हा दौऱ्यावर असताना जामखेड येथील काही मुस्लीम बांधवांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी मुस्लीम बांधवांनी, 'आम्हाला अहिल्यानगर नको तर अहमदनगरच पाहिजे,' अशा घोषणाही दिल्या. त्यामुळे पुन्हा एकदा नगरच्या नामांतराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संपूर्ण नगर जिल्ह्यातील मुस्लीम समाजाने अहिल्यानगर नावाला विरोध केला आहे. सध्या हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून याची राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे.

नामांतराबाबत सर्व प्रक्रिया केंद्र सरकारच्या अखत्यारीत पूर्ण होत असल्याने प्रत्येक विभागाची ना हरकत आवश्यक असते. रेल्वे मंत्रालयाने नामांतरास हरकत नसल्याचे पत्र जारी केले आहे. या नावाचे दुसरे कोणतेही रेल्वेस्थानक देशात नसल्याचेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

## सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत राडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सिंधुदुर्ग :** जिल्हा परिषदेत ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी राडा घातल्याचा प्रकार घडला आहे. ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी यावेळी सुरक्षा रक्षकालादेखील मारहाण केली. सावंतवाडी पंचायत समिती इमारतीच्या कंत्राटावरुन हा वाद झाल्याची माहिती आहे. कंत्राटाची कागदपत्रे जमा करताना खासगी सुरक्षा रक्षक आणल्याने वाद झाला. यावेळी ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी सुरक्षा रक्षकाला मारहाण केली. कार्यकर्त्यांनी तीन खासगी सुरक्षा रक्षकांना अक्षरशः पळवून-पळवून मारहाण केल्याचे विडियोत स्पष्ट दिसत आहे. यावेळी ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक तिथे उपस्थित होते. नाईक म्हणाले की,

शिवसेनेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात भ्रष्टाचाराच्या विरोधात आंदोलन होते. यावेळी जिल्हा परिषदेत काही माणसं येऊन सरपंचांना, ठेकेदारांना, अधिकारी वर्गाची तपासणी करतात, अशी माहिती मिळाली. आम्ही सीईओंना तशी माहिती दिली. पण त्यांनी दुर्लक्ष केलं. ८-९ बाऊन्सर, २ राजकीय पदाधिकारी या सगळ्या लोकांची तपासणी करत होते. आम्ही त्यांना पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.



## तर सरकारच्या विरोधात भूमिका : जरांगे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अंतरवाली सराटी :** राज्य सरकारने नेमलेल्या निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या समितीचा अहवाल सकारात्मक नसला तर राज्य सरकारच्या विरोधात भूमिका मांडणार असल्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

तसेच समितीच्या अहवालात काय-काय असले पाहिजे? याबाबत मनोज जरांगे ते म्हणाले की, शिंदे समितीचा अहवाल सरकारने उघड केलेला नाही. त्यामुळे त्या अहवालामध्ये काय आहे हे आपण सांगू शकत नाही. शिंदे समिती नोंदी तपासण्यासाठी आहे. मराठा समाज कुणबी कसा आहे, मराठा कुणबी एकच आहे, हैदराबाद गॅझेटमध्ये राज्यातील मराठा समाजाबद्दलचे असणारे अनेक पुरावे आहेत, राज्यातील जनगणना १८८४ च्या अगोदरचे गॅझेट या सर्वच विषयांचा हा अहवाल असण्याची शक्यता आहे. ८३ व्या क्रमांकावर मराठा आणि कुणबी एकच आहे. यावर शिंदे समितीने काम केलेलं असेल तरच त्या समितीचा उपयोग आहे, असं मनोज जरांगे यांनी स्पष्ट केलं.



गॅझेटमध्ये असणाऱ्या नोंदी, नंतर सापडलेले आठ हजार पुरावे, संस्थानाकडे सापडलेले पुरावे, सग्या सोयऱ्याची अंमलबजावणी, रोटीबेटी व्यवहार हे सर्व सांगण्यासाठी शिंदे समिती गठीत करण्यात आली होती. मराठा आणि कुणबी एकच आहे आणि यासाठीच शिंदे समिती गठीत करण्यात आली होती. राज्यातील मराठा आणि कुणबी एकच आहे आणि तोच अहवाल राज्य सरकारने स्वीकारला आहे ही चांगली गोष्ट आहे. तीनही गॅझेट घेऊ म्हणाले आहेत, असं मत मनोज जरांगे यांनी मांडलं.

घराघरातील मराठ्यांना आरक्षण मिळाले पाहिजे. या सर्व गोष्टी अहवालात जायला पाहिजे. नाहीतर समितीने काय केले? फक्त भंपकपणा, दिखाऊपणा, समाजाला गरिबाला फसवण्याचे काम केले, मराठा मराठ्यामध्ये फूट पाडण्याचे काम सरकारने केले, असा त्याचा अर्थ होतो, असा आरोप जरांगे यांनी केला.

## ओबीसी आरक्षणात वाटा नको : आंबेडकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अमरावती :** मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांना कधीकाळी पाठिंबा देणारे वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी कोट्यातून मराठा समाजास आरक्षण देता कामा नये, ही भूमिका पुन्हा एकदा घेतली आहे.

पक्षाच्या वतीने ओबीसी संघटना एकत्र करण्यासाठी जिल्हा समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमार्फत उमेदवार निवडण्याची प्रक्रिया सुरू आहे. सरकारला मराठा समाजाला आरक्षण द्यायचं असेल तर त्यांनी वेगळ आरक्षण द्यावे, मात्र ओबीसीतून आरक्षण देऊ नये. ओबीसी संघटनांनी जी भूमिका घेतली आहे तिला आमचा पाठिंबा आहे. ओबीसींमधून मराठा समाजाला आरक्षण देऊ नये, असे आंबेडकर यांनी म्हटले. ओबीसीचे आरक्षण हे ओबीसीलाच राहिले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.



लोकसभेमध्ये आमच्या भूमिकेमुळे काँग्रेसला फायदा झाला. मग आम्ही काँग्रेसची बी टीम आहोत असं का म्हटलं जात नाही? परंतु आमच्या उभ्या राहण्यामुळे जेव्हा काँग्रेस-राष्ट्रवादीला नुकसान झाले तेव्हा भाजपची बी टीम असा आरोप केला जात होता. लोकसभा निवडणुकीत तीन ठिकाणी महाविकास आघाडी उमेदवारांना पाठिंबा दिला होता. बारामतीची जागा प्रतिष्ठेची असल्यामुळे सुप्रिया सुळे यांनी पाठिंबा मागितला होता. छत्रपती घराण्यातले पहिल्यांदाच उभे राहिले होते त्यामुळे त्यांचा पराभव होऊ नये म्हणून पाठिंबा दिला होता, असे आंबेडकर यांनी म्हटले.

## सर्व त्याच्या भरवशावर होत नाही : नितिन गडकरी

# सरकार सोबत जाल तर बुडाल


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**नागपूर :** सरकार विषकन्या आहे. ते ज्याच्या बरोबर जाईल त्याला बुडवते, असे मत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी व्यक्त केले आहे. ते विदर्भ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिलने आयोजित केलेल्या 'अमेझिंग विदर्भ, सेंट्रल इंडिया टुरिझम' या परिसंवादात बोलत होते. सर्व काही सरकारच्या भरवशावर होत नाही, त्यामुळे व्यावसायिकांनी गुंतवणूक प्रक्रियेतून सरकारला दूर ठेवले पाहिजे, असे स्पष्ट मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

विदर्भाची अनुकूल स्थिती सांगताना ते म्हणाले की, विदर्भाला नैसर्गिक एडवांटेज आहे. विदर्भात चांगले आणि मोठ्या प्रमाणात जंगल आहे. मात्र पर्यटन वाढीसाठी प्रमुख समस्या म्हणजे विदर्भातील गुंतवणूकदार आहेत. गुंतवणूक करण्यासाठी ते समोर येत नाहीत. तुम्ही ही सबसिडी घ्यायची आहे, ती घ्या, या सर्व लफड्यात पडू नका. ती केव्हा मिळेल याचा काही भरवसा नाही. आता तर लाडकी बहीण योजना सुरू झाली आहे. त्यामुळे सबसिडीचा निधी त्यांना तिकडेही लागेल, असेही गडकरी मिश्किलपणे म्हणाले.

### अनोखे ऑक्सिजन बर्ड पार्क

- उपराजधानी नागपुरात ऑक्सिजन बर्ड पार्कचे लोकार्पण झाले आहे. हे विशेष पार्क भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पुढाकारातून नागपूर - हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर साकारण्यात आले आहे. एकूण १४.३२ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प असून जवळपास २० एकरमध्ये साकारण्यात आला आहे. या ठिकाणी केवळ पक्ष्यांसाठी विशिष्ट आणि पक्ष्यांच्या आवडीच्या फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. पक्ष्यांच्या विविध प्रजातींसाठी हा परिसर आश्रयस्थान म्हणून उपयुक्त ठरणार आहे. विशेष म्हणजे, ८ हजार १०४ प्रकारच्या वनस्पतींसह ऑक्सिजन पार्क विकसित करण्यात आला आहे. या प्रकल्पात त्या भागातील नैसर्गिक तळ्यांनाही त्याच स्वरूपात समाविष्ट करून घेण्यात आले आहे.





#रा

### अजित डोवाल फ्रान्स दौऱ्यावर

# राफेल विमानांवर चर्चा?

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल सोमवारपासून दोन दिवसांच्या फ्रान्स दौऱ्यावर जात आहेत. फ्रान्समध्ये ते वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत. प्रामुख्याने राफेल करारावर चर्चा करण्यासाठी ते फ्रान्समध्ये पोहोचत असल्याचे सांगण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी राफेल करारासंदर्भात फ्रान्सच्या वतीने भारताला प्रस्ताव देण्यात आला होता. या वर्षाच्या अखेरीस या वाटाघाटी निष्कर्षापर्यंत पोहोचवून कराराला अंतिम स्वरूप देण्याच्या मनस्थितीत भारत आहे. तर, डोवाल यांच्या दौऱ्यापूर्वी फ्रान्सच्या कंपनीने किंमत कमी करून अंतिम प्रस्ताव दिला आहे.

हा करार भारतीय नौदलासाठी खूप किफायतशीर ठरू शकतो. रशियात तयार झालेल्या मिग-२९ विमानांसह नौदलाच्या ताफ्यात नव्या राफेल विमानांचा समावेश करण्याची योजना आहे. माध्यमातील वृत्तानुसार, फ्रान्ससोबत राफेल करार अंतिम झाल्यास नौदलाच्या मिग २९ के विमानांची जागा डसॉल्ट कंपनीची राफेल विमाने घेतील.

या करारामध्ये २२ सिंगल सीट राफेल मरीन विमाने आणि चार टू सीटर ट्रेनर व्हर्जन विमानांचा समावेश असण्याची शक्यता आहे. भारतीय नौदलाला आधुनिक विमाने आणि पाणबुड्यांची गरज आहे. नौदलाला अधिक शक्तिशाली बनवण्यासाठी हा करार महत्त्वाचा मानला जात आहे. या कराराला संरक्षण खरेदी परिषदेने यापूर्वीच मंजुरी दिली आहे. फ्रान्सच्या मदतीने भारत विमान उद्योगही मजबूत करत आहे.

विमानाची किंमत या कराराच्या आड येत असल्याचे सांगण्यात येत होते. मात्र, डोवाल यांच्या दौऱ्यापूर्वी फ्रान्सने त्याची किंमत कमी करून अंतिम किंमतीचा प्रस्ताव दिला आहे. भारताला या कराराची आधारभूत किंमत २०१६ ठेवायची असून, भारताने यापूर्वी ३६ राफेल विमाने खरेदी केली होती. हा सौदा ५० हजार कोटी रुपयांहून अधिक असू शकतो, असे सांगण्यात येत आहे. फ्रान्स विमानासोबत शस्त्रास्त्रे, सिम्युलेटर, क्रूसाठी प्रशिक्षण आणि लॉजिस्टिक सपोर्टदेखील देणार आहे. याशिवाय फ्रान्स भारतीय शस्त्रास्त्रे गोळा करण्यातही मदत करेल. ही विमाने आयएनएस विक्रांतवर तैनात केली जाऊ शकतात.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स

## सोनापूर बुलडोझर कारवाईला स्थगिती

कायदा-सुव्यवस्था



**आसाममधील सोनापूर** येथील बेकायदा बांधकामांवरील बुलडोझर कारवाईला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. याशिवाय तेथे स्थायिक झालेल्या लोकांना बाहेर काढण्यावरही सध्या बंदी घालण्यात आली आहे. न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने सोमवारी आसाम सरकारला नोटीस बजावली आणि तीन आठवड्यांत उत्तर मागितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच बुलडोझर कारवाईला १ ऑक्टोबरपर्यंत बंदी घातली होती. दरम्यान, आसाम सरकार सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करत असल्याचा आरोप करत आसाममध्ये कारवाई करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने हिमंत बिस्वा सरमा यांना नोटीस बजावली आहे. आसाम सरकारने बुलडोझरची कारवाई सुरू केलेल्या ४८ जणांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या लोकांवर बेकायदा बांधकामे केल्याचा आरोप आहे. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑक्टोबरपर्यंत एखाद्याच्या घरावर बुलडोझर कारवाईवर बंदी घातली असताना, ही कारवाई का करण्यात आली, असा सवाल करण्यात आला होता. हादेखील न्यायालयाचा एक प्रकारचा अवमानच आहे. यावर सर्वोच्च न्यायालयाने आता आसाम सरकारकडून तीन आठवड्यांत उत्तर मागवले असून, तोपर्यंत कारवाईला स्थगिती दिली आहे.

» Selected

## शेअर बाजारात हाहाकार



**मुंबई :** आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजारात हाहाकार माजला आहे. निर्देशांक दुपारपर्यंत १००० अंकांनी घसरला, तर निफ्टी २५,९०० च्या खाली व्यवहार करत आहे. निर्देशांक आणि निफ्टीमध्ये एक टक्क्यांहून अधिक घसरण पाहायला मिळाली. निफ्टी बँकेतही एक टक्का घसरण झाली. बीएसईमधील २७९ कंपन्यांच्या समभागांमध्ये लोअर सर्किट पहायला मिळाले. प्रचंड घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे २.७३ लाख रुपयांहून अधिक नुकसान झाले. बीएसईमध्ये सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल घटून ४७५.२ लाख कोटी रुपयांवर आले. निर्देशांकाचा दिवसभरातील नीचांकी स्तर ८४,५३०.३२ आणि निफ्टीचा इंट्रा-डे नीचांकी स्तर २५,८८२.३० अंकांवर पहाला मिळाला. सोमवारी, निफ्टी २५,८५० च्या खाली आल्याने भारतीय शेअर निर्देशांक घसरणीसह बंद झाला. निर्देशांक १,२७२.०७ अंकांनी घसरून ८४,२९९.७८ वर, तर निफ्टी ३६८.२० अंकांनी घसरून २५,२१०.८० वर बंद झाला. सुमारे १,७५७ समभाग वधारले, २,१०७ घसरले आणि १४८ स्थिर राहिले. मेटल आणि मीडिया (प्रत्येकी एक टक्का वाढीसह) वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक घसरणीसह बंद झाले आणि ऑटो, बँक, आयटी, टेलिकॉम, फार्मा, रियल्टी १-२ टक्क्यांनी घसरले. बीएसईमिडकॅप निर्देशांक किरकोळ घसरणीसह बंद झाला, तर स्मॉलकॅप निर्देशांक सपाट बंद झाला. निफ्टीवर हिरो मोटोकॉर्प, ट्रेंट, ॲक्सिस बँक, रिलायन्स इंडस्ट्रीज, भारत इलेक्ट्रॉनिक्स यांचे समभाग सर्वाधिक घसरले, तर जेएसडब्ल्यू स्टील, हिंडाल्को इंडस्ट्रीज, एनटीपीसी, टाटा स्टील, ब्रिटानिया इंडस्ट्रीज यांचे समभाग वधारले.

### आमदार यतनाळ यांचा खळबळजनक आरोप

# सरकार पाडण्याचे षड्‌यंत्र

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**दावणगेरे :** मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकार पाडण्याचे षड्यंत्र रचले जात असल्याचा आरोप भाजपचे आमदार बसनगौडा पाटील यतनाळ यांनी केला आहे. भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांचे नेते या संयुक्त कटाचा भाग आहेत, असे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. याची माहिती माझ्याकडे आहे, असा दावा यतनाल यांनी केला असून, भाजपमधील काही नेते ऑपरेशन लोटसचा विचार करत आहेत. मात्र, भाजप हायकमांडला त्यात रस नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

यतनाळ म्हणाले की, काही नेत्यांनी या ऑपरेशनसाठी निधीही बाजूला ठेवला असून, मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर त्यांची नजर आहे. राज्य सरकार भ्रष्टाचारात अडकले असून, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना या प्रकरणी अटक होऊ शकते. सिद्धरामय्या यांनी आपली प्रतिमा गमावली आहे, असा दावाही त्यांनी केला.

ते म्हणाले की, राज्य सरकार दिवाळखोर झाले असून पगार देण्यासाठीही कर्नाटक सरकारकडे निधी नाही. वित्तीय संकट तीव्र झाल्यामुळेच. सिद्धरामय्या सरकार पाडण्याकडे काँग्रेसच्या आमदारांचा कल अधिक आहे. हे कोणीही उघडपणे सांगत नाही. त्यांच्या भ्रष्टाचाराची कागदपत्रे काँग्रेस नेत्यांनीच आम्हाला दिली, असा खळबळजनक दावाही त्यांनी केला.

राज्यपालांनी त्यांच्यावर खटला चालवण्यास मंजुरी दिल्यानंतर, सिद्धरामय्या राजीनामा देतील आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे मुख्यमंत्री होतील, असे मानले जात होते. खर्गे यांना मुख्यमंत्री बनवण्याच्या कटामागे जे लोक सरकार अस्थिर करण्याचा कट रचत आहेत, तेच लोक आहेत, असेही ते म्हणाले.


## तर आयुष्मानच्या रकमेत वाढ ...

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपने आणखी एक मोठे आश्वासन दिले आहे. निवडून आल्यास आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या रकमेत वाढ करण्याची घोषणा पक्षाने केली आहे. केंद्र सरकारने ७० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या वृद्धांसाठी ५ लाख रुपयांपर्यंतमोफत उपचार ांची घोषणा केली आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांनी आश्वासन दिले की, भाजप पुन्हा सत्तेवर आल्यास ही रक्कम पाच लाखांवरून दहा लाख रुपये करण्यात येईल. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना आयुष्मान भारतचा लाभ घेण्यासाठी ७० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या सर्व पात्र ज्येष्ठ नागरिकांची नोंदणी सुलभ करण्यास सांगितले आहे.

# हरियाणा काँग्रेसची मोठी कारवाई

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हरियाणा काँग्रेसने पक्षातर्गत मोठी कारवाई केली आहे. हरियाणा काँग्रेसने पक्षविरोधी काम केल्याचा ठपका ठेवत १० नेत्यांची पक्षातून ६ वर्षांसाठी हकालपट्टी केली आहे. याबाबतची माहिती अखिल भारतीय काँग्रेस समितीने दिली आहे.

अंबाला कॅन्टोन्मेंट येथून अपक्ष म्हणून निवडणूक लढवणाऱ्या चित्रा सरवरा यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. चित्रा सरवरा ह्या माजी मुख्यमंत्री भूपिंदर सिंह हुडा यांचे विश्वासू निर्मल सिंह यांची कन्या आहेत. त्यांना काँग्रेसने तिकीट नाकारले आहे. यामुळे त्या अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत.

सरवरा यांची लढत भाजपचे दिग्गज नेते, सहा वेळा आमदार आणि माजी गृहमंत्री अनिल विज तसेच काँग्रेसचे परविंदर सिंह परी यांच्याशी होत आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसने त्यांना तिकीट नाकारले होते. त्यावेळीही सरवरा अपक्ष म्हणून लढल्या होत्या. पण विज यांच्या विरोधात त्यांचा पराभव झाला होता. सरवरा ४४,४०० मतांसह दुसऱ्या स्थानी तर काँग्रेसचे वेणू सिंह यांना तिसऱ्या क्रमांकावर राहिले होते. सरवरा यांचे वडील अंबाला शहर मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार आहेत.

चित्रा सरवरा यांच्यासह सतविंदर राणा, कपूर सिंह नरवाल, वीरेंद्र घोघरियन, सोमवीर घसोला, मनोज कोसलिया, अजित गुलिया, शारदा राठोड, ललित नागर आणि सतवीर भाना या नेत्यांचीही काँग्रेसने पक्षातून हकालपट्टी केली आहे. याबाबतची कारवाई काँग्रेसच्या शिस्तपालन समितीने केली आहे.

### अमित शाह यांचा आरोप

# खर्गेंचे व्यक्तव्य चुकीचे

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केलेल्या वक्तव्यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी टीका केली आहे. खर्गे एका प्रचार सभेत भाषण करताना बेशुद्ध झाले. मात्र, काही काळानंतर प्रकृतीत सुधारणा होताच पंतप्रधान मोदींना सत्तेतून बाहेर पडताना पडल्याशिवाय आपण मरणार नाही, असे त्यांनी म्हटले होते. अमित शहा यांनी त्यांचे हे वक्तव्य आक्षेपार्ह आणि अपमानास्पद असल्याचे म्हटले आहे.

अमित शाह यांनी सोमवारी सोशल मीडिया एक्सवर लिहिले की, काल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आक्षेपार्ह आणि अपमानजनक भाषणे करण्यात आपल्या नेत्यांना आणि त्यांच्या पक्षालाही मागे टाकले. आपली कटुता दाखवत त्यांनी विनाकारण पंतप्रधान मोदींना आपल्या वैयक्तिक आरोग्याच्या प्रकरणात ओढले पंतप्रधान मोदींबद्दल काँग्रेसजनांच्या मनात किती द्वेष आणि भीती आहे, हेच या वक्तव्यावरून दिसून येते, असेही शहा म्हणाले. ते म्हणाले की, काँग्रेस नेते सतत पंतप्रधान मोदींचाच विचार करतात. हे दिसून येते.

अमित शाह म्हणाले की, खर्गे यांच्या आरोग्यासाठी प्रार्थना करा. मी प्रार्थना करतो की ते दीर्घकाळ निरोगी राहावेत. ते अनेक वर्षे जगतील आणि २०४७ पर्यंत विकसित भारताची निर्मिती पाहतील, असेही ते म्हणाले.

## पोप यांचा संवाद

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**लक्समबर्ग :** एक दिवसीय प्रवासादरम्यान पोप फ्रान्सिस यांनी लक्झेंबर्ग विमानतळावर तरुणांशी संवाद साधला.

## रोजगाराचा दावा म्हणजे अर्धसत्य

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** २०२१ ते २०२४ या कालावधीत आठ कोटी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचा आणि ६.२ कोटी निव्वळ ग्राहक ईपीएफओच्या डेटाबेसमध्ये सामील होण्याचा केंद्र सरकारचा दावा अर्धसत्य असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

काँग्रेसचे प्रभारी सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, पंतप्रधान आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २०२१ ते २०२४ या कालावधीत रोजगाराच्या आठ कोटी संधी निर्माण केल्याचा दावा केला आहे. तथापि, तो खोटा असल्याचे रमेश यांनी म्हटले आहे.

# नसरल्लाह प्रकरणी उत्तर प्रदेशातही काळे झेंडे

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ :** लेबनॉनमध्ये हिजबुल्लाह संघटनेचा म्होरक्या सय्यद हसन नसरल्लाह याच्या हत्येच्या निषेधार्थ हुसैनाबाद फूड स्ट्रीट रविवारी बंद ठेवण्यात आली. दुकाने आणि घरांवर काळे झेंडे फडकवण्यात आले. छोट्या इमामबाड्यापासून ते मोठ्या इमामबाड्यापर्यंत लोकांनी इस्रायल विरोधी आणि अमेरिकाविरोधी घोषणा दिल्या.

मेणबत्त्या आणि मोबाईल टॉर्चच्या प्रकाशात हजारो पुरुष, महिला आणि मुलांनी मिरवणूक काढली. सायंकाळी उशीरा छोट्या इमामबाड्यापासून निघालेली मिरवणूक काही अंतर पुढे जाताच



पोलिसांनी सातखंडाजवळ थांबवली. शिया धर्मगुरू मौलाना कल्बे जवाद यांनी हसन नसरल्लाह यांच्या निधनावर तीन दिवसांचा शोक जाहीर केला आहे. ते म्हणाले की, एक नसरल्लाह शहीद झाला असून, अनेक नसरल्लाह जन्माला येतील. सायंकाळी सहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत आझादारी रोडवरील वाहतूक पूर्णपणे बंद होती. रस्त्यावर फक्त आंदोलकच उपस्थित होते. शिया धर्मगुरूंनी सय्यद हसन नसरल्लाह यांच्या हौतात्म्यावर शोक व्यक्त करत इस्रायल आणि अमेरिकेच्या विरोधात घोषणाबाजी केली.

इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष नेतन्याहू यांचे छायाचित्र आणि इस्रायलच्या राष्ट्रध्वजाचा यावेळी अवमान करण्यात आला.

# म्हैसूरमध्ये रेव्ह पार्टीवर छापा

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**म्हैसूर :** भव्य म्हैसूर दसरा उत्सवाच्या काही दिवस आधी मीनाक्षीपुरा येथील केआरएस धरणाच्या बॅकवॉटरजवळील एका खासगी मालमत्तेत झालेल्या रेव्ह पार्टीवर येलवाल पोलिसांनी छापा टाकून महिलांसह एकूण ६० जणांना ताब्यात घेतले.

सोशल मीडिया, विशेषत: इन्स्टाग्रामच्या माध्यमातून 'हार्मोनी ऑफ कॉसमॉस २.०' नावाने या पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक आणि परदेशी कलाकारांना आकर्षित करण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ हून अधिक जोडप्यांनी इन्स्टाग्रामच्या माध्यमातून या कार्यक्रमासाठी नोंदणी केली होती. एसपी विष्णूवर्धन, डीएसपी करीम आणि एएसपी नागेश यांच्या नेतृत्वात पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अधिकाऱ्यांनी म्युझिक इक्विपमेंट्स आणि १८ लक्झरी कार जप्त केल्या.

### जम्मू-काश्मिरमधील चकमकींनंतर

# दहशतवाद्यांचा शोध सुरू

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमधील कठुआ आणि राजौरी जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या चकमकींनंतर दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलांनी सुरू असलेल्या शोधमोहिमेची व्याप्ती सोमवारी नव्या भागात वाढवली.

कठुआ जिल्ह्यातील कोग-मंडली जंगलात झालेल्या चकमकीत एक पोलिस शहीद झाला, तर एका दहशतवाद्याचा खात्मा करण्यात आला. अन्य दोन पोलिस अधिकारी या चकमकीत जखमी झाले. रविवारी सायंकाळी राजौरी जिल्ह्यातील थानामंडी भागातही चकमक उडाली होती. पाक पुरस्कृत जैश-ए-मोहम्मदचे आणखी तीन दहशतवादी जंगलात लपून बसल्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

राजौरीतील अधिकाऱ्यांनी सांगितले की, रविवारी संध्याकाळी थानामंडी भागातील मनियाल गल्ली येथे सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीनंतर दहशतवादी पळून गेले.

रविवारी रात्री उशिरा शोधमोहीम थांबवण्यात आली आणि सोमवारी पहाटे पुन्हा सुरू करण्यात आली आणि नवीन भागात वाढविण्यात आली. दहशतवाद्यांशी अद्याप कोणताही संपर्क झालेला नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. जम्मू-काश्मिरमधील कठुआ जिल्ह्यातील दुर्गम गावात दहशतवादविरोधी शोध मोहीम तिसऱ्या दिवशीही सुरू आहे. दरम्यान, चकमकीत शहीद झालेले हेड कॉन्स्टेबल बशीर अहमद यांच्यावर रविवारी सायंकाळी त्यांच्या जम्मूतील निवासस्थानाजवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. जम्मू-काश्मिरचे पोलिस महासंचालक, जम्मू झोनचे अतिरिक्त पोलिस महासंचालक नलिन प्रभात आणि सर्व कर्मचाऱ्यांनी शहीद पोलिसांना श्रद्धांजली वाहिली.

### इस्रायलचे जोरदार प्रत्युत्तर, लेबनॉनसह येमेनवरही हल्ला

# हमासबरोबरच हिजबुल्लाह, हुथींना दणका

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेरुत :** हमासने सोमवारी लेबनॉनमध्ये इस्रायलने केलेल्या हल्ल्यात आपला म्होरक्या ठार झाल्याची माहिती दिली, तर आणखी एका पॅलेस्टिनी दहशतवादी गटाने सांगितले की, बेरूतवर झालेल्या हल्ल्यात त्यांचे तीन नेते ठार झाले आहेत. हमासने म्हटले आहे की, लेबनॉनमधील हमासचा नेता फतेह शेरिफ अबू अल-अमीन याला त्याची पत्नी, मुलगा आणि मुलीसह सोमवारी पहाटे लक्ष्य करण्यात आले.

इस्रायलने इराणच्या मित्रराष्ट्रांविरोधात शत्रुत्व वाढवले असतानाच, पॉप्युलर फ्रंट फॉर द लिबरेशन ऑफ पॅलेस्टाईनने म्हटले आहे की, बेरूतच्या कोला येथे झालेल्या हल्ल्यात त्यांचे तीन नेते ठार झाले. इस्रायलच्या लष्कराकडून याबाबत कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

इस्रायलने लेबनॉनमधील हिजबुल्लाह तसेच येमेनमधील हुथी दहशतवाद्यांवर केलेल्या हल्ल्यांमुळे मध्यपूर्वेतील लढाई नियंत्रणाबाहेर जाईल आणि इराण यात ओढला जाईल, अशी भीती व्यक्त होत आहे. हिजबुल्लाहच्या म्होरक्याला ठार केल्यानंतर इस्रायलने रविवारी येमेनमधील हुथी तसेच लेबनॉनमधील हिजबुल्लाहच्या डझनभर तळांवर हवाई हल्ले केले.

येमेनच्या होदेदा बंदरावर झालेल्या हवाई हल्ल्यात ४ जण ठार तर २९ जण जखमी झाल्याची माहिती आहे. लेबनॉनमध्ये रविवारी इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात १०५ जण ठार झाले.

लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, गेल्या दोन आठवड्यांत लेबनॉनचे एक हजारांहून अधिक नागरिक मारले गेले असून, सहा हजार जखमी झाले आहेत. तसेच दहा लाख लोकांनी आपली घरे सोडली आहेत. त्याचवेळी नसरल्लाह याच्यासह हिजबुल्लाहचे अनेक दहशतवादी ठार झाले आहेत.

इस्रायलने हा हल्ला सुरूच ठेवण्याचा निर्धार केला आहे. इस्रायलचे ड्रोन रविवारी बेरूतमध्ये फिरत होते आणि लेबनॉनच्या राजधानीभोवती नवीन हवाई हल्ल्यांचे जोरदार स्फोट होताना दिसले. इस्रायलचे बहुतांश हल्ले लेबनॉनच्या दक्षिणेला झाले आहेत, जिथे इराणसमर्थित हिजबुल्लाहचे दहशतवादी वास्तव्यास आहेत.

दरम्यान, इस्रायलच्या संरक्षण दलाने हिजबुल्लाहनंतर आता येमेनवर हल्ला केला आहे. लष्करी संचालकांच्या सुचनेनुसार, हवाई दलाने रविवारी कारवाई केली. तसेच येमेनमधील रास इस्सार आणि होडेदाह येथे असलेल्या हुथी बंडखोरांवर विमानांद्वारे हल्ला केला.

#रा

# SPORTS



## विराट कोहली २७०००

**टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने बांगलादेश विरुद्धच्या कानपूर कसोटी सामन्यात मोठी कामगिरी केली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीत २७,००० धावा पूर्ण केल्या. भारताचा दुसरा आणि जगातील चौथा फलंदाज ठरला आहे.**

### भारत विरुद्ध बांग्लादेश दुसरी कसोटी : एकाच दिवशी १९ विकेट्स, ट्वेंटी-२० स्टाईल बॅटिंग

# अनिर्णित होणारी कसोटी विजयाकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कानपुर :** बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत भारताने आपला पहिला डाव ९ बाद २८५ धावांवर घोषित केला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांगलादेशचा पहिला डाव भारताने २३३ धावांत गुंडाळला होता. भारताला पहिल्या डावात ५२ धावांची आघाडी मिळाली. भारताने कानपूर कसोटी अनिर्णित राहण्याची चिन्हे असताना विजयाकडे वळवली आहे.

दरम्यान, भारताने आज बांगलादेशचा डाव गुंडाळल्यानंतर आक्रमक फलंदाजी केली. रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वालने पहिल्या ३ षटकातच ५१ धावा केल्या. रोहित आणि यशस्वीने चौकार षटकारांचा पाऊस पाडला. विशेष म्हणजे केवळ १२ षटकांत भारतीय संघाने १ बाद १२१ धावा केल्या. यशस्वी जैस्वालने ५१ चेंडूत धडाकेबाज ७२ धावा ठोकल्या. तर कर्णधार रोहित शर्मा ११ चेंडूत २३ धावा करुन माघारी परतला.

भारताने कानपूर कसोटी अनिर्णित राहून विजयाकडे वळवली आहे. दुसऱ्या कसोटीत सोमवारी चौथ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत बांगलादेशने दुसऱ्या डावात २ गडी गमावून २६ धावा केल्या होत्या. बांगलादेश भारतापेक्षा २६ धावांनी मागे आहे. शादमान इस्लाम आणि मोमिनुल हक नाबाद आहेत.

भारताकडून रविचंद्रन अश्विनने दोन्ही विकेट घेतल्या.

झाकीर हसननंतर हसन महमूदला त्याने बाद केले. बांगलादेश पहिल्या डावात २३३ धावा करून सर्वबाद झाला होता. ग्रीन पार्क स्टेडियमवर पावसामुळे दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवसाचा खेळ होऊ शकला नाही. चौथ्या दिवशी टीम इंडियाच्या धुरंदरांनी धमाकेदार खेळ केला.

तत्पूर्वी भारताच्या पहिल्या डावात रोहित शर्मा माघारी परतल्यानंतर यशस्वीच्या साथीला शुभमन गिल आला. गिलनेही ३६ चेंडूत ३९ धावांची खेळी केली. रिषभ पंत ९ धावा करुन माघारी परतला. यानंतर विराट कोहली आणि के एल राहुलने मोर्चा सांभाळला. या दोघांनीही आक्रमक खेळी केली. विराटने ३५ चेंडूत ४७ धावा तर के एल राहुलने ४३ चेंडूत ६८ धावा ठोकल्या.

भारताकडून यशस्वी जैस्वाल (७२) आणि केएल राहुल (६८) यांनी अर्धशतके झळकावली. विराट कोहली ४७ धावा करून शकीब अल हसनच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्याने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत २७ हजार धावाही पूर्ण केल्या. बांगलादेशकडून शाकिब अल हसनने ४ आणि मेहदी हसन मिराजने ३ विकेट घेतल्या.

हसन महमूदला १ बळी मिळाला. भारताकडून तीन अर्धशतकांच्या भागीदारी झाल्या. रोहित आणि यशस्वी यांनी पहिल्या विकेटसाठी ५५ धावांची भागीदारी केली. यशस्वी आणि शुभमन यांच्यात दुसऱ्या विकेटसाठी ७२ धावांची भागीदारी झाली. कोहली आणि राहुल यांनी पाचव्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी केली.



## कोहलीने मोडला सचिन तेंडुलकरचा 'महाविक्रम'!

कोहलीने ५३५ सामन्यांच्या ५९४ डावांमध्ये २७ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. त्याने सर्वात कमी डावात हा आकडा गाठला आहे. कोहली आता सचिन तेंडुलकर, कुमार संगकारा आणि रिकी पाँटिंग यांच्या यादीत सामील झाला आहे. तेंडुलकरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक ३४,३५७ धावा केल्या आहेत. त्याच्यापाठोपाठ संगकारा (२८,०१६) आणि पाँटिंग (२७,४८३) यांचा क्रमांक लागतो. सचिन आणि कोहली व्यतिरिक्त इतर कोणत्याही भारतीय फलंदाजाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २५,००० धावाही पूर्ण केल्या नाहीत. कोहलीची कसोटी कारकीर्द कोहलीने त्याच्या कसोटी कारकिर्दीत ११५ सामन्यांच्या १९४ डावांमध्ये सुमारे ५० च्या उत्कृष्ट सरासरीने ८,९०० हून अधिक धावा केल्या आहेत. या दरम्यान, त्याने २९ शतके झळकावली आहेत. त्याने धावांच्या बाबतीत इंग्लंडच्या ग्रॅहम गूचला (८,९००) मागे टाकले आहे. कोहली सध्या कसोटी फॉर्मेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा जगातील १८ वा फलंदाज आहे. भारतात त्याच्यापेक्षा जास्त कसोटी धावा सचिन तेंडुलकर (१५,९२१), राहुल द्रविड (१३,२६५) आणि सुनील गावस्कर (१०,१२२) यांनी केल्या आहेत.

# ऑस्ट्रेलियाने मालिका जिंकली




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाने स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखालील पाचवा वन डे सामना जिंकला आणि इंग्लंडविरुद्धची मालिका ३-२ ने जिंकली. ऑस्ट्रेलियाने सुरूवातीच्या दोन सामन्यांमध्ये इंग्लंडवर दणदणीत विजय मिळवला. पण, यजमानांनी पुढील दोन सामने जिंकून मालिका २-२ अशी बरोबरीत आणली. पाचव्या वन डे सामन्यात ऑसींचे नेतृत्व स्टीव्ह स्मिथने केले.

अंतिम सामन्यासाठी मिचेल मार्श तंदुरूस्त नसल्यामुळे कर्णधारपद अनुभवी स्टीव्ह स्मिथकडे दिले गेले. स्मिथने नाणेकेक जिंकत प्रथम गोलंदाजी स्वीकारली. इंग्लंडकडून सलामीवीर फिल सॉल्ट आणि बेन डकेटने स्पोटक फलंदाजीने सामन्याला सुरूवात केली. परंतु ७व्या षटकात ऑस्ट्रेलियन गोलंदाज ऍरॉन हार्डीने सॉल्टला ४५ धावांवर माघारी पाठवले. त्यानंतर फलंदाजीसीठी आलेल्या विल जॅक्सला देखील हार्डीने शून्यावर बाद केले. परंतु त्यानंतर कर्णधार हॅरी ब्रूकने डकेटला साथ देत चांगली फलंदाजी केली. या दोघांच्या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ७२ धावांची भागीदारी केली.

२५व्या षटकात अॅडम झॅम्पाच्या गोलंदाजीवर ब्रूकला ७२ धावांची अर्धशतकी खेळी करत परतावे लागले. त्यानंतर इंग्लंड संघाचा डाव गडगडायला सुरूवात झाली. परंतु, डकेटने एका बाजूने खेळ लावून धरत शतक पूर्ण केले. डकेटने या खेळीमध्ये १३ चौकार व २ षटकारांसह १०७ धावा केल्या. इंग्लंडने सर्व विकेट्स गमावत ऑस्ट्रेलियाला ३१० धावांचे आव्हान दिले.

### स्पार्टन मान्सुन लीग' क्रिकेट स्पर्धा

# कल्याण क्लबला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** स्पार्टन क्रिकेट क्लब तर्फे आयोजित चौथ्या 'स्पार्टन मान्सुन लीग' अजिंक्यपद टी-२० क्रिकेट स्पर्धेत कर्णधार केतन पासलकर याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर कल्याण क्लबने पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबचा १६३ धावांनी सहज पराभव करून स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले.

सिंहगड रोडवरील कोद्रे फार्मस् क्रिकेट मैदानावर झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यामध्ये कल्याण क्लबने पहिल्यांदा फलंदाजी करताना २५२ धावांचे आव्हान उभे केले. यामध्ये सलामीवीर रोहीत गुगळे याने ४७ चेंडूत ७ चौकार आणि ८ षटकारांसह ९८ धावा चोपल्या. कर्णधार केतन पासलकर याने ४० चेंडूत ५ चौकार आणि ८ षटकारांसह ८२ धावांची खेळी केली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी ६० चेंडूत ११९ धावांची भागिदारी रचली आणि संघाला मोठी धावसंख्या उभी करण्यासाठी मदत केली. या दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबचा डाव ८९ धावांवर गडगडला आणि कल्याण संघाने विजेतेपद मिळवले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण सीएनए अॅकॅडमीचे मुख्य विक्रम देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे संचालक अमित देशपांडे, विवेक कुबेर, रिशीकेश पुजारी उपस्थित होते. विजेत्या कल्याण संघाला करंडक आणि ३० हजार रूपये तसेच उपविजेत्या पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबला करंडक आणि १५ हजार रूपयांचे पारितोषिक देण्यात आले. सामनावीर खिताब केतन पासलकरला भेटला.

**वैयक्तिक पारितोषिकेः**

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूः निखील नासेरी (पुणे रेंजर्स क्रिकेट क्लब, ३३६ धावा, १३ विकेट);

सर्वोत्कृष्ट फलंदाजः विश्वास कुंभार (ब्रेव्हहार्ट क्रिकेट क्लब, ३३० धावा);

सर्वोत्कृष्ट गोलंदाजः आकाश शहा (कल्याण क्लब, १७ विकेट);



## दुहेरी सुवर्णपदक हा दुर्मिळ योग-अभिजीत कुंटे

**पुणे :** बुद्धिबळ ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचे स्वप्न मी अनेक वर्ष पाहत होतो हे स्वप्न साकार झाल्यामुळे मला खूपच आनंद आणि अभिमान वाटत आहे असे ग्रँडमास्टर विदित गुजराथी याने येथे सांगितले. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेतर्फे चेस ऑलिम्पियाड स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्या विदित गुजराथी व महिला संघाचे प्रशिक्षक अभिजीत कुंटे यांचा महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष डॉ. परिणय फुके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या समारंभास महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे कार्याध्यक्ष सिद्धार्थ मयूर, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे, मानद सचिव निरंजन गोडबोले, खजिनदार विलास म्हात्रे तसेच वरिष्ठ पदाधिकारी फारुख शेख हे उपस्थित होते. महिला संघातील सुवर्णपदक विजेती दिव्या देशमुख व सहाय्यक प्रशिक्षक संकल्प गुप्ता हे या समारंभास काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहू शकले नाहीत त्यांचा ऑनलाईन पद्धतीने गौरव करण्यात आला. चेस ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक जिंकले यावर अजूनही विश्वास बसत नाही मात्र गेली अनेक वर्षांची तपस्या आणि त्याग याचेच हे फलित आहे असे सांगून विदित म्हणाला," माझ्या या यशामध्ये माझ्या पालकांनी जो त्याग केला आहे त्याचा महत्त्वाचा वाटा आहे. लहानपणी नाशिक येथे मी सात आठ वर्षांचा असताना अभिजीत कुंटे याच्याबरोबर डाव खेळण्याची संधी मला मिळाली आणि तेव्हापासूनच आमच्यामध्ये गुरु शिष्यांचे नाते तयार झाले आहे.

### पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज १६ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत

# आर्यन किर्तने, अनिका, आरव यांचा मुख्य फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क







**पुणे :** शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या वतीने आयोजित एमएसएलटीए शेपिंग फाऊंडेशन पुणे पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज १६ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राच्या आर्यन किर्तने, अनिका नायर, आरव पटेल यांनी मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का देत मुख्य फेरीत प्रवेश केला.

म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती टेनिस संकुलात सुरु असलेल्या या स्पर्धेत मुलींच्या गटात अंतिम पात्रता फेरीत महाराष्ट्राच्या अनिका नायरने तिसऱ्या मानांकित योगांजली सारुकचा ६-३, ६-१ असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. दुसऱ्या मानांकित महाराष्ट्राच्या आरोही देशमुखने गुजरातच्या पहेल मेहताचा ६-०, ६-२ असा तर, चौथ्या मानांकित शर्मिष्ठा कोद्रेने वीरा काकडेचा ७-५, ६-० असा पराभव करून मुख्य फेरी गाठली. रित्सा कोंडकरने समृद्धी मिरगेला ६-१, ६-१ असे पराभुत केले.

मुलांच्या गटात दहाव्या मानांकित आरव पटेलने पाचव्या मानांकित सतीश अनुरागचा ६-०, ६-० असा एकतर्फी पराभव केला. महाराष्ट्राच्या पंधराव्या मानांकित आर्यन किर्तनेने गुजरातच्या आठव्या मानांकित हित पटेलचा ६-०, ६-२ असा पराभव करून मुख्य फेरीत धडक मारली.

## तस्मई पोहकरचा मानांकित खेळाडूवर विजय





**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए-मानांकन टायगर स्पोर्ट्स ओपन १२ व १४ वर्षाखालील ब्रॉन्झ सिरिज टेनिस २०२४ स्पर्धेचे १२ वर्षाखालील मुलींच्या गटात तस्मई पोहकर हीने पाचव्या मानांकित सर्वज्ञा जगतापचा ६-० असा पराभव करून आगेकूच केली. डेक्कन जिमखाना येथील टेनिस कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत १२ वर्षाखालील मुलींच्या गटात दुसऱ्या फेरीत अव्वल मानांकित कनिष्का सिंगने अन्वीता टेपनचा टायब्रेकमध्ये ६-५(१) असा पराभव केला. आदिरा भगतने आनंदी शेंडगेवर ६-० असा एकतर्फी विजय मिळवला.

### कसोटीत रचला मोठा विक्रम

# जडेजाचे ऐतिहासिक 'त्रिशतक'!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत विरुद्ध बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी अष्टपैलू रवींद्र जडेजाने इतिहास रचला. जडेजा सर्वात जलद ३०० बळी आणि ३००० कसोटी धावा पूर्ण करणारा भारतीय ठरला. बांगलादेशच्या खालिद अहमदची विकेट घेत रवींद्र जडेजाने ही कामगिरी केली. खालिद बाद होताच बांगलादेशचा पहिला डाव २३३ धावांवर आटोपला.

जडेजा हा ३०० कसोटी बळी घेणारा सातवा भारतीय गोलंदाज आहे. त्याने १७४२८व्या चेंडूवर ३००वी विकेट घेतली. सर्वात कमी चेंडूत ३०० बळी घेणारा तो रविचंद्रन अश्विन (१५६३६ चेंडू) नंतरचा दुसरा वेगवान गोलंदाज आहे. भारतीय संघाच्या ९२ वर्षांच्या कसोटी इतिहासातील हा एक अनोखा हॉल ऑफ फेम आहे. यामध्ये जडेजाच्या आधी केवळ सहा भारतीयांनाच अशी कामगिरी करता आली आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये ३०० बळी घेणारा जडेजा हा 7वा भारतीय खेळाडू ठरला आहे. ३०० किंवा त्याहून अधिक कसोटी बळी घेतलेल्या इतर भारतीय गोलंदाजांच्या यादीत अनिल कुंबळे (६१९), आर अश्विन (५२४), कपिल देव (४३४), हरभजन सिंग (४१७), इशांत शर्मा (३११) आणि झहीर खान (३११) यांचा समावेश आहे.

### दहाव्या पीवायसी-ट्रूस्पेस करंडक बॅडमिंटन साखळी स्पर्धेत

# ब्लॅक हॉक्स, बझर्ईस, कार्डिनल्स, कॉमेट्स संघांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने आयोजित दहाव्या पीवायसी-ट्रूस्पेस करंडक बॅडमिंटन साखळी स्पर्धेत साखळी फेरीत ब्लॅक हॉक्स, बझर्ईस, कार्डिनल्स, कॉमेट्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव केला.

पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या बॅडमिंटन कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत ब्लॅक हॉक्स संघाने स्वान्स संघाचा ५-२ असा सहज पराभव करून दुसरा विजय मिळवला. विजयी संघाकडून हर्षद जोगाईकर, तन्मय आगाशे, सिध्दार्थ साठे, राधिका इंगळहळीकर, गंधार देशपांडे, मधुर इंगळहळीकर, चिन्मय जोशी, हेमंत करमरकर, रोहन जोशी, आदित्य जितकर यांनी सुरेख कामगिरी बजावली.

दुसऱ्या सामन्यात बझर्ईस संघाने रेव्हन्स संघाचा ४-३ असा पराभव करून पहिला विजय मिळवला. बझर्ईस संघाकडून सोहम गाडगीळ, मकरंद चितळे, अर्जुन खानविलकर, तुषार नगरकर, अविनाश दोशी, हेमंत पाळंदे, मंदार विंझे, श्रेयस भामरे यांनी सुरेख खेळी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

कार्डिनल्स संघाने फिनिक्स संघाचा ५-२ असा पराभव केला. कार्डिनल्स कडून प्रतीक धर्माधिकारी, निखिल चितळे, ऋषिकेश पेंडसे, विजय राठी, आरुषी पांडे, गौरी कुलकर्णी, आनंद शहा, जयकांत वैद्य, क्षितिज कोतवाल, जय गुजर यांनी चमकदार कामगिरी केली.

अन्य लढतीत अनिकेत शिंदे, आदिती रोडे, बिपिन देव, बिपिन चोभे, पराग चोपडा, निलेश केळकर, श्रीदत्त शानबाग, देवरत शहाणे , सोहम जोशी, गौतम लोणकर, उमेश पटवर्धन, आदित्य जोग यांच्या अफलातून खेळीच्या जोरावर कॉमेट्स संघाने गोशाक संघाचा ६-१ असा एकतर्फी पराभव केला.

#रा